शब्दांना सत्याची धार

प्रहार

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २० ● अंक ५७ ● पाने १० ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

मुंबई ● सोमवार, ४ डिसेंबर २०२३

अंतरंग

सफाई कामगार मुंबईचे खरे हिरो : मुख्यमंत्री

हिंदूराष्ट्र घडविण्यासाठी जनतेने भाजपाचा विजय केला

अखेरच्या सामन्यातही ऑस्ट्रेलियाचा पराभव

पान १०

नमो: नमो:

चार पैकी तीन राज्यांत भाजपाचा डंका; तेलंगणात काँग्रेस

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

लोकसभेची सेमीफायनल समजल्या जाणाऱ्या ४ राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. या निवडणूक निकालांमध्ये चार राज्यांपैकी तीन राज्यांत भाजपाने जोरदार मुसंडी मारली आहे. मध्य प्रदेशची सत्ता राखताना राजस्थान आणि छत्तीसगडची सत्ता काँग्रेसच्या हातून हिसकावून घेण्यात भाजपाला यश आलेले आहे. चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने ३-१ ने बाजी मारताना आगामी लोकसभेला किमान ८२ जागांसाठी पोषक वातावरण तयार केले आहे. भाजपाने चारपैकी हिंदी भाषिक असलेल्या राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये विजय मिळवला आहे. यामध्ये राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये सत्तांतर करत भाजपाने सत्ता मिळवली आहे. दुसरीकडे, मध्य प्रदेशात सत्ता कायम ठेवली आहे. त्यामुळे आता मध्य प्रदेशसह उत्तर प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान या हिंदी भाषिक राज्यांमध्ये भाजपाने आपला दावा मजबूत केला आहे.

● तेलंगणा, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड या चार राज्यांतील विधानसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले आहेत. तेलंगणा वगळता उर्वरित तिन्ही राज्यांत भाजपाने बाजी मारली आहे, तर तेलंगणा राज्यात काँग्रेस पक्षाचे सरकार स्थापन होणार आहे.

● मिझोराम आणि वरील चार राज्यांची विधानसभा निवडणूक झाल्यानंतर मतदानोत्तर चाचण्यांमध्ये मध्य प्रदेश, राजस्थानमध्ये काँग्रेसचे सरकार येईल, असे सांगितले जात होते. प्रत्यक्ष मात्र तेलंगणा वगळता अन्य तिन्ही राज्यांत काँग्रेसचा पराभव झाला आहे.



भाजपाकडून नरेंद्र मोदींचा चेहरा

भाजपाकडून ही निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या चेहऱ्यावर लढविण्यात आली. पंतप्रधान मोदींचा उत्तर भारतामध्ये, हिंदी बेल्टमध्ये करिष्मा आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीतही त्यांच्यामागे जनता उभी राहिल्याचे स्पष्ट होत आहे. या चार राज्यांच्या निवडणुकीचा निकाल म्हणजे लोकसभेसाठी या पट्ट्यात भाजपाला मिळालेला एक प्रकारचा कौलच असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यामुळे लोकसभेच्या निवडणुकीसाठी भाजपाच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे दिसून येत आहे.

(छाया : अमित खोत, मालवण)

भाजपच्या विरोधकांचा आवाज झाला बंद! तुम्ही बोलत राहा, आम्ही जिंकत राहू...

अमित खोत

मालवण : मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड येथील भाजपाच्या विजयाचा जोरदार जल्लोष मालवण शहर भाजप कार्यालय येथे रविवारी सायंकाळी करण्यात आला. या विजयोत्सवात केंद्रीय मंत्री नारायण राणे, पालकमंत्री रवींद्र चव्हाण, माजी खासदार निलेश राणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी तसेच घोषणाबाजीने आसमंत दणाणून गेला. दरम्यान, 'तीनही राज्यांतील भाजपाच्या विजयाचा जल्लोष येणाऱ्या लोकसभा निवडणुकीतही दिसून येईल. विजय भाजपाचाच होईल. आगामी प्रत्येक निवडणुकीत हेच चित्र देशात सर्वत्र दिसून येईल. देशात पुन्हा भाजपाचीच सत्ता येणार आणि पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीच होणार', असा ठाम विश्वास केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या नऊ वर्षांत ५४ योजना सर्वसामान्य जनतेला दिल्या. ८० टक्के जनतेला मोफत धान्य दिले. पुढेही पाच वर्षे हे सर्व सुरूच राहील. एकूणच जनता भाजपासोबत आहे हे या निवडणूक निकालांतून दिसून आले आहे. विरोधकांचा दारुण पराभव होतच राहणार. त्यांनी चिंतन करत राहावे. महाराष्ट्रात मातोश्रीचे पाचच्या वर आमदार निवडून येणार नाहीत, असा जोरदार टोला मंत्री नारायण राणे यांनी विरोधकांना हाणला. यावेळी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी विजयाची जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी माजी आ. प्रमोद जठार, माजी आ. राजन तेली, भाजपा जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, उपाध्यक्ष अशोक सावंत, विजय केनवडेकर, तालुकाध्यक्ष धोंडी चिंदरकर, माजी नगराध्यक्ष सुदेश आचरेकर, जिल्हा बँक संचालक बाबा परब, अविनाश पराडकर, बाबा मोंडकर, दीपक पाटकर, विकी तोरसकर, गणेश कुशे, राजू राऊळ, बंड्या सावंत, राजन गांवकर, अजिंक्य पाताडे, राजू परुळेकर, आबा हडकर, महिला जिल्हाध्यक्षा संध्या तेरसे, पूजा करलकर, चारुशीला आचरेकर, पूजा वेरलकर, नीलम पांजरी यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपाचा सिंधुदुर्गात 'विजयोत्सव'

■ मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगडप्रमाणे लोकसभेतही भाजपाचा विजय निश्चित

■ नरेंद्र मोदीच होणार पंतप्रधान : केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी व्यक्त केला विश्वास

तेलंगणातील गोशामहल विधानसभा मतदारसंघातून विजयी झालेले भाजपा उमेदवार, हिंदू योद्धा टी. राजा सिंह यांचे भाजपाचे आमदार नितेश राणे यांनी हार्दिक अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. आमदार नितेश राणे यांनी टी. राजा सिंह यांच्या गोशामहल विधानसभा मतदारसंघात जाऊन जोरदार प्रचार केला होता.

■ मध्य प्रदेशात काँग्रेसला मोठा धक्का बसला असून भाजपाला सत्ता राखण्यात यश मिळाल्याचे दिसत आहे. काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांना स्वतःची जागा राखण्यात यश आले असले तरी राज्यात काँग्रेसचा धुव्वा उडाला आहे.

■ दुसरीकडे भाजपाने १५७ जागांवर आघाडी घेतली असून मुख्यमंत्री शिवराज चौहान यांनीही मोठा विजय प्रप्त केला आहे. मध्य प्रदेशातील इंदूर जिल्ह्यात एकूण ९ मतदारसंघ आहेत. यापैकी एक असलेल्या इंदूर १ या जागेसाठी भाजपाने ज्येष्ठ नेते कैलाश विजयवर्गीय यांना मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत उतरवले होते.

■ मागील निवडणुकीत इंदूरमधील नऊपैकी सहा जागा भाजपाने जिंकल्या होत्या. मात्र काँग्रेसकडे असलेली जागा खेचून घेण्यासाठी भाजपाने दिग्गज नेते कैलाश विजयवर्गीय यांना उमेदवारी दिली होती. इंदूर-१ मतदारसंघ हा संपूर्ण जिल्ह्यातील सर्वात हॉट विधानसभा मतदारसंघ ठरला आहे. येथे भाजपाचे कैलाश विजयवर्गीय विजयी झाले आहेत.

तर राजस्थानात तेथील जनतेच्या मूडप्रमाणे पुन्हा एकदा सत्तांतर झाले आहे. दर पाच वर्षांनी होणारा सत्तेतील बदल यावेळी देखील कायम असून राज्यात भाजपा ११३हून अधिक जागांवर आघाडीवर आहे, तर सत्ताधारी काँग्रेस ७२ जागांवर आघाडीवर आहे. बहुमतासाठी लागणारे १०१ टप्पा भाजपाने सहज पार केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात भाजपाने कोणत्याही एका नेत्याचा चेहरा मुख्यमंत्रीपदासाठी पुढे केला नव्हता. राज्यात२००३ पासून वसुंधरा राजे या पक्षाचा चेहरा होत्या. पण यावेळी पक्षाने राजे यांना मुख्यमंत्रीपदासाठी फेव्हरेट मानले नव्हते. आता राज्यात भाजपाची सत्ता आली असताना मुख्यमंत्री कोण होणार? याची चर्चा सुरू झाली आहे. मतदान झाल्यानंतर वसुंधरा राजे सक्रिय झाल्या होत्या. मतमोजणीच्या आधी रात्री उशिरापर्यंत त्यांनी बैठका घेतल्या होत्या. या हलचालीमुळे त्या पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदासाठी उत्सुक असल्याचे दिसून येते. ही चर्चा होण्याचे कारण म्हणजे भाजपाने मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. निवडणुकीच्या प्रचारात भाजपाने अनेक केंद्रीय मंत्र्यांना उतरवले होते. राजस्थानमध्ये भाजपाचा सर्वात मोठा चेहरा आणि लोकप्रिय नेत्या राजे असल्या तरी त्यांचा प्रभाव कमी झाला आहे. त्यामुळेच पक्ष राजे यांच्याऐवजी अन्य चेहऱ्याला संधी देऊ शकतो. त्यात बालकनाथ, दीया कुमारी, सीपी जोशी यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. तिजारा मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार बालकनाथ हे खासदार देखील आहेत. बालकनाथ हे अशोक गहलोत यांच्यानंतर मुख्यमंत्रीपदाचे दुसरे सर्वात लोकप्रिय नेते म्हणून समोर आले आहेत. बालकनाथ हे अलवर येथून लोकसभेचे खासदार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याप्रमाणे तेदेखील नाथ संप्रदायचे आहेत. ते रोहतक येथील बाबा मस्तनाथ मठाचे महंत आहेत.

आत्मनिर्भर भारताच्या संकल्पाचा विजय

■ भाजपाच्या मुख्यालयात पंतप्रधान मोदींनी जनतेचे मानले आभार

■ आवाज तेलंगणापर्यंत पोहोचला पाहिजे...

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था):

देशातील चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकाचा निकाल जाहीर झाले व त्यामध्ये मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांत भाजपाने स्पष्ट बहुमतासह दणदणीत यश मिळविले आहे. या तीन राज्यांतील दमदार विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात सायंकाळी हजेरी लावली आणि जनतेला संबोधित केले. यावेळी त्यांनी भाषणाला सुरुवात करताच पहिल्याच वाक्यात सिक्सर मारला. मोदी भाषणासाठी व्यासपीठावर येताच उपस्थितांमधून 'भारत माता की जय' आणि 'मोदी.. मोदी...' अशा घोषणा सुरु होत्या. त्याचक्षणी मोदी म्हणाले की, 'भारत माता की जय', हा आवाज तेलंगणापर्यंत पोहोचला पाहिजे. आजचा विजय ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आहे. आज सबका साथ सबका विकासची भावना जिंकली आहे. आज विकसित भारताच्या आवाहनाचा विजय झाला आहे. आज भारताच्या विकासाठी राज्यांचा विकास झाला पाहिजे या विचाराचा विजय झाला असल्याचे देखील मोदी यांनी म्हटले आहे. आज आत्मनिर्भर भारताच्या संकल्पाचा विजय झाला आहे. आज वंचितांच्या विचाराचा विजय झाला आहे. आज भारताच्या विकासासाठी राज्याचा विकास या विचाराचा विजय झाला आहे. आज इमानदारी, पारदर्शकता आणि सुशासनाचा विजय झाला आहे. मी सर्व मतदारांना आदरपूर्वक नमन करतो. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडच्या लोकांनी भाजपावर भरपूर प्रेम केले. तेलंगणात देखील भाजपाचा पाठिंबा सातत्याने वाढत आहे.

जातीयवाद करण्याचा प्रयत्न झाला... : या निवडणुकांमध्ये देशाला जातींमध्ये वाटण्याचे खूप प्रयत्न झाले. पण मी सातत्याने सांगत होतो की, माझ्यासाठी देशात फक्त चार जाती आहेत. त्या म्हणजे नारीशक्ती, युवाशक्ती, शेतकरी आणि जवान. या चार जातींना सशक्त केलं, तरच देश सशक्त होईल. आज प्रत्येक जातीचा माणून सांगत आहे की, हा आमचा विजय आहे. असं म्हणत पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

माझी जबाबदारी वाढली...

हे आपल्या सर्वांचे सौभाग्य आहे की, आपल्या कुटुंबीयांकडून इतके मला प्रेम मिळतेय आणि विश्वास मिळतोय. मी व्यक्तिगतरीत्या हे अनुभवत असल्यामुळे माझी जबाबदारी अधिक वाढते. आजही माझ्या मनात हाच भाव आहे. मी माझ्या माता-भगिनी, युवा साथींसमोर, शेतकरी भावा-बहिणींसमोर नतमस्तक आहे.

नारीशक्तीचे मानले आभार

आज मी विशेषकरून देशाच्या नारीशक्तीचे आभार मानू इच्छितो. आज ही नारीशक्ती म्हणतेय की, प्रत्येक ठिकाणी भाजपा झेंडा फडकवेल. त्यामुळे आज नारीशक्तीकडून भाजपाला जिंकवण्याचा निर्धार करण्यात आला होता. प्रत्येक मुलीला, बहिणीला स्पष्ट माहीत आहे की, भाजपाचे सरकारच नारीशक्तीसाठी योग्य आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

काँग्रेसचा सुपडा साफ... : काँग्रेसने केलेल्या भ्रष्टाचारामुळे त्यांचा सुपडा साफ झालाय. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड यांसारख्या राज्यांमध्ये काँग्रेसची पिछेहाट झाली, असे म्हणत पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसवर निशाणा साधला.

नरेंद्र मोदी यांचा करिष्मा : एकनाथ शिंदे

'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा, देशासाठी केलेले काम आणि गृहमंत्री अमित शहा यांचे नियोजन यामुळे निवडणुकांमध्ये भाजपा व एनडीएला विजय मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. आतापर्यंत लोक म्हणत होते घर घर मोदी. आता या निवडणुकांमध्ये मन मन मोदी असल्याचे सिद्ध करणारा निकाल आपण पाहिला. अनेक लोक म्हणत होते की मोदींचा करिश्मा संपला, निवडणुकीत भाजपा पराभूत होईल. मोठे बदनामीचे षडयंत्र केले गेले. पण शेवटी हे निकाल जनतेच्या हातात असतात. जनता जनार्दन हेच सर्वस्वी असते. या जनतेने निवडणुकांमध्ये मोदींना साथ दिली', असे एकनाथ शिंदे म्हणाले.

लोकसभेच्या विजयाची नांदी : देवेंद्र फडणवीस

नागपूर : चार राज्यांतील निवडणुकांच्या निकालांनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विजयाचे श्रेय हे पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा आणि जेपी नड्डा यांचे आहे. मोदींवरील विश्वासाचे हे यश असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. हा अभूतपूर्व निकाल असून जनतेच्या मनात काय आहे, याची ही नांदी असल्याची प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीसांनी दिली. राष्ट्रीय अध्यक्ष आणि त्या राज्यातली जी काही भाजपची टीम आहे आणि आमची राष्ट्रीय टीम आहे. या सगळ्यांचे हे श्रेय आहे आणि म्हणून या सगळ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

देशाला मोदींशिवाय पर्याय नाही : अजित पवार

तीन राज्यांत भाजपने सत्ता खेचली आहे. तेलंगणात एबीव्हीपीचा कार्यकर्ता काँग्रेसने खेचला अन्यथा तेलंगणाचे चित्रही वेगळे दिसले असते. आमचा निर्णय काहींना आवडला नव्हता, पण देशात मोदींशिवाय पर्याय नाही, हे आता स्पष्ट झाले, अशी प्रतिक्रिया भाजपच्या विजयानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली आहे. भाजपचा चेहरा नरेंद्र मोदी हेच त्रिवार सत्य आहे. मोदींमुळे देशाची प्रतिमा उंचावली आहे. निकाल चांगला येणार, हे मी आधीच बोललो होतो. मोदींच्या नेतृत्वाखाली देशाची प्रगती होत आहे.

लोकसभा निकालांवर परिणाम होणार नाही : शरद पवार

सातारा दौऱ्यावर आलेल्या शरद पवार यांना चार राज्यांच्या निवडणूक निकालांसंबंधी विचारले असता ते म्हणाले, 'या निवडणूक निकालांचा आगामी लोकसभेच्या निकालांवर काहीही परिणाम होणार नाही. कारण विधानसभा आणि लोकसभेचा जनतेचा मूड वेगळा असतो. निकालाचा इंडिया आघाडीवर काहीही परिणाम होणार नाही. सध्या इंडिया आघाडीसमोर नरेंद्र मोदींना कोण पर्याय असेल, हाच विषय आहे'.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्र्यांसह अनेक मान्यवर आज मालवणात

मालवणच्या सागरतिरी उसळला जनसागर

◆ सिंधुदुर्गनगरी (वृत्तसंस्था) :

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर सोमवारी ४ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण आणि 'नौदल दिन' साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी व इतर मंत्री महोदय, अतिमहनीय व्यक्ती उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशोर तावडे यांनी दिली. दरम्यान, रविवारी मालवण समुद्रकिनारी मोठ्या संख्येने जिल्हावासीय नौदलाची चित्तथरारक प्रात्यक्षिके पहाण्यास जमले होते.

नागरिकांना कार्यक्रम बघण्याची व्यवस्था तारकर्ली व्यासपीठाच्या दक्षिणकडे तारकर्ली बीच देवबागकडे आणि उत्तरेकडे दांडी बीचकडे केली आहे. नागरिकांना वाहन पार्कींगकरिता दांडी बीच ते मोरयाचा धोंडा, काळेथर मैदान व ग्रामपंचायत तारकर्लीच्या बाजूला सोय करण्यात आलेली आहे. कार्यक्रम सर्वांना पाहता यावा यासाठी कार्यक्रमाचे प्रक्षेपण करण्यासाठी स्क्रीनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ४ डिसेंबर रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. संध्याकाळी ४.१५ च्या सुमारास ते मालवण येथे ते पोहोचतील आणि राजकोट किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करणार आहेत. त्यानंतर तारकर्ली येथे होणाऱ्या 'नौदल दिन २०२३' कार्यक्रमाला पंतप्रधान उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान भारतीय नौदलाची जहाजे, पाणबुड्या, विमाने आणि विशेष दलांची प्रात्यक्षिके सिंधुदुर्गातील तारकर्ली किनाऱ्यावरून पाहणार असून सिंधुदुर्ग किल्ल्यालाही ते भेट देणार आहेत. त्याचप्रमाणे तिथे असलेल्या एकमेव छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मंदिरात जाऊन दर्शन देखील घेणार आहेत.

नौसेना दिनाचा आज भव्य सोहळा; सिंधुदुर्गच्या इतिहासातील सुवर्णक्षण

मालवण नगरी सजली नववधूसारखी

● दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. सिंधुदुर्ग येथील 'नौदल दिन' हा सोहळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या समृद्ध सागरी वारशाला आदरांजली अर्पण करत आहे. पहिली स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आय. एन. एस. विक्रांतचे पंतप्रधानांनी जलावतरण केले तेव्हा शिवरायांच्या राजमुद्रेपासून प्रेरणा घेत साकारण्यात आलेल्या नौदलाच्या नव्या ध्वजाचा भारतीय नौदलाने स्वीकार केला.

● मालवण येथे नौदल दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सर्व दिग्गजांचे स्वागत करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे तारकर्ली केंद्र तयारी करत असल्याची माहिती देण्यात आलीये. त्यासाठी सर्व पातळीवर सुधारणा करण्यात आल्या आहे.

● स्वच्छता, सुशोभीकरण यांसारख्या गोष्टींवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. यावेळी केंद्रीय उद्योग मंत्री नारायण राणे, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नौदलाचे अधिकारी, विदेशी पाहुणे देखील उपस्थित राहणार आहेत.

'मिचॉन्ग' चक्रीवादळामुळे बळीराजावर अस्मानी संकट; पावसाची शक्यता

◆ पुणे (वृत्तसंस्था) :

बंगालच्या उपसागरावर आणखी एक चक्रीवादळाचे संकट आले आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून रविवारी हे कमी दाबाचे क्षेत्र अधिक मजबूत होऊन त्याचे चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता आहे. 'मिचॉन्ग' चक्रीवादळामुळे महाराष्ट्रात पुढील दोन दिवस पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे राज्यात अवकाळी पावसाचे थैमान पाहायला मिळत आहे. मुंबई, ठाणे, पालघर भागात हवामानात गारठा जाणवणार आहे. कोकण किनारपट्टी भागात हवामान कोरडे पाहायला मिळणार आहे. पुढील दोन दिवस राज्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांच्या गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे.

मध्यम ते हलक्या स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे. पुढील २४ तासांत विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचा परिणाम राज्याच्या वातावरणावरही दिसत आहे. राज्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकरी संकटात सापडला आहे. अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मुंबईत हुडहुडी : पुढील चार ते पाच दिवस मुंबईत थंडीचा कडाका कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. उत्तरेकडील वाऱ्यांमुळे मुंबईच्या तापमानात घट झाली असून, पुढील काही दिवस ही परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे, असे ते म्हणाले. महाराष्ट्राच्या विविध भागांतही तापमान १५ अंशांच्या खाली गेले आहे.

प्रहार व्यासपीठ
www.prahaar.in
epaper.prahaar.in
@PrahaarNewsLive

हॅप्पी बर्थ डे

अजित आगरकर (क्रिकेटर)

डॉ. अलका देव-मारुलकर (गायिका)

फादर फ्रान्सिस डी'ब्रिटो (लेखक)

राजू परुळेकर (राजकीय विश्लेषक)

मिलिंद देवरा (माजी खासदार)

श्याम तागडे (आयएएस)

जावेद जाफरी (अभिनेता)

मराठीची हेतूपुरस्सर गळचेपी

दुकानं, आस्थापनं यासाठी मराठीत नामफलकांचा आग्रह खूप जूना आहे. सर्वोच्च न्यायालयाने व्यापारी संघटनेला अंतिम तारखेचे बंधन घातल्यानंतर पुन्हा याविषयी केवळ मनसेनेच जोर धरला आहे. खरं तर त्यांनी आपलं पाणी कधीच जोखलं आहे. अंतर्गत वादा-वादी, दुफळी, वैर, उघड मतभेद, सत्तेसाठी भाऊबंदकी, सुडाचे राजकारण, मराठी माणूस आणि मराठी भाषा यांची सर्वत्र होत असलेली सततची उपेक्षा आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बाळासाहेबांचा असलेला वचक, दरारा आज टिकवू न शकलेले आपले मराठी नेते या वस्तुस्थितीमुळे मराठी सक्ती न जुमानण्याच्या मनःस्थितीने व्यापारी संघटना इतकी धजावली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश देखील त्यांना मान्य करावसा वाटत नाही. यामुळे कोर्टाची बेअदबी होते, याची त्यांना पर्वा नाही. मराठीचा दुस्वास खूप आधीपासूनच आहे. बाळासाहेबांनी त्यास चांगलीच खीळ बसवली होती. इतरांना ते जमले नाही, कारण एकीचे बळ प्रस्थापित करू शकले नाहीत. दुहीमुळे आलेल्या दुर्बलतेची निष्पत्ती म्हणजे मराठीपण न जुमानणे! यातून किंवा इतर राज्यांच्या अस्मितेतून आपण काय धडा घेतला तर काहीच नाही. वस्तुस्थिती हाताबाहेर गेली आहे आणि याची जाण येथील भूमिपुत्रांना, राजकीय नेत्यांना कदाचित होईल पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असेल! केवळ नामफलक नाही, तर खासगी नोकरी, व्यवसाय, चित्रपट क्षेत्र अशी सर्वत्र मराठीची हेतूपुरस्सर पीछेहाट, गळचेपी केली जात आहे. मराठी सक्ती बाजूलाच पण आपल्या माथी मात्र सक्तीचे उपरेपण येईल. भीतीग्रस्त आपण होणार कारण आपणच त्यांना सुरुवातीला अभय देऊन त्यांचे इथले भय संपवले आहे!

- हेमंतकुमार मेस्त्री, मनोर

मागच्या दाराने आलेला परकेपणा...

सात बेटांवर वसलेली आणि चहुबाजूंनी रत्नाकराने आपल्या कुशीत घेतलेली मुंबई, अपार सौंदर्याची नटलेली आहे. मुंबईला समृध्द समुद्र किनारे आणि उद्योग धंद्यासाठी सोईस्कर भौगोलिक परिस्थिती लाभलेली आहे. मोठे मोठे उद्योगधंदे, बाजारपेठा, जगाशी आणि संपूर्ण भारताशी जोडणाऱ्या वाहतूक सुविधा,असल्यामुळे भविष्याचा पाठलाग करत सर्व जाती धर्माच्या लोकांनी मुंबईत मुक्कामाला येण्यासाठी प्रथम पसंती दिली. त्यातील बहुतांश मुंबईत स्थाईक झाले, अनेकांनी धंदे थाटले, मेहनत आणि अविरत कष्टामुळे त्यांना उज्ज्वल भविष्याचा शोध लागला. आपल्या सरकारने त्यांना अस्तित्वाचे दाखले, शिधापत्रिका, जलजोडणी विद्युत जोडण्या उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी शाळा उपलब्ध करून दिल्या. एवढ्या सोयी-सुविधा उपलब्ध होऊन सुद्धा ते मुंबईशी एकरूप झाले नाहीत हे मात्र क्लेशदायकच आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेवर प्रेम करण्यासाठी व्यापाऱ्यांची मानसिकता विकसित होऊच शकली नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या राज्यभाषेची अस्मिता जपावी, आपल्या दुकानावर, व्यावसायिक आस्थापनेवरील फलक मराठीत लावावेत हा एक कायदा आहे, नियम आहे, हे माहीत असूनही सोइस्करपणे त्यांनी या मुद्द्याकडे दुर्लक्ष केले. स्थानिक मराठी माणसाला मराठीची होणारी उपेक्षा कुठे तरी जाणवायला लागली, बोचायला लागली. मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी सरसावलेल्या संघटना आणि पाठ्यांना सत्तेचे वेध लागले. अशा परिस्थितीत महाराष्ट्राची राज्यभाषा, तिचा वापर, जाणूनबुजून डावलला जाऊ लागला. इतर राज्याची अस्मिता जपण्यासाठी व्यापारी विनातक्रार तयार असतात; परंतु महाराष्ट्राचा गौरव, महाराष्ट्राची राज्यभाषा, मराठीची मात्र अवहेलना होऊ लागली. महाराष्ट्रातील दुकाने, आस्थापनावरील नामफलक मराठीतून असलेच पाहिजे, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने जारी केले. त्यासाठी महाराष्ट्र सरकारला व्यापारी युनियनच्या विरोधात मराठीच्या मुद्द्यावर ठाम भूमिका घेऊन संघर्ष करावा लागला. जे घडले ते सर्व कायद्याच्या कक्षेत घडले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, महाराष्ट्रातील व्यापारी बंधूना मराठी फलक लावण्यासाठी भाग पाडणे, हे मात्र प्रशासनाचे कर्तव्य आहे. मराठी नेते, लेखक, पत्रकार, संपादक, पत्र लेखक, कायदेतज्ज्ञ या सर्वांनी दुकानांच्या पाट्या मराठीत झळकणार किंवा नाही? यावर कटाक्षाने नजर ठेवून पाठपुरावा करायला हवा. म्हणजे मुंबईत मागच्या दाराने प्रवेश करून, महाराष्ट्र आणि मुंबईबाबत परकेपणा जपणारे व्यावसायिक आणि व्यापारी ताळ्यावर येतील.

- प्रशांत कुळकर्णी, कांदिवली पश्चिम

मराठीद्वेष्ट्या आस्थापनांवर बहिष्कार हाच पर्याय

मुंबईसह राज्यातील दुकाने, आस्थापनांवर मराठी पाट्या असाव्यात, यासाठी महापालिकेने आपल्यापरीने प्रयत्न केले. सेना, मनसे यांनीही वेळोवेळी आंदोलने केली. अमराठी पाट्यांची मोडतोड वा त्यावर डांबर फासणे यासारखे प्रकार झाले. न्यायालयांनी मराठी राज्यभाषा असलेल्या महाराष्ट्रातील दुकाने, आस्थापनांवर मराठीतून पाट्या लावाव्यात म्हणून आदेश दिले, पण मुंबईसह राज्यातील विविध शहरात येऊन मुजोर झालेल्या अमराठी व्यावसायिकांनी आपली दुकाने, आस्थापनांवर मराठीतून पाट्या न लावता यांच्या व्यापारी संघटनांनी महाराष्ट्राला डिवचण्याचेच काम केले. मराठी पाट्यांसंबंधात पालिकेच्या आवाहनाला आणि न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती मिळावी म्हणून पुढाकार घेत आपली मुजोरी दाखवण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला. शेवटी सर्वोच्च न्यायालयाने २५ नोव्हेंबरपर्यंत मराठीतून पाट्या लावण्याचे अंतिम आदेश दिले. मात्र अजूनही अनेक दुकाने, आस्थापनांवर मराठीतून पाट्या दिसत नाहीत. मनसेनेही 'मराठीतून पाट्या लावण्याची २५ नोव्हेंबर ही शेवटची तारीख आहे हे लक्षात ठेवावे अन्यथा आपल्यापरीने अंमलबजावणीचे प्रयत्न केले जातील' असा दुकानदार, व्यावसायिकांना इशारा दिला होता, असे असूनही कित्येक दुकाने, आस्थापनांवर मराठीतून पाट्या दिसत नाहीत. एकूण मराठीद्वेष्टे अमराठी व्यावसायिक ना न्यायालयीन आदेशाला जुमानत, ना पालिकेला, ना मनसेच्या आवाहनाला! त्यांना मनसेच्या 'खळ्ळखट्याक'ची गरज वाटत असावी असे दिसते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस ४० वर्षे उलटूनही स्थानिक राज्यभाषा मराठीतून येथील दुकाने, आस्थापनांवर पाट्या लावल्या जात नसतील, तर अशी दुकाने, आस्थापनांवर बहिष्कार हाच पर्याय उरतो. राजकारणी नेते पक्षीय स्वार्थासाठी अमराठी लोकांना कुरवाळत बसल्याने महाराष्ट्रात राहूनही महाराष्ट्राला आणि येथील स्थानिक भाषेला हे परप्रांतीय दुय्यम समजत आहेत. हे बोटचेपे धोरण महाराष्ट्रात किती काळ चालणार आहे? दक्षिण भारतात त्यांच्याच प्रादेशिक भाषेत तेथील दुकाने, आस्थापनांवर पाट्या आहेत इतकेच काय तेथील राज्य परिवहनच्या आगारातील वेळापत्रकाची तेथील स्थानिक भाषेत दिसतात, किमान जोडीला हिंदी/इंग्रजीत असते, तर स्थानिक भाषा न कळणाऱ्या पर्यटकांना त्रास झाला नसता पण याचा त्यांच्या राज्यात कुठे विचार केला जातो? त्यांच्या राज्यात त्यांना हे असे चालते, तर मग महाराष्ट्रात येथील स्थानिक मराठी राज्यभाषेत दुकाने, आस्थापनांवर पाट्या लावण्यात यांना लाज का वाटावी? तसे असेल, तर महाराष्ट्राने आपल्याला भरभरून दिले याची जाण न ठेवणाऱ्यांनी 'मराठीतून पाट्या लावणार नाही या अहंकाराने इथला व्यवसाय बंद करून खुशाल आपापल्या प्रांतात जावे' नाही तरी महाराष्ट्रात परप्रांतीयांचा अवास्तव भरणा झाला आहे व असा वरचढपणाही वरचेवर दिसून येतो आहे. सरकार अशा वाढत्या परप्रांतीय लोंढ्यांबाबत जागृत नसेल, येथील राज्यभाषा मराठीसाठीही आग्रही नसेल व केवळ राजकारणाचाच विचार करून मराठीचा आदर न करणाऱ्यांना गोंजारत बसणार असेल, तर अशा मराठी नेत्यांचे बेगडी मराठीप्रेम फक्त 'मराठी भाषादिनी'च ऐकावे. राज्य सरकारने राज्यातील सर्वच दुकाने, आस्थापनांवर मराठीतूनच पाट्या लागतील यासाठी कठोर पावले उचलायला हवीत. राजकारणापेक्षा भाषेच्या अस्मितेसाठी आपला स्वाभिमान जागृत ठेवून वागावे, हीच अपेक्षा!

- मुरलीधर हरिश्चंद्र धंबा, डोंबिवली (पश्चिम)

मराठीविषयी सर्वच क्षेत्रांत अनास्था...

आज महाराष्ट्राची शासकीय व अधिकृत भाषा म्हणून मराठीचे स्थान अबाधित आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारात पाहिले तर काय दिसते? अनेक शाळेत मुले मराठी सोडून इंग्रजी शाळेत मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेत आहेत. शहरातील अनेक बोर्ड मराठीऐवजी अमराठीत किंवा इंगर्जीत आहेत. हॉटेलमधील बिले सुद्धा अनेक ठिकाणी इंग्रजीत दिली जातात. मुलांना धड मराठीत बोलता येत नाही. त्यांच्या भाषेत काही इंग्रजी तर काही हिंदी शब्दांचा भरणा असतो. केंद्र सरकारकडून गेली अनेक वर्षे प्रयत्न करूनही अभिजात भाषेचा दर्जा मराठी भाषेला अद्याप मिळालेला नाही. शासकीय पातळीवर सुद्धा अनेक पत्रके इंग्रजीत निघतात. एकूणच मराठीची ही अनास्था सर्वच पातळीवर चालू आहे. मराठी भाषेत शहरातील दुकानाच्या पाट्या असल्या पाहिजेत, याविषयी नुकतेच सुप्रीम कोर्टाने निकाल दिला असून या आदेशाची मुदत आता संपत आहे. तरीसुद्धा मुंबईसह अनेक ठिकाणी अमराठीत पाट्या दिसतात. आता सरकारने यावर दंडाची कारवाई करण्याचे ठरविले आहे. एकूणच आता मात्र दंडाचा ससेमिरा समोर असल्याने अनेकजण पाट्या बदलतील असे वाटते. एकूणच, मराठी विषयी सर्वच ठिकाणी अनास्था आढळून येते ही परिस्थिती बदलली पाहिजे.

- शांताराम वाघ, पुणे

दुकानांना मराठी पाट्या लावणे अन्याय वाटत असावा

दुकानांना मराठी पाट्या लावणे हे सरकारी बंधन वाटत असावे. फेडरेशन ऑफरिटेल ट्रेडर्सने मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती; परंतु उच्च न्यायालयाने दाद दिली नाही. उलट दंडच आकारला. यावर दुकानदारांच्या संघटनेने ऑक्टोबर २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने दाद फेटाळून लावली. निकालात २ महिन्यांची मुदत देऊन.२५ नोव्हेंबर २०२३ रोजी आस्थापना दुकाने, कार्यालये, हॉटेल, दवाखाने येथील पाट्यावर मराठीत नावे लावण्याचा आदेश दिला. कार्यवाही केली नाही, तर दंड करण्याची सक्ती करण्याचा आदेशसुद्धा दिला आहे. मराठी नावे लावणे घाटीपणाचे वाटत असावे. इंग्रजी नावे लावल्याने भरदस्तपणा येत असावा. काही ठिकाणी इंग्रजी नावे मोठी व मराठी नावे छोटी केलेली दिसतात. यावरही बंधन घातलेले आहे. मराठी नावे मोठी, स्पष्ट दिसतील अशी व इंग्रजी नावे लहान हवी जवळपास सर्व व्यापारी हे गुजराती आहेत. त्यांना मराठी नावाचा तिटकारा आहे. गुजराती भाषेत नावे लावायची त्यांची तयारी आहे. हे कशाचे द्योतक आहे? काही झाले तरी महाराष्ट्रात मराठी भाषेला विरोध करणे चुकीचे आहे. गुजराती लोकांनी धंदा करायचा असेल, तर मराठी भाषेबद्दल उदासीनता न बाळगता सहकार्याची भावना ठेवावी. गुजराती माणसे मराठी मोडकी-तोडकी बोलण्याचा प्रयत्न करतात ते सहन करतोच ना. उलट मराठी माणसांना याचा अभिमानच वाटतो. परप्रांतियांनी सलोखा जोपासावा असेच मराठी माणसांना वाटते, म्हणूनच तर सामावून घेतले जाते.

- अनंत द. दाभोळकर, अंधेरी

सरकारी पुढाकार परिणामकारक

दुकानांवर मराठी पाट्या लावण्यासाठी न्यायालयाने दिलेली अंतीम मुदतही संपली तरी राज्यातील अनेक भागांतील दुकानांवरील इंग्रजी पाट्या बदलण्यात आल्या नाहीयेत. आजूबाजूच्या राज्यांमध्ये आपापल्या मातृभाषेचा कडवा पुरस्कार होत असताना महाराष्ट्रात मात्र दुकाने व आस्थापनांवर मराठी पाट्या लावण्यासाठी झगडावे लागत आहे. त्यासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले गेले. न्यायालयाने आदेश दिल्यावरही दुकानदार जुमानायला तयार नाहीत. यामुळे राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी इंग्रजी पाट्यांची तोडफोड आंदोलन सुरू केले आहे. महाराष्ट्रात सातत्याने मराठीची होत असलेली गळचेपी व दुरवस्था चिंतेचा विषय बनला आहे. मराठी शाळा, मराठी साहित्य, मराठी सिनेसृष्टी, नाट्यसृष्टी अस्तित्वासाठी झगडत असून शासकीय पातळीवरदेखील त्यासाठी म्हणावे तितके प्रयत्न होताना दिसत नाहीत. मराठी पाट्यांच्या नियमाची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारी यंत्रणांनी आपली जबाबदारी ओळखत पोलीस विभागाच्या समन्वयाने कठोर भूमिका घेणे गरजेचे असताना तसे होत नसल्याने आता राजकीय पक्ष त्यासाठी आक्रमक होताना दिसत आहेत. वास्तविक अमराठी लोकांची राज्यात वाढत चाललेली संख्या व बहुतांश व्यवसायांमध्ये त्यांचा अंमल यामुळे मराठीला सापत्न वागणूक मिळत आहे. मराठी पाट्यांचा कायदादेखील अशा लोकांच्या पचनी पडलेला नाही. त्यामुळे मराठीद्वेष्ट्या स्वभावाने अनेक दुकानांच्या पाट्या बदलण्यास मालकांकडून चालढकल केली जात आहे. मराठी भाषेचे अस्तित्व महाराष्ट्रात टिकवण्यासाठी दुकानांवर मराठी पाट्या बसवण्याच्या नियमाची काटेकोर अंमलबजावणी अत्यंत आवश्यक असून त्यासाठी सरकारी पुढाकाराची मात्रा परिणामकारक ठरेल.

- वैभव मोहन पाटील, घणसोली, नवी मुंबई

आता ग्राहकांनीच अशा दुकानांवर बहिष्कार घालावा!

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तसेच महापालिकेची अंतिम मुदत संपून गेल्यानंतर देखील काही बेशिस्त दुकानदार मराठी पाट्यांबाबत थोडे देखील गंभीर नसल्याचे दिसून येत आहे. मराठी भाषेचा तिरस्कार करणाऱ्या अशा दुकानदारांवर पालिकेने कडक कारवाई करण्यास सुरुवात केली असली तरी महाराष्ट्रात राहून जर मराठी भाषा नाकारत असतील, तर अशा दुकानांमध्ये मराठी ग्राहकांनी का म्हणून जावे? उद्योग आणि धंद्यासाठी मुंबईसारख्या विकसित शहरांमध्ये मोक्याची जागा हवी, मग तेथील स्थानिक भाषा का नको? जागेसोबत तेथील स्थानिक भाषेचा स्वीकार केला गेलाच पाहिजे. पालिकेची कारवाई होऊ नये म्हणून अनेक दुकानदारांनी रातोरात थातुरमातुर मराठी पाट्या लावल्या, पण काहींनी मराठी व्याकरणाची, तर पारच वाट लावलेली आहे. महाराष्ट्रात जर मराठी भाषेची एवढी गळचेपी होत असेल, तर अशा दुकानदारांवर मराठी ग्राहकांनी बहिष्कार का घालू नये? ग्राहकांच्या बहिष्कारानंतर तरी अशा बेशिस्त दुकानदारांना समज येईल आणि मराठी पाट्यांना गांभीर्याने घेतील.

- नितीन प्रकाश पडते, ठाणे (प.)

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश पाळा

कोणत्याही राज्यातील दुकाने, कार्यालये, इतर अस्थापनांमध्ये त्या त्या राज्याच्या भाषेचा वापर व्हावा, फलक त्या त्या भाषेत असावेत हा सर्वमान्य नियम असताना महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर येथील व्यापारी/उद्योजकांना त्यांनी आपले फलक मराठी भाषेत लिहिण्यासाठी वारंवार सांगावे लागते हे दुर्दैवी आणि राज्य भाषेचा अवमान करणारे आहे. परप्रांतीय व्यापारी जी मुजोरी महाराष्ट्रात करतात हे आपली अति सहिष्णू वृत्ती, आपणच आपल्या भाषेचा करत असलेला अनादर, भाषेविषयी अनास्था आणि आतापर्यंतची कुचकामी (मराठीबाबत आग्रही नसलेली) सरकारे यामुळे होते. राज्यभाषेचा असा अनादर हे व्यापारी महाराष्ट्राशिवाय इतर राज्यात करू शकतील का ? गेली ५०/६० वर्षे एकच प्रश्न घेऊन आंदोलन करावे लागणे ही लज्जास्पद गोष्ट होय. मुंबई उच्च न्यायालयाने मराठी भाषेत फलक लावण्याच्या दिलेल्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचे धाडस परप्रांतीय व्यापारी करतात आणि सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवल्यावर मुदत संपल्यानंतरही व्यापारी आदेशाची अंमलबजावणी करत नसतील तर तशा व्यापाऱ्यांचे परवाने सरकार जप्त का करत नाही ? मराठी भाषेच्या न्याय्य मागणीसाठी पक्षभेद विसरून सर्वपक्षीय नेते एकत्र का येत नाहीत ? सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या धंदे - उद्योगांवरून गाढवाचा नांगर फिरवा आणि तशी हिंमत होत नसेल तर त्या मुजोर, उद्दाम, हेकेखोर, मराठी द्वेष्ट्यांना धडा शिकवण्यासाठी मराठी जनतेला मोकळीक द्या. पक्षीय लाभ बाजुला ठेऊन याप्रश्नी कायम तोडगा काढा.
सर्वोच्च न्यायालयाने तुम्हाला तशी संधी दिलेली आहे. आता कच खाल्ली तर पुढे हे काम होणारच नाही. मुठभर व्यापाऱ्यांपुढे हतबल होऊन मान खाली घालू नका, उद्याची पिढी तुम्हाला माफ करणार नाही. मराठीचे मारेकरी बनू नका, उद्दाम, मुजोरांविरोधात धडक कार्यक्रम हाती घ्या नाहीतर बांगड्या भरा.

- मनमोहन रो. रोगे, ठाणे

मराठी भाषा आणि महाराष्ट्राचा हिसका दाखवावा!

मराठी भाषा ही महाराष्ट्र राज्याचे वैभव आहे. मराठी भाषेचे महात्म्य हे मराठी भाषेतील विपुल अशा महाराष्ट्रीयन साहित्य संपदेतून ठळकपणे दिसून येते. संतवाणी, संतसाहित्य, महाराष्ट्राची बखर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशाहीचा इतिहास, महाराष्ट्रात होऊन गेलेल्या समाजसुधारकांचे लेखन, फुले- शाहू- आंबेडकर विचारधारेचे साहित्य, नामांकित मराठी लेखक व कवींची श्रेष्ठ अशी लेखन संपदा मराठी भाषेची व महाराष्ट्राची शान वाढवते. मराठी भाषेचा गोडवा, मराठी भाषेची लिपी ही इतर भाषांपैकी नक्कीच उजवी व श्रेष्ठ अशी सुलभ आहे. त्यामुळे महाराष्ट्रात राहणाऱ्या व महाराष्ट्रात व्यवसाय करणाऱ्या लोकांनी आपल्या दुकानावर, कंपनीच्या दर्शनी भागावर मराठी भाषेतील पाट्या लावल्याच पाहिजेत; परंतु काही लोकांना इंग्रजी भाषेचे फार मोठे आकर्षण. त्यामुळे दुकानाची व कंपनीची नावे इंग्रजीत लिहिलेली दिसतात. परराज्यातील लोक काम व व्यवसायासाठी महाराष्ट्रात येतात. कौशल्याच्या जोरावर कामधंदा व व्यवसायात जम बसवितात. मग स्वतःची दुकाने किंवा कंपनी सुरू करतात. पण केवळ मराठी भाषेचा व महाराष्ट्रातील परंपरांचा तिरस्कार करण्याची वृत्ती सोडून देत नाहीत. म्हणून पुर्ण मुंबई सारख्या शहरांत व महानगरांत मराठी ऐवजी इतर भाषेतील पाट्या लावल्या जातात. ही वाईट व हिणकस वृत्ती मुळासकट उखडून टाकली पाहिजे. ज्या महाराष्ट्रात राहता त्या महाराष्ट्राच्या भाषेचा द्वेष करत असाल तर तुम्हाला वैभव संपन्न महाराष्ट्रात राहण्याचा कोणताही अधिकार राहत नाही. अशा वृत्तींना आळा घालण्यासाठी व मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील मराठी जनतेने सर्व दुकानदार व कंपनीला मराठी भाषेत पाट्या लावण्यासाठी सुचित करावे. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश असुनही कोणी महाभाग दुकानावर व कंपनीच्या दर्शनी भागावर मराठी भाषेत पाटी लावत नसेल, तर त्यांना तसे निक्षून सांगावे. तेवढ्याने फरक पडत नसेल, तर मग मराठीचा दणका आणि मराठीचा खाक्या हा दाखवलाच पाहिजे.

- बबन दामोदर गुळवे, उमरगा कोर्ट, ता. अहमदपूर, जि. लातूर

'पाटी'प्रश्न पालिका प्रशासनाने सोडवावा

मुंबईमधील मराठीपण दिवसेंदिवस हरवत चालले आहे. मग त्या दुकानांच्या पाट्या असोत किंवा वाहतूक बेटे, रस्ते, चौकांची नावे मराठी माणसांऐवजी परप्रांतीय माणसांची अधिक आहेत. मुंबई महाराष्ट्राला मिळावी म्हणून स्वातंत्र्याच्या लढ्यात १०७ मराठी शूरवीरांनी हौतात्म्य पत्करले. याचा विसर मुंबईमधील नेत्यांना पडला. हळूहळू रस्ते, चौक, वाहतूक बेटे यांना परप्रांतीयांच्या नावांचे फलक दिसू लागले. मुंबईतील परप्रांतीय नगरसेवकांची संख्या शंभरी पार गेली. असे असताना मुंबईतील दुकाने आणि आस्थापना यांचे फलकांत देवनागरी भाषेऐवजी अन्य भाषेचा वापर होत गेला. मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये दुकाने आणि आस्थापनांचे नामफलक देवनागरीत आणि ठळक अक्षरात दिसतील असे असावेत, असे असताना महापालिका प्रशासनाकडून कायद्याची अंमलबजावणी का झाली नाही? राजकीय पक्षांनी दुकानाच्या पाट्यांची तोडफोड केली, तर कार्यकर्त्यांवर पोलीस कारवाई होते, कार्यकर्ता नाहक अडकला जातो. यापेक्षा मुंबईतील मराठीपण टिकवण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या महापालिका प्रशासनास जाब विचारायला हवा. मराठी कार्यकर्ता गुन्ह्यात अडकणार नाही, याची खबरदारी सर्वच मराठी नेत्यांनी घ्यावी. मराठी तरुण आजही नोकरी, व्यवसायापासून दूर आहेत, त्यांच्या रोजगाराचा प्रश्न राजकीय पक्षांच्या मराठी नेत्यांनी सोडवावा. दुकानाच्या पाट्यांचा प्रश्न महानगरपालिका प्रशासनाकडून सोडवावा.

- महादेव गोळवसकर, लांजा - रत्नागिरी

स्थानिक भाषेतील पाट्यांचा 'दुराग्रह' व्यावसायिकांनी सोडावा

भारत स्वतंत्र झाला, तेव्हा भाषेच्या आधारावर राज्यांची निर्मिती केली गेली आणि त्रिभाषासूत्र स्विकारले गेले. स्थानिक भाषा, देशाच्या व्यवहाराची भाषा आणि आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजीचा वापर मान्य केला असला तरी देशात अनेक राज्यांत स्थानिक भाषेत व्यवहार, व्यवसाय व्हावेत, असा अट्टाहास अनेक राज्यात केला गेला. महाराष्ट्रात देखील मराठी भाषेला प्रोत्साहन मिळावे, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा तसेच मराठी भाषेचा अधिकाधिक वापर व्हावा यासाठी दुकानांचे फलक हे मराठी भाषेत असावेत, असा कायदा १९६१ साली करण्यात आला. मात्र कायद्याच्या अंमलबजावणीत सर्व पक्षीय राज्यकर्त्यांनी उदासीनताच दाखवली. पुन्हा २००८ साली सरकारने अध्यादेश काढला. मात्र त्याला काही दुकानदार यांनी विरोध केला आणि हा प्रश्न न्यायालयात गेला. दुकानांवरील पाट्या मराठीमध्ये असाव्यात यासाठी अनेक राजकीय पक्ष विशेषतः शिवसेना व मनसेने अनेक आंदोलने केली. मुंबई आणि महाराष्ट्रात जवळपास सर्वच ठिकाणी दुकानदार, व्यावसायिक आणि इतर उद्योगधंदे करणारे हे अमराठी भाषिक आहेत, मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर, कॉस्मोपॉलिटिन शहर असल्याने मराठी भाषेचा वापर करण्यास दुकानदार, व्यावसायिक गंभीर नाही. दुकानांवरील फलकावर मराठी भाषेचा वापर मोठा आणि ठळक असावा, यावर व्यावसायिकांचा मुख्य आक्षेप आहे. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाने राज्यात मराठी फलकांबाबत आदेश दिला आहे. झाले ते झाले आता तरी व्यावसायिकांनी मराठी भाषेचा दुराग्रह न करता लवकरात लवकर कोर्टाच्या आदेशाचे पालन करावे. स्थानिक भाषेत फलक असायलाच हवे. कर्नाटक, तामिळनाडू या दक्षिण भारतातील राज्यांत याचे पालन होते. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष, नेते यांनी आपापले हितसंबंध, राजकारण, वा इतर हेतू बाजूला ठेवून याबाबत आग्रही असायला हवे. राज्यात विशेषतः मुंबईमध्ये स्थानिक मराठी विरुद्ध इतर भाषिक तेढ निर्माण होऊन नाहक कटुता निर्माण होते. देशात कुणालाही कुठेही राहण्याचा, नोकरी, धंदा करण्याचा अधिकार आहे. मात्र त्या त्या राज्यांतील नियम हे पाळले गेलेच पाहिजे. मनसेने याबाबत प्रकरण तडीस नेले त्याचे श्रेय मनसेला द्यायलाच हवे. आता या वादावर पडून सर्वांनी एकोप्याने रहायला हवे, उद्योग, व्यावसाय करावा. आता पुन्हा एकदा मराठी पाट्यांचा विषय ऐरणीवर आला आहे. वास्तविक आपण ज्या राज्यांमध्ये व्यवसाय करतो तेथील स्थानिक भाषेचा मान राखला गेलाच पाहिजे, त्यासाठी न्यायालयानेच आदेश का द्यायला हवेत, कायद्याचा बडगा उगारण्याची वेळच का यावी, याचा व्यावसायिकांनी विचार करायला हवा.

- अनंत बोरसे, शहापूर, जि. ठाणे

मराठीद्वेष्ट्यांवर कठोर कारवाई करा

'कोणत्याही विक्रेत्याला महाराष्ट्रात व्यापार करायचा असेल, तर सरकारचे नियम पाळावे लागतील. तसेच मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा आहे. मराठी भाषा समृद्ध असून भाषेला स्वतःचा आणि वैविध्यपूर्ण असा सांस्कृतिक वारसा आहे, ज्याचा विस्तार साहित्य आणि रंगभूमीपर्यंत आहे. व्यापारी नाही, तर दुकानातील कर्मचारी आणि ग्राहकांना सर्वांनाच मराठी चांगली कळते' असे फटकारत काही महिन्यांपूर्वी दुकानांवरील मराठी पाट्यांच्या सक्तीविषयी घेतलेल्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देणाऱ्या व्यापारी संघटनेची याचिका न्यायालयाने २५ हजार रुपयांचा दंड लावून फेटाळून लावली होती. तरीही मराठी भाषेच्या विरोधात नेहमी कोर्टाची पायरी चढणाऱ्या व मराठी भाषेशी प्रतारणा करणाऱ्या व्यापाऱ्यांनी या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयानेही त्यांची याचिका फेटाळत २५ सप्टेंबर रोजी येत्या दोन महिन्यात दुकानांवर मराठी पाट्या लावण्याचे आदेश दिले. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशालाही हे मराठीद्वेष्टे व्यापारी जुमानत नसल्याचे लक्षात आल्यावर दोन महिने उलटल्यानंतर आता पालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे तो योग्यच आहे. वास्तविक पाहता अशा प्रकारचा भाषेचा प्रश्न नेहमी महाराष्ट्रातच का उद्भवतो? हाच खरा कळीचा प्रश्न आहे. कारण भारतीय राज्यघटनेनुसार भाषिक प्रांतरचना झाल्यामुळे देशातील विविध भाषिकांना भौगोलिक निकषावर आपापल्या भाषेचे राज्य मिळाले आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला देशातील कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचा संवैधानिक अधिकार असला तरी त्या भागातील भाषेचा, संस्कृतीचा उचित सन्मान करणेही राज्यघटनेला तितकेच अभिप्रेत आहे. मात्र महाराष्ट्र वगळता इतर राज्यात व्यापार, व्यवसाय करताना तेथील स्थानिक भाषेसमोर नतमस्तक होणारे परप्रांतातले व्यापारी महाराष्ट्रात एवढा रुबाब का करतात हे एक न उलगडलेले कोडे आहे. मुळात ज्या राज्याची जी भाषा आहे त्या भाषेत दुकाने, आस्थापने यांच्यावर त्या त्या भाषेत पाट्या असायला हव्यात इतका साधा नियम असताना त्याला विरोध करण्याचे कारण काय? अशा लोकांवर कठोर कारवाई केल्याशिवाय हे लोक वठणीवर येणार नाहीत.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी (पूर्व)

व्यापाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाची भीती नाही का?

नुकताच सर्वोच्च न्यायालयाने मुंबईसह राज्यातील अनेक दुकाने आस्थांपनावर अमराठी पाट्या झळकत आहेत. राजकीय पक्षांचा आक्रमक पवित्रा, न्यायालाचा आदेश असतानाही दुकानावरील मराठी पाट्यांसाठी सक्ती करावी लागते ही महाराष्ट्रासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल. ज्या राज्यात व्यापाऱ्यांनी अस्थापने, दुकाने थाटली आहेत, त्या राज्यांतील भाषेमध्ये पाट्या असायला काय हरकत आहे. सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनसुद्धा त्याचे पालन होत नसेल, तर न्यायालयाचा अपमान नव्हे का?, व्यापाऱ्यांना याची भिती नाही म्हणजे या मागे अदृश्य शक्ती कोणाची आहे का? याचा शोध घेतला पाहिजे. राज्यात असाल, तर तिथल्या भाषेत पाट्या असणे किंवा त्या ठिकाणी त्या भा

स्वागत दिवाळी अंकांचे

मोहिनीराज



नव साहित्यिकांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी सुभाष झेंडे यांनी पस्तीस वर्षांपूर्वी 'मोहिनीराज मासिक प्रकाशन' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून ते साहित्याचा प्रचार, प्रसार होण्याच्या उद्देशाने कवी संमेलने, साहित्यिक मेळावे, कार्यशाळा इत्यादी भरीव कार्यक्रम घेत असतात. त्यांच्या 'मोहिनीराज' हा दिवाळी अंकाचे हे सातवे वर्ष आहे. यात नवोदित साहित्यिकांचे विविध विषयांवरील साहित्य प्रकाशित केले जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाचा अंकही वाचनीय झाला आहे. यात सदानंद दळवी, शंकर घोगरे, प्रज्ञा कुळकर्णी, शुभा खांबेकर-पानसरे इत्यादींच्या कथा, एस. बी. कोल्हे, सुरेश देहेकर, अनुराधा घाणेकर, मृणाल केळकर इत्यादींच्या कविता आहेत, तर विविध लेख, रेसिपी आणि राशीभविष्याने हा अंक नटला आहे. ७२ पानांच्या या अंकाची किंमत १५० रुपये आहे.

भांडुप रेल्वे स्थानकावर अस्वच्छता...
भांडुप पश्चिम रेल्वे स्थानकावर अस्वच्छता निर्माण झाल्याने परिसरात मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला असून, दुर्गंधीही पसरत आहे. त्यामुळे मध्य रेल्वे प्रशासनाने येथील समस्या लवकरात लवकर सोडवावी.
- गणेश नारायण वराडे

वेचक

महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या अनुयायांच्या सोयी-सुविधांची मुख्यमंत्री शिंदे यांनी केली पाहणी

मुंबई (प्रतिनिधी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी राज्य शासन आणि मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या सोयी-सुविधांची पाहणी रविवारी(दि. ३ डिसेंबर) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. यावेळी चैत्यभूमी येथे जाऊन मुख्यमंत्र्यांनी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. सकाळी धारावी येथे मुंबई सखोल स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करून मुख्यमंत्री शिंदे दादर येथील चैत्यभूमीवर आले. यावेळी त्यांनी देशभरातून येणाऱ्या अनुयायांसाठी करण्यात आलेल्या सुविधांचा आढावा घेतला. महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येपासून ते ६ डिसेंबरपर्यंत आलेल्या अनुयायांच्या भोजनाची व्यवस्था करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. ज्याठिकाणी भोजनाची सोय करण्यात आली आहे त्याची पाहणी देखील त्यांनी यावेळी केली. आरोग्य व्यवस्था, स्वच्छता यासाठी त्यांनी महापालिका प्रशासनाला सूचना केल्या.

महानगरपालिकेने छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान 'राजगृह' यासह आवश्यक त्या विविध ठिकाणी सुसज्ज नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री शिवाजी पार्क येथे आले होते. यावेळी राज्य आणि देशभरातून आलेल्या अनुयायांशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला, त्यांच्या निवास आणि भोजनाच्या सुविधेची माहिती घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी येथील स्मारकाच्या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी देशभरातून येणाऱ्या अनुयायांना विश्रांतीसाठी छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे तात्पुरता निवारा, शामियाना उभारण्यात आला आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या निवाऱ्याची सोय म्हणून परिसरातील महानगरपालिकेच्या सहा शाळा निश्चित करण्यात आल्या आहेत. या शाळांमध्ये देखील आवश्यक त्या सर्व नागरी सेवा-सुविधा सुसज्ज ठेवण्यात आल्या आहेत. यावेळी आमदार सदा सरवणकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी, अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे आदी उपस्थित होते.

सफाई कामगार मुंबईचे खरे हिरो : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त मुंबईसाठी मुख्यमंत्र्यांची 'स्वच्छता मॅरेथॉन'

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मुंबई स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त करण्याच्या ध्यास घेतलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. ३ डिसेंबर) सकाळी साडेसहाला सुरू केलेला स्वच्छतेचा जागर दुपारी १२ वाजेपर्यंत सुरू होता. मुंबईतील विविध ठिकाणांना भेटी देत त्यांनी डीप क्लिन मोहिमेचा शुभारंभ केला. सायन, धारावी, कमला नेहरू पार्क, बाणगंगा, बीआयटी चाळ परिसर या भागांना भेटी देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेली स्वच्छतेची मॅरेथॉन जवळपास ६ तास सुरू होती. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी अंतर्गत रस्ते, गटारी, नालेसफाई, रस्त्यांची सफाई कामांची पाहणी केली तसेच जागोजागी सफाई कामगारांशी त्यांनी संवाद साधला. सफाई कामगार मुंबईचे खरे हिरो आहेत, असे गौरवोद्गारही मुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.

मुंबईत असलेल्या २४ वॉर्डमध्ये सखोल स्वच्छता मोहीम राबविली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एकाच वेळी एका वॉर्डमध्ये अन्य चार ते पाच वॉर्डातील सफाई कर्मचारी बोलावून सुमारे तीन ते चार हजार सफाई कामगारांच्या माध्यमातून रस्ते, गटारी, पदपथ, नालेसफाई या मोहिमेंतर्गत करण्यात येत आहे. या मोहिमेमुळे सफाई कामगारांचे जथ्थे रविवारी मुंबईच्या एफ उत्तर, जी उत्तर, डी वार्ड मध्ये दिसत होते. प्रत्येकाच्या हातात झाडू आणि जोडीला रस्ते धुणारी यंत्रे, फॉगर, स्मोक गन या अत्याधुनिक साहित्याच्या मदतीने स्वच्छतेचा जागर सुरू होता.

प्रदूषणमुक्तीवर उपाययोजना म्हणून रस्ते धुताना आधी त्यावरील माती उचलून मग उच्च दाबाने पाणी मारून रस्ते धुवावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

- मुख्यमंत्री शिंदे यांच्या संकल्पनेतून मुंबईत डीप क्लिन (सखोल स्वच्छता) मोहिमेचा रविवारी शुभारंभ झाला. धारावी टी जंक्शन येथून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. शालेय विद्यार्थी, सफाई कामगार यांच्याशी संवाद साधत मुंबईची स्वच्छता मोहीम ही लोकचळवळ झाली पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. नालेसफाई, रस्ते धुणे या कामांच्या पाहणीसाठी मुख्यमंत्र्यांनी बऱ्याच ठिकाणी पायपीट केली.
- गिरगाव चौपाटीवर पाहणीसाठी आलेल्या मुख्यमंत्र्यांना त्या ठिकाणी क्रिकेट खेळण्यासाठी आलेल्या बच्चे कंपनीने छायाचित्र काढण्याची विनंती केली. त्यांनी छायाचित्र घेतल्यानंतर मुलांनी मुख्यमंत्र्यांच्या हातात बॅट दिली आणि आमच्यासोबत खेळा अशी विनंती केली. त्याला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मुलांसोबत काही क्षण क्रिकेट खेळण्याचा आनंद घेतला.
- धारावी भागात मोहिमेला सुरुवात झाल्यानंतर या भागातील सार्वजनिक स्वच्छता गृह, शौचालये यांची दिवसातून पाच वेळा स्वच्छता करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिले. केवळ मुख्य रस्त्यांच्या स्वच्छतेवर भर न देता झोपडपट्टीतील अंतर्गत रस्ते, पदपथ यांची देखील साफसफाई करा. संपूर्ण मुंबईत सखोल स्वच्छता मोहीम यशस्वी राबविली, तर आमूलाग्र बदल दिसून येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.
- मुंबईतील सफाई कामगारांच्या ४८ वसाहतींचा कायापालट करण्यात येणार असून गौतमनगर, कासरवाडी येथील वसाहतींना भेटी मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. सायन हॉस्पिटल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मुख्यमंत्र्यांनी स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली.
- यावेळी दीपक केसरकर, मंगलप्रभात लोढा, आश्विनी भिडे, डॉ. अश्विनी जोशी, डॉ. सुधाकर शिंदे आदी उपस्थित होते.

'काँग्रेसला मत म्हणजे पाकला मत हे जनतेला कळले'

हिंदूराष्ट्र घडविण्यासाठी जनतेने भाजपाचा विजय केला

◆ कणकवली (प्रतिनिधी) :

कर्नाटकात काँग्रेसला मतदान झाले तिथे हिंदुत्ववादी समाजाची काय अवस्था झाली हे त्या निकालातून स्पष्ट झाले. काँग्रेसला मत म्हणजे पाकिस्तानला मत, काँग्रेसला मत म्हणजे जिहाद्यांना मत, हे सरळ स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आपल्या देशात हिंदुत्ववादी विचारच देशाला तारू शकतो, असा स्पष्ट संदेश जनतेने देत भारतीय जनता पार्टीचा राजस्थान, छत्तीसगड, मध्य प्रदेश येथे विजय करून दिला आहे, असे प्रतिपादन आमदार नितेश राणे यांनी केले. ते म्हणाले की, भारतीय जनता पार्टी हाच आपल्या देशाला महासत्तेच्या दिशेने घेऊन जाऊ शकतो आणि हिंदुत्ववादी विचार हा एकमेव विचार आपल्या राष्ट्रात चालू शकतो, याचे उत्तम उदाहरण या निवडणुकीच्या निकालावरून दिसून आलेले आहे.

भाजपा प्रवक्ते आमदार नितेश राणे यांचे प्रतिपादन

राजस्थान, छत्तीसगड, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपाचे उमेदवार विजयी झाले. याच पार्श्वभूमीवर कणकवली येथे भाजपाचे आमदार नितेश राणे व माजी आमदार प्रमोद जठार यांच्यासह भाजपाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून एकमेकांना मिठाई भरवित जल्लोष साजरा केला.

यावेळी आमदार नितेश राणे, माजी आमदार प्रमोद जठार, माजी नगराध्यक्ष समीर नलावडे, कलमठ सरपंच संदीप मेस्त्री, तालुकाध्यक्ष मिलिंद मेस्त्री, जिल्हा बँक संचालक विठ्ठल देसाई, बबलू सावंत, विजय चिंदरकर, समीर प्रभुगावकर, प्रज्वल वर्दम, विजय इंगळे, मेघा गांगण आदी उपस्थित होते.

यावेळी माध्यमांशी बोलताना आमदार नितेश राणे म्हणाले की, जो 'हिन्दू' हित की बात करेगा वही देश पर राज करेगा!, असा संदेश राजस्थान, छत्तीसगड, मध्य प्रदेश या राज्यांनी निवडणुकीच्या माध्यमातून दिलेला आहे. याबरोबरच तेलंगणामध्ये ५ वर्षे भाजपाचा १ आमदार होता त्या ठिकाणी आजच्या निकालामध्ये भाजपाचे एकूण ८ आमदार विजयी झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे विचार, आपल्या देशात एकच गॅरंटी चालते ती म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी. हे या निकालावरून सरळ स्पष्ट झालेले आहे. त्याबरोबरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सत्तेत असलेले सगळेच प्रमुख नेते यांनी राजस्थान, छत्तीसगड, मध्य प्रदेशमध्ये फिरून प्रचार केला, त्यामुळे हे घवघवीत यश भाजपाला आले आहे.

राऊत यांच्यावर बोलताना आमदार नितेश राणे म्हणाले की, संजय राऊतांना एक सवय आहे, लोक त्यांच्यावर थुंकल्याशिवाय त्यांची दिवस-रात्र होतच नाही, त्याला पर्याय नाही, ज्याने साधी सरपंचपदाची निवडणूक कधी लढविली नाही, तोच व्यक्ती जेव्हा सकाळी उठून मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगडमध्ये असे होणार, तसे होणार हे सांगत असतो, तर राऊत यांनी एखादी निवडणूक स्वतः पण लढवावी, असे आवाहनही राणे यांनी यावेळी केले.

तेलंगणामध्ये तिकडच्या जनतेने बीआरएस आणि केसीआरला नाकारले. तेलंगणात काँग्रेस जिंकली नाही, तिथे बीआरएसला पर्याय म्हणून काँग्रेसला मतदान केलेले आहे, असेही राणे यांनी सांगितले.

गिरगावातील आगग्रस्त इमारतीला मुख्यमंत्र्यांची भेट

मुंबई : गिरगाव चौपाटी येथील ७० ते ८० वर्षे जुनी म्हाडाच्या उपकरप्राप्त गोमती भवन इमारतीला शनिवारी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. काही वेळातच आग वाऱ्यासारखी पसरली आणि इमारतीत धुराचे लोण पसरले. आगीने रौद्ररूप धारण केल्याने तिसऱ्या मजल्यावर अडकलेले हिरेन शहा (६०) व नलिनी शहा (८२) या एकाच कुटुंबातील दोन वृद्धांचा मृत्यू झाल्याची दुदैवी घटना घडली. दरम्यान, मुंबई अग्निशमन दलाच्या जवानांनी इमारतीत अडकलेल्या ९ रहिवाशांची सुखरूप सुटका केली.

गिरगाव चौपाटी येथील रांगणेकर रोड येथे गोमती भवन ही चार मजली इमारत आहे. या इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर रात्री ९.३० वाजता आगीचा भडका उडाला. या ठिकाणच्या ज्वलनशील साहित्यामुळे ही आग भडकत गेली. यामुळे १० वाजताच्या सुमारास अग्निशमन दलाने ही आग लेव्हल - २ची जाहीर केली. आगीचा भडका यामुळे इमारतीत आगीचे धुराचे लोण पसरले होते.

गोखले रेल्वे उड्डाणपुलाचा पहिला गर्डर स्थापित

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

गोखले पुलाचा पहिला गर्डर स्थापन करून येत्या १५ दिवसात या पुलाची तांत्रिकदृष्ट्या सर्वाधिक आव्हानात्मक कामे पूर्ण होणार आहेत, त्यामुळे दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत गोखले पुलाची एक मार्गिका खुली करणे शक्य होईल, असा विश्वास आमदार अमित साटम यांनी रविवारी (दि. ३ डिसेंबर) व्यक्त केला.

अंधेरीतील गोपाळ कृष्ण गोखले रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या पहिला गर्डर स्थापित करण्याचे काम हे शनिवारी मध्यरात्रीनंतर पार पडले.

रेल्वे परिसरातील ७.५ मीटर उंचीवरून पूल खाली आणण्यासाठी पश्चिम रेल्वेने ११ दिवसांच्या ब्लॉकचा कालावधी मंजूर केला आहे. पश्चिम रेल्वेच्या विशेष ब्लॉकमध्ये दररोज रात्रीच्या वेळेतील तीन तासात सरासरी ५५० मिमी इतक्या प्रमाणात गर्डर हा खाली आणणे शक्य होईल, असे उल्हास महाले यांनी सांगितले.

कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

◆ अलिबाग (प्रतिनिधी) :

श्रीवर्धन तालुक्यातील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर, अंतर्गत श्रीवर्धन शहर पाणीपुरवठा योजना आणि प्रादेशिक पर्यटन विकास) योजनेंतर्गत श्रीवर्धन बीच सुशोभीकरण कामांचे लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रविवारी (३ डिसेंबर) करण्यात आले. त्यावेळी कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र याठिकाणच्या शेतकऱ्यांना सोयाबीन, कांदा, टोमॅटोसाठी शासनाकडून मदत दिली जाते, त्याप्रमाणे कोकणातील शेतकऱ्यांना देखील मदत करणार असल्याची घोषणा पवार यांनी यावेळी केली. कोकणातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर कर्ज घेत नाहीत. आंबा, काजू, नारळ, सुपारी यांच्या बागा व फळांची पिके घेऊन कोकणातील शेतकरी आपला उदरनिर्वाह करीत असतो. या शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासन विशेष प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

कोकण किनारपट्टीला वादळाचा फटका बसल्यानंतर खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यासाठी वादळात टिकतील अशी निवारा केंद्रे शासनाकडून बांधली जाणार आहेत. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी अनेक दिवसांचा कालावधी लागतो. त्यासाठी संपूर्ण कोकणामध्ये अंडरग्राउंड इलेक्ट्रिसिटी लाइन करण्याचा निर्णय घेतला असल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

या लोकार्पण सोहळ्यास खा. सुनील तटकरे, आ. अनिकेत तटकरे, राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, मुख्याधिकारी विराज लबडे, प्रांताधिकारी डॉ. दीपा भोसले, तहसीलदार महेंद्र वाकलेकर आदी उपस्थित होते.

जय्यत तयारी

छाया : अरुण पाटील

मुंबईतील इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि पुतळ्याच्या कामात कामगार व्यस्त झाले आहेत. यासोबतच डॉ. बाबासाहेब यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशातील विविध ठिकाणांहून नागरिकांचे दादर येथील चैत्यभूमी परिसरात आगमन सुरू झाले आहे.

सोनोग्राफी, डायलिसिसची सुविधाही वाढविणार

सायन रुग्णालयात लवकरच १२०० खाटा होणार उपलब्ध

◆ मुंबई (वार्ताहर) :

सायन हॉस्पिटलमध्ये २०० खाटांचा अतिदक्षता विभाग आणि एक हजार खाटांच्या सर्वसाधारण कक्षाचे काम सुरू असून, लवकरच ते पूर्ण होईल, त्यामुळे नव्याने १२०० खाटा उपलब्ध होतील, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

तुम्हाला रुग्णालयात औषधे मिळतात का, बाहेरून आणावी लागत नाही ना, ट्रीटमेंट कशी सुरू आहे, वेळेवर जेवण मिळते ना... सायन हॉस्पिटलमधील रुग्णांशी आणि त्यांच्या नातेवाइकांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संवाद साधला. रविवारी महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक रुग्णालयाला मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. त्यावेळी त्यांनी ट्रॉमा आयसीयू, सर्वसाधारण वॉर्ड, वॉर्ड क्रमांक चार येथे पाहणी करताना रुग्णांची विचारपूस केली आणि दिलासा दिला. यावेळी त्यांनी अचानक रुग्णालयाच्या स्वयंपाक गृहालाही भेट देऊन तेथील अन्नपदार्थांची पाहणी केली.

मुंबईच्या सखोल स्वच्छता मोहिमेच्या शुभारंभासाठी आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक रुग्णालयाला सकाळी सातच्या सुमारास भेट दिली.

सायन रुग्णालयात सुरू असलेल्या इमारतींच्या कामाला गती द्यावी, पुढच्या भेटीत कामाची प्रगती आढळली पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी याभेटी दरम्यान निर्देश दिले. रुग्णालयात सोयी-सुविधा वाढविण्यात येत असून, त्या कालमर्यादेत पूर्ण कराव्यात. रुग्णांना वेळेत आरोग्यसेवा मिळण्याबाबत रुग्णालय प्रशासनाने प्रयत्न करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. सोनोग्राफी आणि डायलेसिस सेवा देण्यासाठी उपकरणांची वाढ करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये झिरो प्रिस्क्रीप्शन संकल्पना राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे, जेणेकरून औषधांसाठी रुग्णांना बाहेर जावे लागणार नाही, असे मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

रुग्णालयाची पाहणी करून तेथील रुग्णांशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. उत्तम आरोग्य सुविधा देण्यासाठी शासन प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. याबरोबरच त्यांनी रुग्णालयातील सामान्य विभागासह अतिदक्षता विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णांशी संवाद साधला. रुग्णांना मिळत असलेल्या उपचारांची माहितीही त्यांनी घेतली. रुग्णांची गैरसोय होते का याविषयी देखील मुख्यमंत्र्यांनी जाणून घेतले.

भेटी दरम्यान मुख्यमंत्र्यांनी सायन रुग्णालयाचा परिसर पिंजून काढला. प्रत्येक वॉर्डात जाऊन त्यांनी माहिती घेतली. उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे कौतुक करतानाच रुग्णाला वेळेवर औषध, जेवण मिळेल यासाठी प्रशासनाला सूचना केल्या. मुख्यमंत्री पाहणीसाठी आले याचा रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद होता, तर एका वॉर्डात तर एका रुग्णाने चक्क मुख्यमंत्र्यांसोबत सेल्फीही घेतली.

दि. १ ते ४ डिसेंबर दरम्यान २६ कलाकारांच्या कलाकृतींचे चित्र - शिल्प प्रदर्शन

सिमरोझा आर्ट गॅलरीत अमलगमेशन 11 या समूह प्रदर्शनाचे आयोजन

◆ मुंबई (वार्ताहर) :

एक्स्पोपीडिया या संस्थेतर्फे 'अमलगमेशन ११' या प्रदर्शनाचे आयोजन मुंबई येथील सिमरोझा आर्ट गॅलरी, ७२ भुलाबाई देसाई रोड, मुंबई येथे दि. १ ते ४ डिसेंबर २०२३ दरम्यान करण्यात आले आहे. या प्रदर्शनात विविध मान्यवर चित्रकारांच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती कलारसिकांना पाहता येतील. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्ये सांगणाऱ्या विविध कलाकृती एकाच छताखाली प्रेक्षकांना पाहता येतील.

प्रदर्शनाचे उद्घाटन दि. १ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६.३० वाजता झाले असून, या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विख्यात वास्तुविशारद आणि विधान परिषद सदस्य अनंत गाडगीळ उपस्थित होते. त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून अजयकांत रुईया, ऑल स्टेट ग्रुपचे अध्यक्ष आणि इंडो व्हिएतनामी चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष आणि महेंद्र कलांत्री, संचालक, ॲक्लेम सिस्टीम्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांनी कार्यक्रमाची शोभा वाढविली.

या प्रदर्शनात सहभागी चित्रकारांनी आपल्या वैविध्यपूर्ण आणि विविध माध्यमांतील कलाकृती या प्रदर्शनात सादर केल्या आहेत. यामध्ये वास्तववादी, अमुर्त शैलीतील चित्रे, निसर्ग चित्रे, एक्सप्रेशनिस्ट, फायबर, मिक्स मीडिया अशा विविध माध्यमांतील आशयघन कलाकृतींचा समावेश होतो. चित्र आणि शिल्प अशा दोन्ही माध्यमातील कलाकृती प्रेक्षकांचा आनंद द्विगुणित करतील. दृश्यभानाविषयी प्रेक्षकांना सजग करतील. स्थापत्यशास्त्रातील त्यांचे योगदान कलात्मक प्रदर्शनासाठी एक अद्वितीय दृष्टिकोन आणेल.

कला ही जशी आनंददायक असते तशीच जीवनमूल्यांचे दर्शन घडविणारी असते. कलाकृती पाहताना केवळ रंग, आकार यांचा सुरेख मिलाफच नाही, तर कलाकाराची जीवनदृष्टीही कलाकृतीतून पाहता येते आणि या दोहोंचा संगम कलाकारांसाठी उपलब्ध करून देणे हाच या प्रदर्शनाचा उद्देश आहे.

हे प्रदर्शन प्रेक्षकांसाठी सकाळी ११ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत खुले राहील. विविध माध्यमांतील आशयघन कलाकृतींचा आनंद घेण्यासाठी चुकवू नये असेच हे प्रदर्शन आहे.

या समूह प्रदर्शनात प्रकाश बाळ जोशी, विनोद व्यंकपल्ली, ओम स्वामी, सोनाली कोरडे, आसित कुमार पटनाईक, योगिनी शर्मा, उमेश कुमार, स्मिता साहू, बी.आर. पंडित, शालू परसरामपुरिया, माया मेनन, श्यामा नदीमपल्ली, राखी शाह, मिनी सुबोथ, कादंबरी मेहता, प्रा. मंगल गोगटे, अलका पांडे, डॉ. प्रिया याबलुरी, सीमा हेडाऊ, प्रियल ठक्कर, सेल्वे सिंग, कौशल पारीख, साक्षी बबारिया, रचना आघा, अविजित रॉय, कविता भंडारी या चित्रकारांच्या कलाकृती प्रदर्शित होणार आहेत. या प्रदर्शनाच्या संयोजक अपरिमिता सप्रू या आहेत.

प्रहार ठाणे/नवी मुंबई

www.prahaar.in
epaper.prahaar.in
@PrahaarNewsLive

वेचक

तुर्भे येथे टेम्पोमध्ये कांदा बटाट्याची बेकायदेशीर विक्री

नवी मुंबई : भाजीपाला एपीएमसी मार्केटसमोरचा अत्यंत वर्दळीचा रस्ता अडवून टेम्पोमध्ये कांदा बटाट्याची बेकायदेशीररीत्या विक्री केली जात आहे. तुर्भे विभाग कार्यालयाअंतर्गत भाजी मार्केटच्या विरुद्ध बाजूकडील रस्ता ते धान्य मार्केटच्या आवक गेटपर्यंत २० ते २५ कांदे बटाटे विक्रेते चक्क रस्त्याची १ लेन (मार्गिका) हडप करून टेम्पोमध्ये मालाची विक्री करत आहेत. विशेष म्हणजे पालिकेच्या अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, १० ते १५ सुरक्षा रक्षक आणि हाकेच्या अंतरावर असलेले वाहतूक पोलीस यांच्या समोरच दिवसभर ही मंडळी व्यवसाय करत आहेत. त्यामुळे पालिकेच्या कारवाई वर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एपीएमसी सिग्नल ते भाजीपाला मार्केट जावक गेट, याच जावक गेटच्या विरुद्ध बाजूचा सर्व्हिस रोड, एपीएमसी सिग्नल ते कांदा बटाटा मार्केट आवक गेट, एपीएमसी वाहतूक पोलीस चौकी ते मसाला मार्केटला जाणाऱ्या नाल्यावरील पादचारी पूल, माथाडी भवन ते जलाराम मार्केट चौक, सानपाडा हायवे सिग्नल ते एपीएमसी सिग्नल येथील पदपथ आणि रस्ता यांवर फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. त्यामुळे एपीएमसी मार्केट मध्ये येणारे कामगार, खरेदीदार आदी पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून चालावे लागत आहे. परिणामी अनेकदा किरकोळ आणि गंभीर स्वरूपाचे अपघात होत आहेत.

ऐरोलीत महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला दिलीप मंडल यांचे व्याख्यान

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेचे ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे अल्पावधीतच बाबासाहेबांच्या 'ज्ञान हीच शक्ती' या विचारांवर आधारलेले आगळेवेगळे 'ज्ञानस्मारक' म्हणून नावाजले जात आहे. आज ५ डिसेंबर रोजी स्मारकातील सुविधा लोकार्पणाला दोन वर्षे पूर्ण झाल्याच्या आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला त्यांच्या प्रेरणादायी स्मृतींना वैचारिक आदरांजली अर्पण करण्यासाठी 'विचारवेध' या व्याख्यान शृंखलेंतर्गत सायं. ६.३० वा. सुप्रसिद्ध विचारवंत व लेखक दिलीप मंडल यांचे, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्र निर्माण' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील सभागृह, मुलुंड - ऐरोली खाडी पुलाजवळ, सेक्टर १५, ऐरोली, नवी मुंबई येथे आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.
ऐरोली, नवी मुंबईतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात ई लायब्ररीसह पुस्तकांनी संपन्न ग्रंथालय, बाबासाहेबांचे दुर्मीळ छायाचित्रातून जीवनदर्शन घडवणारे विशेष दालन, बाबासाहेबांच्या भाषणाचा प्रत्यक्ष अनुभव देणारा होलोग्रफिक प्रेझेंटेशन शो, अभिनव भव्यतम ध्यानकेंद्र या साऱ्या सुविधांचा अनुभव घेत बाबासाहेबांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी या स्मारकालाही आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

नमुंमपा राबवित आहे 'स्वच्छ शौचालय अभियान'

नवी मुंबई : स्वच्छतेमध्ये देशातील तृतीय क्रमांकाच्या स्वच्छ शहराचा बहुमान लाभलेली नवी मुंबई महानगरपालिका केंद्र व राज्य शासनाच्या सर्वच अभियानांमध्ये पुढाकार घेऊन काम करताना दिसते. अशाच प्रकारे केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या 'स्वच्छ शौचालय अभियान' कार्यक्रमातही महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका उत्साहाने सहभागी झालेली आहे.
या अभियानाला १९ नोव्हेंबर या जागतिक शौचालय दिवसापासून प्रारंभ झाला असून २५ डिसेंबर या सुशासन दिनापर्यंत हे अभियान चालणार आहे. या पाच आठवड्यांच्या कालावधीत सर्व शौचालयांमध्ये स्वच्छता व देखभाल विशेष मोहीम राबवली जाणार असून शौचालयांमध्ये FACES अर्थात Functional, Accessibility, Clean, Eco-friendly आणि Safe अशाप्रकारे 'कार्यान्वित, प्रवेशयोग्य (त्वरित उपलब्ध), स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित' अशा बाबींनुसार शौचालय तपासणी करण्यात येणार आहे.
या अभियानांतर्गत महिला बचत गटांद्वारे शौचालयांची तपासणी करण्यात येणार असून त्याची वर्गवारी केली जाणार आहे. यासाठी महिला बचत गटांची नियुक्ती करून त्यांना रितसर प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे तपासणी समूह दिलेल्या निकषानुसार मूल्यांकन करून शौचालयांना श्रेणी देतील.
याप्रमाणेच 'स्वच्छ शौचालय चॅलेंज' जाहीर करण्यात आले असून ५ डिसेंबर ते १५ डिसेंबर हा या अभियानाचा कालावधी आहे. या अंतर्गत स्वच्छ शौचालयांना 'स्वच्छ भारत सार्वजनिक शौचालय' असा गुणवत्तेचा दर्जात्मक शिक्का प्राप्त होणार आहे.
अभियानाच्या अनुषंगाने काल नमुंमपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे यांनी विविध शौचालयांना भेटी देऊन तेथील केअरटेकरना चांगले काम करण्याच्या सूचना देऊन स्वच्छतेची आणि सुविधांची पाहणी केली.
शिवाय तृतीयपंथींसाठी स्वतंत्र शौचालय, माहिती शिक्षण व प्रसारासाठी वॉल स्ट्रक्चर उभारणी, शौचालयांची देखभाल करणाऱ्या केअरटेकरला बेस्ट केअर टेकर पुरस्कार देऊन गौरविणे असे नानाविध उपक्रम राबविणार आहे.

मेट्रो कारशेडमुळे भाईंदरकर उद्ध्वस्त होण्याच्या वाटेवर

प्रताप सरनाईक, गिल्बर्ट मेंडोंसा यांच्यासह नागरिकांची एमएमआरडीएवर धडक

◆ भाईंदर (प्रतिनिधी) :

मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (एमएमआरडीए)च्या माध्यमातून मेट्रो रेल्वे मार्ग ९ या प्रकल्पासाठी कारशेड बनविण्याचे प्रस्तावित आहे. ही कारशेड मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे डोंगरी सर्वे नंबर १९, एकूण क्षेत्र ५९.७९ हेक्टर ही शासकीय जमीन मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. या जमिनीकडे जाण्यासाठी मुर्धा, राई, मोर्वा आणि डोंगरी या गावातील ग्रामस्थांच्या, शेतकऱ्यांच्या मालकीच्या शेतजमिनी आणि राहती घरे, १०० वर्षांपूर्वीचे चर्च प्रार्थनास्थळ मोठ्या प्रमाणावर बाधित होणार असल्याने या परिसरातील हजारो ग्रामस्थांमध्ये नैराश्य आणि भीतीचे वातावरण पसरले आहे.

या अन्यायग्रस्त ग्रामस्थ बांधवांच्या हाकेला प्रतिसाद देत माजी आमदार गिल्बर्ट मेंडोंसा आणि आमदार प्रताप सरनाईक हे धावून आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठवितानाच मेंडोंसा आणि सरनाईक यांनी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण आयुक्त संजय मुखर्जी यांची भेट घेतली व ग्रामस्थांचे गाऱ्हाणे त्यांच्या कानी घातले. मौजे डोंगरी सर्वे क्रमांक १९ क्षेत्र ५९.७९ हेक्टर या जमिनीतील काही भाग अंदाजे ६२ गुंठे ही जमीन फातिमा माता इरमित्री तीर्थमंदिर चर्चच्या ताब्यात १०० वर्षांपूर्वीपासून असून ती शासकीय जमीन चर्चच्या नावे कायमस्वरूपी देण्यात यावी, मेट्रो मार्गिका क्रमांक ९ करिता कारशेड डेपोकडे जाण्यासाठी सुभाषचंद्र बोस मैदान, मौजे मुर्धा, राई, मोर्वा या दाट वस्तीच्या सध्याच्या नियोजित मार्गे न आणता पर्याय म्हणून सदरहू नियोजित मार्गाला समांतर असा व मीरा-भाईंदर विकास आराखड्यात मंजूर ३० मीटर डीपी रस्ता करून सुभाषचंद्र मैदान ते खोपरा या मार्गे सदरहू मेट्रो मार्ग नेण्यात यावा, जेणेकरून मंजूर १८ मीटर डीपी रोड ऐवजी परंपरागत गावातील राहती घरे विस्थापित होणार नाहीत, असे या निवेदनात म्हटले आहे. राई, मुर्धा, मोर्वा संघर्ष समितीचे अध्यक्ष, डोंगरी ग्रामस्थ, फातिमा माता चर्च प्रतिनिधी शिष्टमंडळात सहभागी झाले होते. आयुक्त संजय मुखर्जी यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतले आणि या हजारो ग्रामस्थांवर कोणताही अन्याय होणार नाही, याची सुस्पष्ट ग्वाही दिली.

नागरिकांची पुनर्वसानाचीही मागणी

मेट्रो कारशेडच्या शासकीय जागेत जाण्याआधी डोंगरी एलकेनपाडा या ठिकाणी मालकी जमिनी व निवासी घरे आहेत, त्यांना योग्य तो मोबदला तसेच त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे; शासकीय जागेत ग्रामपंचायत काळापासून काही क्षेत्रात भाजीपाला व फळझाडे लागवड असून त्यांना इतक्या वर्षांचा वहिवाटीचा मोबदला देण्यात यावा, अशा मागण्या मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण आयुक्त संजय मुखर्जी यांच्याकडे गिल्बर्ट मेंडोंसा आणि प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केल्या.

५३ सायबर गुन्ह्यात टोळीचा सहभाग

नोकरीचे आमिष दाखवून फसवणारी टोळी अटकेत

◆ नवी मुंबई (प्रतिनिधी) :

टेलीग्रामद्वारे पार्टटाइम जॉब मिळवून देण्याच्या बहाण्याने जास्त फायदा मिळून देण्याचे प्रलोभन दाखवून वेगवेगळे टास्क पूर्ण करण्यास देऊन फसवणूक करणाऱ्या टोळीतील तिघांना नवी मुंबई सायबर पोलिसांनी अटक केली आहे. तसेच त्यांच्याकडून १२ मोबाइल फोन, २१ सिमकार्ड, १३ डेबिट कार्ड, ८ चेकबुक, १४ विविध कंपन्यांच्या नावाचे शिक्के, ४ गुमास्ता लायसन्स, ३ उद्यम प्रमाणपत्र जप्त केले आहेत. या आरोपींचा व त्यांच्या साथीदारांचा देशातील विविध राज्यातील एकूण ५३ सायबर गुह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सायबर पोलिसांना या टोळीच्या बँक खात्यातील तब्बल ८४ लाख ९५ हजाराची रक्कम गोठवण्यात यश आले आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांमध्ये रणविरसिंग नरपतसिंग कानावत (२८), अमरजित प्रकाश यादव (२१) व जितेंद्र पुरणचंद मांडैया (२१) या तिघांचा समावेश असून हे तिघेही राजस्थानातील आहेत. या आरोपींनी व त्यांच्या इतर साथीदारांनी नेरुळ येथील हावरे सेंचुरियन मॉलमध्ये एज्युकेशन किट विकण्याच्या बहाण्याने शॉप भाड्याने घेतले होते. त्यानंतर या टोळीने ज्युनिअर एज्युटेक नावाची बोगस कंपनी तयार करून त्या ठिकाणी बोगस कॉल सेंटर सुरू करून फसवणुकीचे प्रकार सुरू केले होते.

सायबर पोलिसांनी आता या टोळीतील मुख्य आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. या गुन्ह्याचा तांत्रिक तपास हा सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विजय आयरे, पोलीस शिपाई अमोल कर्डिले व पोलीस शिपाई पुनम गडगे यांनी करून सदर गुन्हा उघडकीस आणला आहे.

रस्त्याच्या कामात अडथळा आणणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल

◆ कल्याण (वार्ताहर) :

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील उंभार्ली ते मानपाडा रस्त्याच्या कामात अडथळा आणीत शिवीगाळ केल्याप्रकरणी आय प्रभागाचे सहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी मानपाडा पोलीस स्थानकात शुक्रवारी शिवीगाळ करणाऱ्या महिलेविरोधात गुन्हा दाखल केला.

केडीएमसीच्या आय प्रभागात एमएमआरडीएमार्फत चालू असलेल्या उंभार्ली ते मानपाडापर्यंतचा रस्ता काँक्रिटीकरण करण्याचे काम चालू होते. तेथे काही लोकांनी विरोध केला व एक महिला अंगावर धावत आली. तसेच जेसीबी चालकाला व पोलीस कर्मचारी यांना शिवीगाळ केले व काम थांबवले. त्यामुळे या महिलेवर मानपाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी दिली. या रस्त्याचे काम ठेकेदारामार्फत चालू ठेवण्यात आले असल्याचे सांगितले.

'बिझनेस जत्रा-२०२३' चे उद्घाटन संपन्न

◆ ठाणे (वार्ताहर) :

लक्षवेध इन्स्टिट्यूट आयोजित व जॉय ई बाईक प्रस्तुत बिझनेस जत्रा २०२३ चा उदघाट्न सोहळा शुक्रवारी सकाळी टीप टॉप प्लाझा येथे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी आमदार प्रताप सरनाईक, शिवसेना प्रवक्ते नरेश म्हस्के, आमदार निरंजन डावखरे, भाजपचे संदीप लेले, जिजाऊ शैक्षणिक, सामाजिक संस्थेचे नीलेश सांबरे, माजी खासदार संजीव नाईक, ॲड. संदीप केकाणे, डॉ. विपीन शर्मा आदी मान्यवर हजर होते. तर उद्योग जगतातील यशस्वी उद्योजक मोठ्या प्रमाणात हजर होते.

या वेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्री रोजगार योजना, पंतप्रधान विश्वकर्मा योजना यशस्वी करण्यासाठी खासगी उद्योग क्षेत्राने पुढे यावे, असे आवाहन केले. तसेच विशेष बाब म्हणजे या वेळी आमदार प्रताप सरनाईक यांच्या हस्ते घनकचरा व्यवस्थापन गाडीचे उदघाट्न करण्यात आले. या बिजनेस जत्रेत १२० पेक्षा जास्त उद्योगांचे प्रदर्शन स्टॉल उभारण्यात आले आहेत. तीन दिवसांच्या या प्रदर्शनाची आज सांगता होईल.

जैत रं जैत...

तीन राज्यांतील विजयानिमित्त भाजपा कार्यकर्त्यांचा जल्लोष

◆ ठाणे / मीरा-भाईंदर / कल्याण (वार्ताहर) :

राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड या राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल ठाणे, मीरा-भाईंदर आणि कल्याणमध्ये भाजपा कार्यालयात भाजपा कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी कार्यकर्त्यांनी ढोल ताशांच्या गजरात नाचत, महिलांनी फुगड्या घालत, एकमेकांना पेढे भरवत आनंद व्यक्त केला. भाजपाची या तिन्ही राज्यांत वापसी झाली असून, नरेंद्र मोदींचा करिष्मा असून त्यांच्या नेतृत्वाखाली जी विकासाची गंगा वाहत आहे त्याला जनतेने भरभरून यश दिले आहे, अशी भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. चार राज्यातील मतमोजणी सुरू झाल्यापासून भाजापा आघाडी घेत असल्याने ठाणे, मीरा-भाईंदर व कल्याणमध्ये आनंदाला उधाण आले होते. भाजपाला मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ या राज्यात मिळालेल्या अभूतपूर्व यशाचा आनंद साजरा करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा कार्यालयात दुपारनंतर अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी जमू लागले होते. निकाल जाहीर झाल्यानंतर कार्यकर्त्यांच्या आंनदाला भरते आले व त्यांनी जल्लोष साजरा केला.

छाया : अशोक घाग

नव्याने कर्मचारी भरती होऊन, जे. जे. रुग्णालयाचा हिरवा झेंडा मिळूनही मुहूर्त नाही

शास्त्रीनगर रुग्णालयाचा शवविच्छेदन विभाग लालफितीत अडकून

◆ कल्याण (वार्ताहर) :

कल्याण-डोंबिवली व ग्रामीण भागातील तसेच विविध रुग्णालयातील, रेल्वे अपघातातील अकस्मात मृत्युमुखी पडलेल्यांचे शवविच्छेदन करण्याचा भार पालिकेच्या कल्याण येथील रुक्मिणीबाई रुग्णालयावर पडत आहे. पालिकेच्या डोंबिवली येथील शास्त्रीनगर रुग्णालयात पालिका प्रशासनाने याबाबत स्वतंत्र शवविच्छेदन विभाग सर्व सोयी सुविधांनी गेल्या वर्षभरापासून उभारला असतानाही परवानगीची फाइल मंत्रालयाच्या लाल फितीत अडकल्याची माहिती डॉक्टरांच्या विश्वसनीय सूत्रांकडून समोर येत आहे. शासनाच्या या धोरणामुळे डोंबिवली व आजूबाजूच्या नागरिकांना मात्र शवविच्छेदन येथे होत नसल्याने मोठा मनस्ताप भोगावा लागत आहे.
कल्याण-डोंबिवली महापालिकेची दोन प्रमुख रुग्णालये असून यात रुक्मिणीबाई रुग्णालय कल्याणात तर डोंबिवलीत शास्त्रीनगर रुग्णालय आहे. कल्याण नगर परिषद झाल्यापासून रुक्मिणीबाई रुग्णालयात स्वतंत्र शवविच्छेदनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे, ती अद्यापपर्यंत सुरू आहे. डोंबिवली शहर परिसर तसेच ग्रामीण भाग आणि कल्याण परिसरातील शहर तसेच ग्रामीण भागातील मृतदेहांचे विच्छेदन या ठिकाणी केले जाते. रेल्वे अपघात, आत्महत्या, हत्येचे प्रकार, अकस्मात मृत्यू याबाबत येथे सतत शवविच्छेदन केले जात असून गतअवघ्या ११ महिन्यात किमान साडेअकराशेच्या आसपास रुक्मिणीबाई रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आल्याचे डॉक्टरांकडून सांगितले जात आहे, तर शासनाचे कल्याण शेजारीच असणाऱ्या उल्हासनगर येथील सेंटर रुग्णालयाचा वार्षिक पोस्टमार्टमचा आकडा पाचशे ते साडेपाचशेच्या आसपास असल्याची माहिती मिळून येत आहे.
शास्त्रीनगरच्या नव्याने बांधण्यात आलेल्या शवविच्छेदनाच्या सुविधेसाठी पालिका प्रशासनाने नव्याने कर्मचारी भरती केली आहे. मुंबई येथील जे. जे. रुग्णालयाच्या चेअरमन विभागातील डॉक्टरांच्या स्वतंत्र टीमने शास्त्रीनगर रुग्णालयाने बांधलेल्या शवविच्छेदन विभागाला भेट दिली होती. त्यांनी याबाबत अवलोकन करीत वास्तूला हिरवा झेंडा देऊन आता सहा महिन्याचा काळही संपुष्टात आला आहे. प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

महिला प्रवाशांचे दागिने चोरणाऱ्या दोघांना अटक

◆ कल्याण (वार्ताहर) :

काही दिवसांपूर्वी रेल्वे प्रवासादरम्यान प्रवाशांचे दागिने चोरीच्या दोन घटना घडल्या होत्या. याप्रकरणी रेल्वे क्राइम ब्रँचने दोन सराईत चोरट्यांना अटक केली आहे. डोंबिवली ते सीएसटी प्रवासादरम्यान रेल्वे स्थानकात महिलांच्या महागडे दागिने हिसकावून दोन चोरटे पसार झाले होते. सीसीटीव्हीच्या सहाय्याने रेल्वे पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी हर्षद शेख यांचे पथक चोरांचा शोध घेत होते. तपासादरम्यान एक आरोपी निष्पन्न झाला. त्यानंतर पोलिसांनी पुढील तपास सुरू केला. अखेर या चोरट्याच्या साथीदाराला देखील उत्तर प्रदेशहून अटक करण्यात आली.

अमन खरवार आणि रोहित यादव अशी या चोरट्यांची नावे आहेत. हे दोघेही उत्तर प्रदेशातील राहणारे आहे. सीसीटीव्हीच्या सहाय्याने आधी अमनला अटक करण्यात आली. अमनने सांगितल्यावर पोलिसांचे एक पथक उत्तर प्रदेशात गेले. त्यानंतर रोहितला अटक करण्यात आली. या दोघांकडून चोरी केलेले महागडे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत. या दोघांनी आणखी गुन्हे केले आहेत का? याचा तपास आता पोलीस करीत आहेत.

वेचक

तुळसवडे येथे विकासकामाचे भूमिपूजन संपन्न

राजापूर (वार्ताहर) : राज्याचे माजी कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्या शिफारशीनुसार जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी जिल्हा नियोजन योजनेमधून जनसुविधा कार्यक्रमअंतर्गत तुळसवडे गावातील वडाचा माळ येथे स्मशानभूमी शेड मंजूर करून दिली. त्याचा भूमिपूजन सोहळा शनिवारी गावकऱ्यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी सदाभाऊ खोत यांचे स्वीय सहाय्यक आदिनाथ कपाळे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, उद्योजक किरण सामंत, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांचे निधी मंजूर करून दिल्याबद्दल आभार मानले. या कार्यक्रमाला तुळसवडे गावचे सुपुत्र आदिनाथ कपाळे, उपसरपंच संजय कपाळे, माजी उपसरपंच प्रकाश गराटे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश आरावकर, पो. पाटील विलासिनी कपाळे, गावकर सुहास आडिवरेकर, कैलास मगदूम, विलास कपाळे, बाबल सुतार, गावकर गणपत राठवड, दिनेश धोपटे, प्रदीप गराटे, सुरेश मगदूम, नारायण फळसमकर, गंगाराम फळसमकर, शांताराम फळसमकर, सुभाष कानडे, शांताराम सुतार, हर्षद राठवड, ठेकेदार निखरगे इ. उपस्थित होते.

'राणा डॉग' ठरला मुख्यमंत्र्यांचा सुरक्षारक्षक

रत्नागिरी : रत्नागिरी जिल्ह्याच्या सुरक्षेसाठी आणि बॉम्बनाशक सामुग्री शोधून काढण्यात अग्रेसर असणारा राणा डॉगने मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये येणारे विविध मंत्री तसेच जिल्ह्यावर कोणतीही आपत्ती आल्यास तिचा मुकाबला करण्यासाठी सज्ज असणाऱ्या पोलिसांना सहाय्य करणारा राणा डॉग याने आजवर रत्नागिरी जिल्ह्याची सुरक्षितता जपली आहे. नुकताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्याच्यावेळी त्यांच्या सुरक्षेसाठी संपूर्ण परिसर राणाने पिंजुन काढला होता. यासाठी पोलीस रितेश वायंगणकर, पोलीस मयु कदम, पोलीस आशिष रहाटे आदीसह त्याला मार्गदर्शन करणारे सर्वजणांनी मुख्यमंत्री ज्या-ज्या ठिकाणी उतरणार त्याठिकाणी पाहणी केली होती. याअगोदरही राणाने शहरासह जिल्ह्यात होणाऱ्या चोऱ्या तसेच अमली पदार्थ, खून अशांवर चांगला प्रकाशझोत टाकला होता. त्यामुळे या सर्वांचा राणा हा कर्दनकाळ ठरत आहे.

संजय मोदी यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार

खेड (प्रतिनिधी) : खेड शहरातील श्री मुरली मनोहर नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय मोदी हे पारदर्शक कारभाराद्वारे सहकार क्षेत्रात करत असलेल्या कामगिरीची दखल घेत त्यांना बेळगांव येथील इंटीग्रेटेड सोशल वेल्फेअर सोसायटी चिक्कोडी व बेळगाव येथील राष्ट्रीय रूरल डेव्हलपमेंट फाऊंडेशनच्या वतीने राष्ट्रीय आदर्श सहकार संस्था गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या संस्थांच्या वतीने दिल्ली, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, गोवा राज्यातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य पारदर्शक कारभाराद्वारे पतसंस्थेच्या प्रगतीचा आलेख चढता ठेवत नवनवीन योजना राबवण्यावर भर देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला जातो. त्यानुसार मुरली मनोहर पतसंस्थेचे अध्यक्ष मोदी यांनी सहकारासह सामाजिक, शैक्षणिक, शासकीय, निमशासकीय क्षेत्रात केलेल्या कामगिरीची दखल घेत राष्ट्रीय पातळीवरील मानाचा समजला जाणारा हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आदिनाथ कपाळे यांची प्रमुख उपस्थिती

सेमीफायनल जिंकलो; आता लक्ष्य लोकसभा

माजी आमदार बाळ माने

◆ रत्नागिरी (प्रतिनिधी) :

मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने अपेक्षेप्रमाणे महाविजय मिळवला आहे. लोकसभेची सेमीफायनल जिंकलो आहोत, आता लक्ष्य लोकसभेवर तिसऱ्यांदा महाविजय मिळवण्याचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व यांचा संगम आणि महिला, युवा, गरिबांसाठी राबवलेल्या योजनांमुळे हे शक्य झाले आहे, असे प्रतिपादन भाजपाचे नेते, माजी आमदार, रत्नागिरी विधानसभा क्षेत्रप्रमुख बाळ माने यांनी केले.

चार राज्यांतील निवडणुकांचा निकाल जाहीर होत आहे. भाजपाला मध्यप्रदेशात १६४ जागा, राजस्थान १०९ आणि छत्तीसगडमध्ये ५४ जागा प्राप्त झाल्या आहेत. याबाबत बाळ माने म्हणाले की, या तीनही राज्यांतील निवडणूक भाजपाने परिश्रमाने जिंकली असून देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वाखाली यश मिळवले आहे. महिला आरक्षण, युवा, गरिबांसाठी योजना आदींमुळे भाजपाला या राज्यात उत्तुंग यश मिळाले आहे. या राज्यांतील निवडणुका म्हणजे सेमीफायनल होती. आता लोकसभेची निवडणूक पुढील वर्षी जिंकायची आहे. त्याकरिता आम्ही सर्वजण आधीपासूनच काम करू लागलो आहोत. केंद्रीय मंत्री नारायण राणे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, विनोद तावडे, माजी खासदार निलेश राणे, मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कोकणातील जागा जिंकू, असा विश्वास यावेळी बाळ माने यांनी व्यक्त केला.

बिघडलेल्या वेळापत्रकाने कोकण रेल्वेमार्गावरील १० रेल्वे गाड्या विलंबाने

खेड : कोकण रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या रेल्वे गाड्यांच्या शनिवारी बिघडलेल्या वेळापत्रकाने १० रेल्वे गाड्यांच्या सेवांवर परिणाम झाला. १२२१८ क्रमांकाची केरळा संपर्कक्रांती एक्स्प्रेस ३ तास ३० मिनिटे उशिराने मार्गस्थ झाली. अन्य ९ रेल्वेगाड्यांच्या सेवांवरही परिणाम झाला. दक्षिण रेल्वे प्रशासनाच्या विस्कळीत नियोजनाचा कोकणवासीयांना फटका बसत आहे. विलंबाने धावणाऱ्या रेल्वेगाड्यांमुळे वीकेंडलाही प्रवाशांची रखडपट्टी कायम राहिली.

कोकण मार्गावरून उशिराने धावणाऱ्या रेल्वेगाड्यांना दक्षिण रेल्वे प्रशासन कारणीभूत ठरत असल्याचे समोर आले आहे. दक्षिण रेल्वे प्रशासनाच्या नियोजनाअभावी एक्स्प्रेस गाड्या विलंबाने सुटत असल्याने त्याचा परिणाम अन्य रेल्वेगाड्यांच्या सेवांवर होत आहे. शनिवारीही मरूसागर एक्स्प्रेस २ तास ३५ मिनिटे तर निजामुद्दीन एर्नाकुलम साप्ताहिक एक्स्प्रेस २ तास ४० मिनिटे विलंबाने मार्गस्थ झाली. एलटीटी-मंगळूर स्पेशल १ तास ३० मिनिटे तर उधना मंगळूर स्पेशल १ तास ५० मिनिटे उशिराने रवाना झाली. मडगाव-एलटीटी एक्स्प्रेस १ तास ३० मिनिटे, तर निजामुद्दीन-एर्नाकुलम मंगला एक्सप्रेस १ तास उशिराने धावली. जामनगर-तिरुनवेली एक्स्प्रेसही १ तास ४० मिनिटे, तर तिरुवअनंतपूरम-निजामुद्दीन एक्स्प्रेस १ तास १० मिनिटे विलंबाने धावली.

परशुराम मंदिरात अक्षता कलशाचे पूजन

◆ चिपळूण (प्रतिनिधी) :

अयोध्येमधील श्रीराम मंदिराच्या २२ जानेवारीला होणाऱ्या उद्घाटन समारोहाची मंगल अक्षता देऊन घरोघर निमंत्रण देण्याचे अभियान विश्व हिंदू परिषदेतर्फे आरंभ करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्याकरिता आलेल्या या कलशाच्या अग्रपूजेचा मान श्री परशुराम मंदिराला देण्यात आला. गुरुवारी या कलशाची विधिवत पूजा श्री क्षेत्र परशुराम येथे करण्यात आली.

या कार्यक्रमाला विहिंपचे उत्तर रत्नागिरी जिल्हा मंत्री उदय चितळे, चिपळूण शहर अध्यक्ष रमाकांत पुरोहित, जिल्हा मंदिर आणि अर्चक आयाम प्रमुख धनंजय चितळे उपस्थित होते.

सर्वप्रथम सर्व विहिंपच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत आणि सत्कार परशुराम मंदिर समिती सदस्य अभय सहस्रबुद्धे आणि विहिंप परशुराम शाखा अध्यक्ष राहुल जोशी यांनी केले.

प्रस्ताविकामध्ये सहस्रबुद्धे यांनी राम मंदिराची पार्श्वभूमी विषद केली. स्वतः आपण कारसेवक म्हणून गेलो होतो हे सांगताना ते अनुभव सांगून २२ जानेवारी २४ हा दिवस समग्र हिंदू समाजासाठी अभिमानाचा आणि आत्मसन्मानाचा दिवस असेल, असे सांगितले. या कलशाच्या अग्रपूजेचा मान श्रीपरशुराम मंदिराला दिल्याबद्दल विहिंपचे आभार मानले. कारसेवक म्हणून सहस्रबुद्धे यांचा याप्रसंगी शाल श्रीफळ देऊन पुरोहित यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पुरोहित आणि उदय चितळे यांनी बोलताना अभियानाचे स्वरूप सांगितले. या अक्षतांचे संकलन करून कमीतकमी १ लाख लोकांपर्यंत हे निमंत्रण पोहोचवणार आहोत, असे ते म्हणाले.

आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी निर्णय

२० वर्षांनंतर राजापूर नगर परिषदेची पाणीपट्टी दरवाढ

◆ राजापूर (प्रतिनिधी) :

राजापूर नगर परिषदेने अखेर तब्बल २० वर्षांनंतर वार्षिक पाणीपट्टीच्या करात दरवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या घरगुती नळसंयोजनासाठी असलेला वार्षिक कर एक हजार रुपयांऐवजी आता १७०० रुपये प्रस्तावित करण्यात आला आहे. तर व्यावसायिक नळसंयोजन २८०० रुपयांवरून ३८०० रुपये तसेच कोदवली ग्रामपंचायत हद्दीतील वार्षिक नळपाणीपट्टी १५०० रुपयांवरून २२०० रुपये तर धोपेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील वार्षिक पाणीपट्टी १६०० रुपयांवरून २३०० रुपये प्रस्तावित करण्यात आली आहे.

यापूर्वी राजापूर नगर परिषदेने सन २००३ साली घरगुती नळसंयोजनासाठी असलेली वार्षिक पाणीपट्टी ५०० रुपयांवरून १००० रुपये केली होती. त्यानंतर तब्बल २० वर्षे पाणीपट्टीत दरवाढ करण्यात आलेली नव्हती. दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांनी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असणे गरजेचे आहे यासाठी या स्थानिक स्वराज्य संस्थांनी विविध कर, दर व फीमध्ये सुधारणा करावी अशा सुचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे तब्बल २० वर्षांनी राजापूर नगर परिषद प्रशासनाने तोट्यात असलेल्या पाणीपुरवठा योजनेमध्ये घरगुती व इतर नळसंयोजनांच्या वार्षिक दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा आर्थिक लेखाजोखा आणि दरवर्षी होणारा लाखो रुपयांचा तोटा प्रशासन व वित्त विभागाने मुख्याधिकारी यांना सादर केला असून पाणीपट्टीच्या वार्षिक करात दरवाढ करणे अनिवार्य असल्याचे सुचवले आहे.

सर्व प्रकारच्या नळ संयोजनांपासून राजापूर नगर परिषदेला शंभर टक्के वसुली झाल्यास वार्षिक ३० लाख ६१ हजार ८०० रुपयांचे उत्पन्न मिळत असून या योजनेसाठी प्रतिवर्षी होणारा खर्च ९२ लाख ४० हजार रुपये इतका आहे. त्यामुळे नगर परिषदेला नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी उत्पन्नापेक्षा तिप्पट जादा खर्च करावा लागत आहे. पाणीपट्टीत दरवाढ केल्यास जादा खर्च आटोक्यात येण्यास मदत होणार असली तरीही पाणीयोजना तोट्यातच राहणार आहे मात्र न.प.चा आर्थिक भार थोडासा कमी होऊ शकणार आहे, असे प्रशासनाने नमूद केले आहे. पाणीपुरवठा विभागाकडे सद्या कायमस्वरूपी चार कर्मचारी तसेच आऊटपुट बेसिसवर १८ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्या वार्षिक वेतनावरच ४५ लाख ६० हजार रुपये खर्च होत असल्याची आकडेवारी आहे.

तसेच नगर परिषद अथवा नगर पंचायत असलेल्या जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील घरगुती नळसंयोजनाचे वार्षिक दर स्पष्ट करण्यात आले असून यामध्ये मंडणगड १२०० रुपये, रत्नागिरी १८०० रुपये, लांजा १२०० रुपये, देवरूख १८०० रुपये, दापोली १८०० रुपये, खेड १४०० रुपये व चिपळूण १२०० रुपये असल्याचे प्रस्तावित अहवालात नमूद करण्यात आले आहे.

दिवा-रत्नागिरी धावणार लवकरच नव्या रंगरूपात

मात्र नव्या गाडीची आसन क्षमता घटणार

◆ खेड (प्रतिनिधी) :

कोकण रेल्वे मार्गावर धावणारी पूर्वीची दादर-रत्नागिरी आणि सध्याची दिवा-रत्नागिरी पॅसेंजर आता लवकरच नव्या रंगरूपात धावताना दिसणार आहे. देखभाल दुरुस्तीसह वेगवर्धन, सेक्शनमध्ये लवकर क्लिअरन्स मिळणे अशाच फिचर्ससह येणारी ही मेमू प्रकारातील गाडी असेल. मात्र, सध्याच्या गाडीच्या तुलनेत नव्या गाडीची आसन क्षमता घटणार असल्याने गाडी नवी कोरी आली तरी ही बाब मात्र कोकणवासीयांच्या दृष्टीने गैरसोयीची ठरणार आहे.

कोकण रेल्वे मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू झाल्यापासून धावत असलेली कोकणवासीयांची आवडती पूर्वीची दादर- रत्नागिरी पॅसेंजर (५०१०३/ ५०१०४) कोरोना काळापासून दिवा-रत्नागिरी पॅसेंजर झाली आहे. दोन वर्षांपूर्वीच आधीच्या निळ्या पांढऱ्या रंगसंगतीमधील जुन्या गाडीऐवजी लाल रंगातील एलएचबी श्रेणीमधील दीनदयाळ प्रकारच्या कोचसह पॅसेंजर धावत आहे. मात्र, आता ही गाडी पुन्हा एकदा नव्या रंगरूपात धावताना दिसणार आहे.

विद्युतीकरण झाल्याने मेमू गाडी चालवली जाणार

कोकण रेल्वेच्या संपूर्ण मार्गाचे आता विद्युतीकरण पूर्ण झालेले असल्यामुळे दिवा ते रत्नागिरी मार्गावर सध्या धावत असलेल्या लाल-करड्या रंगसंगतीमधील एल एच बी रेकऐवजी मेमू प्रकारातील गाडी धावताना दिसणार आहे. यासाठी आयसीएफ कपूरथळा येथील कारखान्यात रेक तयार करण्याची ऑर्डर देण्यात आली होती. रेल्वे सूत्रांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दिवा ते रत्नागिरी या गाडीला रिप्लेस करण्यासाठी मेमू गाडी आता मध्य रेल्वेच्या हद्दीत दाखल झाली आहे. कोकण रेल्वे मार्गावर चालवल्या जाणाऱ्या मेमू गाडीसाठी आवश्यक असलेले सर्व डबे दाखल झाल्यानंतर ही गाडी सध्याच्या गाडीऐवजी चालवली जाणार आहे.

दिवा ते रत्नागिरी या मार्गावर सध्या धावत असलेलली एलएचबी प्रकारातील गाडी ती धावणार असलेल्या दिशेला विद्युत इंजिन जोडून चालवली जाते. मात्र मेमू गाडीला दोन्ही बाजूला इंजिन असल्यामुळे सध्या 'लोको रिवर्सल'साठी लागणारा वेळ वाचणार आहे. याचबरोबर या प्रकारातील रेक १५ दिवसातून तांत्रिक देखभालीसाठी पाठवला तरी चालतो. सध्याच्या गाडीची आठवड्यातून देखभाल करावी लागत आहे. दिवा-रत्नागिरी मार्गावर सध्या एल एच बी दीनदयाळू प्रकारातील गाडी धावत आहे.

जिल्हा शासकीय रुग्णालयातील प्रसूतिपूर्व व प्रसूतिपश्चात इमारतीच्या कामावर प्रश्नचिन्ह

◆ रत्नागिरी (वार्ताहर) :

रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयातील प्रसूतिपूर्व व प्रसूतिपश्चात या इमारतीचे काम पूर्वी अत्यंत निकृष्ट होते. त्यामुळे ही इमारत अनेक ठिकाणी गळत होती. त्यानंतर ही इमारत पाडून नवीन करणे गरजेचे होते; परंतु सध्या सुरू असणारे काम देखील बोगस असल्याचे येथील नागरिकांकडून बोलले जात आहे.

रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील मुख्य इमारत सोडल्यास अनेक इमारतींची कामे बोगस आणि तकलादू असून गेले अनेक महिने ही कामे सुरू आहेत. त्यामध्ये मुख्य इमारतीवरील वाढीव बांधकाम असो वा अपघात विभागावरील पत्र्याचे काम असो किंवा प्रसूतिपूर्व व प्रसूतिपश्चात या इमारतीचे काम असो. गेले अनेक दिवस हे काम सुरू असून या इमारतीसाठी वापरण्यात येणारा दगड अत्यंत खराब झाला आहे. त्यामध्ये वापरलेले सिमेंटही अत्यंत तकलादू असून कोट्यवधी रुपये खर्च करून या इमारतीचे पुनरुज्जीवन केले जाणार आहे; परंतु या ठिकाणी मुख्य पिलरच पूर्णपणे सडून गेल्याने ही इमारत नवीन बांधणे गरजेचे होते; परंतु ती नवीन इमारत न करता त्यावर मुलामा लावून लाखो रुपये खर्च केले जाणार आहेत. या इमारतीचे हे बांधकाम बोगस असल्याचा जिल्ह्यातून येणाऱ्या नागरिकांकडुन निर्वाळा दिला जात आहे. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यांतून अनेक रुग्ण या ठिकाणी येत असतात; परंतु रुग्ण असल्याने कोणीही पुढे तक्रार करण्यास येत नाही.

रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील प्रसूतिपूर्व व प्रसूतिपश्चात इमारतीचे सुरू असणारे निकृष्ट बांधकाम. (छाया : प्रशांत हरचेकर)

या इमारतीमधील विविध विभागात प्लॅस्टर केले जाणार असून पूर्वीचे प्लॅस्टर काढले जात आहे. त्यामुळे आतील दगड आणि ठिसूळ सिमेंट दिसून येत आहे. काही ठिकाणी दगड निखळल्याने पूर्णपणे भगदाडे पडले आहे. हे सर्व टाळण्यासाठी त्वरित चांगले बांधकाम करावे, अशी मागणी होत आहे. शासन - प्रशासनानेही याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

नारळावरील कीडरोग नियंत्रित करण्यात संशोधन केंद्राला अपयश

◆ रत्नागिरी (वार्ताहर) :

बाळासाहेब सावंत दापोली कृषी विद्यापीठमार्फत रत्नागिरी शहराजवळील भाट्ये येथे नारळ संशोधन केंद्र सुरू आहे; परंतु या ठिकाणी असणाऱ्या शास्त्रज्ञांसह अधिवेष्टा यांना या कोळी कीड नियंत्रणावरती संशोधन करण्यात यश आलेले नाही. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक नारळ बागायतदार चिंतेत आहेत. चांगल्या फळांवरती हा रोग दिसून येत असून त्याचे तत्काळ उच्चाटन होणे गरजेचे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात प्रत्येक घरात तसेच बागायतींमधून नारळाची लागवड केली जाते. कल्पवृक्ष म्हणून त्याला संबोधले जात असताना नारळाच्या झाडावरती गेले १० वर्षे कोळी रोगाने थैमान घातले आहे. चांगल्या फळावरती हा रोग पडल्यानंतर संपूर्ण फळच काळवंडलेले दिसते. त्यामुळे शाहळे पाणी विकताना मोठ्या प्रमाणावर विक्रीवर परिणाम होतो. ही शहाळी करपलेली दिसत येतात. हिरव्या धम्मक किंवा पिवळसर असा विविध प्रकारच्या नारळावरती हा रोग दिसून येत असून कोकण कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ नेमके कशावरती संशोधन करतात, असा प्रश्न यानिमित्ताने निर्माण होत आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नारळांची झाडे आहेत. त्यावर धरलेल्या नारळावर हा रोग पडत असून कोणत्याही औषधाने तो कमी करण्यात या नारळ संशोधन केंद्राला यश आलेले नाही. रत्नागिरी जिल्हा पर्यटन क्षेत्र म्हणून नावारुपाला येत असताना नारळावरील कोळी कीड हा रोगामुळे अनेकजण नारळाचे फळ हातात घेण्यासही धजावत नाहीत. त्यामुळे या व्यावसायिकांचा उद्योगही कमी झाला आहे.

राजापुरात नेत्रतपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

अॅड. जमीर खलिफे आणि इन्फिगो आय केअर हॉस्पिटलचे आयोजन

◆ राजापूर (वार्ताहर)

राजापूरचे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष अॅड. जमीर खलिफे आणि इन्फिगो आय केअर हॉस्पिटल रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शहरातील एस.टी. पिकअप शेड सभागृहात रविवारी झालेल्या या शिबिराचा शुभारंभ माजी आमदार हुस्नबानू खलिफे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष अॅड. जमीर खलिफे, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष व माजी नगरसेवक सुभाष बाकाळकर, निखील कोठारकर यांच्यासह इन्फिगो आय केअरचे मंगेश पावसकर, केतन गुरव, अपेक्षा घाडी, सुशिल कांबळे, प्रांजली टेमकर आदी उपस्थित होते.

या शिबिरामध्ये राजापूर शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनीही डोळ्यांची तपासणी करून घेतली. शिबिरादरम्यान राजापूर पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र मोहिते, ज्येष्ठ पत्रकार महेश शिवलकर यांच्यासह पत्रकार विनोद पवार, राजेंद्र बाईत, माजी नगरसेविका स्नेहा कुवेसकर, काँग्रेसचे नाना कुवेसकर यांनी भेट दिली. शिबिर यशस्वी करण्यासाठी शैबाज खलिफे, संदेश जाधव, सतीश बंडबे, राकेश कातकर यांनी मेहनत घेतली.

सर्व कार्यकारणी सदस्य व भाविक मोठ्या संख्येने सोहळ्यात सहभागी

राजापुरातील वारकऱ्यांची पंढरपुरात नगर प्रदक्षिणा

◆ राजापूर (वार्ताहर)

राजापूर तालुका वारकरी सांप्रदायाच्या वतीने कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या तांबडा मारूती, दत्त घाट ते पुंडलीक मंदिर अशा नगर प्रदक्षिणा सोहळ्यात तालुक्यातुन पंढरपूरला गेलेल्या सुमारे दोन ते अडीज हजार भाविकांनी उपस्थिती लावली. अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि विठू नामाचा गजर करत हा प्रदक्षिणा सोहळा पार पडला. समस्त राजापूर तालुक्यातील वारकऱ्यांनी विठुरायाच्या नामाचा गजर करत पंढरपूर भक्तिनगरीत एक वेगळा आदर्श निर्माण केला.

राजापूर तालुक्यातून पंढरपूर येथे कार्तिकी वारीला जाणाऱ्या भाविकांची संख्या प्रतिवर्षी वाढत असून यात्रेच्या नियोजनासाठी यात्रेपूर्वी राजापूर तालुक्यातील वारकरी मंडळीची बैठक पार पडली होती. या बैठकीत सांप्रदायाच्या वतीने नगर प्रदक्षिणा सोहळ्याचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्याप्रमाणे हा सोहळा पार पडला.

पंढरपूर येथे कार्तिकी एकादशी यात्रेला गेलेल्या वारकऱ्यांनी दत्तघाट ते पुंडलीक मंदिर नगर प्रदक्षिणा काढली. या सोहळ्यात सहभागी झालेले शेकडो भाविक.

या सोहळ्यात राजापूर तालुक्यातील सर्व भागातील भाविकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शविली. राजापूर तालुका वारकरी सांप्रदायाचे अध्यक्ष रवींद्र नागरेकर यांच्या नेतृत्वाखाली ही नाम दिंडी तथा नगर प्रदक्षिणा सोहळा पार पडला. या सोहळ्यात तालुक्याच्या विविध भागातील वारकरी मंडळी मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाने सहभागी झाले होते. गावागावातील प्रमुख मंडळींनी पुढाकार घेत दिंडी सोहळा पार पडला. दिंडी सोहळ्याचे हे चौथे वर्ष होते.

सर्व कार्यकारणी सदस्य व भाविक मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले होते. या प्रदक्षिणा सोहळ्यात विठू नामाचा गजर करत समस्त राजापूरकरांनी भक्तीचा आणि एकतेचा जणू संदेशच दिला. दिंडीतील सहभागी वारकऱ्यांचे रवींद्र नागरेकर यांनी आभार मानले. हरिभक्तीचा हा ठेवा अखंड जपताना आपापल्या गावात हरिनामाची ज्योत अखंडत तेवत ठेवण्याचे आवाहन नागरेकर यांनी यावेळी केले.

छोट्या जाहिराती

CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM **RUNA RAJKUMAR RIZVI** TO **RUNA SIVAMANI** AS PER MAHARASHTRA GAZATTE NO. M-23233490

प्रहार मुंबई
वाचकांना विनम्र सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या **प्रहार** विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिराती आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'प्रहार' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'प्रहार' वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

बृहन्मुंबई महानगरपालिका

(जल अभियंता विभाग)
ई-निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका (बृ.मुं. मनपा) आयुक्त खालील नमूद असल्याप्रमाणे खालील कामांकरीता लिफाफा-'ए', 'बी' आणि 'सी' प्रणालीमधून टक्केवारी दर तत्त्वावर ई- निविदा मागवित आहेत.

विभाग	जल अभियंता
उप विभाग	ई. ई. डब्ल्यू. डब्ल्यू. (सिव्हिल) मेंन्ट.
बोली क्रमांक	**२०२३_एमसीजीएम_९५५५६९**
विषय	शहर विभागातील संबंधित स्थापत्य कामांसह ३०० एमएम आणि अधिक व्यासाच्या पाण्याच्या वाहिन्यांवर गळती आणि चेंबर्सच्या बांधकाम करण्याचे आपत्कालीन काम (पुनर्निविदा)
निविदा विक्री -	**तारीख पासून :** ०४.१२.२०२३ **(११.०० वा. पासून)** **तारीख पर्यंत :** ११.१२.२०२३ **(१२.०० वा. पर्यंत)**
सादरीकरणाची शेवटची तारीख -	११.१२.२०२३ **(१६.०० वा. पर्यंत)**
बोली-पूर्व सभा -	यापूर्वीच दि. ०१.११.२०२३ रोजी शून्य चौकशीसह आयोजित
लिफाफा ए उघडण्याची तारीख व वेळ	१४.१२.२०२३ (१६:०० वा. नंतर)
लिफाफा बी उघडण्याची तारीख व वेळ	१४.१२.२०२३ (१६:१५ वा. नंतर)
लिफाफा सी उघडण्याची तारीख व वेळ	१९.१२.२०२३ (१५:०० वा. नंतर)
संकेतस्थळ -	**www.portal.mcgm.gov.in** **https://mahatenders.gov.in**
	संपर्क अधिकारी :
अ) नाव -	श्री. एस. डी. भामरे आणि श्री. पी. एम. राणे. सब. इंजि. डब्ल्यू. डब्ल्यू. (स्थापत्य) मेन्ट.
ब) दूरध्वनी क्र. (कार्यालय) -	**०२२ २५१२६३७६**
क) मोबाईल क्र. -	९९२२१५६०००/९७६९६६३९५५
ड) इमेल आयडी -	**eewwcivilmaintes.he@mcgm.gov.in**

पीआरओ/२१४६/जाहि./२०२३-२४

स्वाक्षरी/-
उप. जल अभि. (परि.)

शक्यतो घरी केलेले व ताजे अन्नपदार्थ खावे.

प्रहार रायगड

www.prahaar.in
epaper.prahaar.in
@PrahaarNewsLive

वेचक

किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजना

अलिबाग (प्रतिनिधी) : किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेंतर्गत दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांच्यामार्फत जिल्हा पणन अधिकारी, रायगड यांच्या अखत्यारीत असलेल्या धान खरेदीदार संस्थांमार्फत ३८ खरेदी केंद्रावर खरीप व रब्बी पणन हंगाम २०२३-२०२४ करिता धानाची (भाताची) खरेदी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांनी दिली आहे. भात खरेदीवेळी शेतकऱ्यांनी आपल्याकडील जमिनीबाबतचा सातबारा उताऱ्याची व गाव नमुना ८(अ) ची छायाकिंतप्रत खरेदी केंद्रावर धान विक्रीकरिता आणणे आवश्यक आहे. या उताऱ्यातील धान्य व धानाखालील क्षेत्र पाहून धान/भरडधान्य खरेदी करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या सातबारा उतारानुसार पिकाखालील क्षेत्र, या वर्षीची पीक परिस्थिती (पैसेवारी), पिकाचे सरासरी उत्पादन या सर्व बाबी विचारात घेऊन, धान/भरडधान्य खरेदी करण्यात येईल.

३८ धान खरेदी केंद्रांवर भाताची खरेदी करता येणार

धानाची खरेदी ही ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याने संबधित शेतकऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक राहील. याकरिता खरेदी केंद्रावर भात विक्रीकरिता आणताना प्रत्येक शेतकऱ्यांनी सोबत आपल्या आधारकार्डाची तसेच बँकेच्या पासबुक आणणे आवश्यक आहे, तसेच रोज सायंकाळी खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर खरेदी केंद्रांवर आणलेले; परंतु खरेदी न झालेले धान/ भरडधान्य सांभाळण्याची जबाबदारी संबधित शेतकऱ्यांचीच राहील.

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या ज्येष्ठांचा सत्कार

अलिबाग (प्रतिनिधी) : ज्येष्ठ नागरिक संस्था, झिराड-मांडवा पंचक्रोशीतर्फे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या ज्येष्ठांचा नुकताच मांडवा येथे डॉ. सुरेश म्हात्रे यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.

मांडवा ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष अनंत पाटील यांनी यावेळी अलिबागच्या ज्येष्ठ नागरिक संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रफुल्ल राऊत यांना ज्येष्ठ नागरिक संस्था मांडवातर्फे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. त्यानंतर शिवशांती स्नेहालयाचे अध्यक्ष डॉ. सुभाष म्हात्रे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक सुहास पाटील, ज्येष्ठ नागरिक संस्था अलिबागच्या उपाध्यक्षा चारुशिला कोरडे, कार्यकारिणी सदस्य गजेंद्र दळी, खजिनदार दिलीपकुमार देवळेकर, आर. के. घरत यांचा यावेळी सत्कार करण्याचा आला. त्यांच्यासोबतच डॉ. सुरेश म्हात्रे, निवृत्त नायब तहसीलदार विजय पाटील, मधुकर पाटील, सुनील म्हात्रे, तुकाराम तोडणकर, विजय देशमुख, अशोक पाटील, जनार्दन पाटील, लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष अभिजीत गुरव, योगशिक्षक दादा संसारे, गजानन पाटील यांनाही संस्थेतर्फे सन्मानीत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. सुरेश म्हात्रे गजानन पाटील, संस्थेचे सचिव पानसरे, शिवशांती स्नेहालयाच्या सचिव डॉ. प्रतिभा म्हात्रे यांनी खूप मेहनत घेतली.

कोकणातील पाच मत्स्यबंदरांचा होणार विकास

सुभाष म्हात्रे

रायगडमधील २ बंदरांचा समावेश; १०१८ कोटींच्या अंदाजित आराखड्यास सीआयसीईएफची मंजुरी

अलिबाग : मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत विकास (एफआयडीएफ) योजनेतून कोकणातील पाच मत्स्य बंदरांच्या विकासाला केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. या बंदरांमध्ये मासे उतरविण्यासाठीच्या जेट्टीचे बांधकामाबरोबरच बर्फ कारखाना, शीतगृहे, मासळी मार्केटचे आधुनिकीकरण अशा प्रकारच्या वेगवेगळ्या २० सुविधा पुरविल्या जाणार आहेत. यासाठी १०१८ कोटी रुपयांचा सुधारित अंदाजपत्रक मांडण्यात आला आहे. यामध्ये रायगडमधील श्रीवर्धन तालुक्यातील जीवना आणि भरडखोल बंदरांचा समावेश करण्यात आला आहे.

मत्स्य उत्पादन वाढीसाठी केंद्र शासनाकडून व्यापक कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून स्थानिक मच्छीमारांना त्यांच्या जवळच्याच बंदरात मासळी उतरविण्याच्या सुविधेसह इतर पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी पाठविलेल्या प्रस्तावास १२ नोव्हेंबर २०२० ला मान्यता देण्यात आली होती. त्यावेळेस या पाचही बंदरांसाठी ६९७.९१ कोटी रुपये खर्च येणार होता. चालू दरानुसार यात ३२०.३४ कोटी रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. वाढीव दरपत्रकास बंगळुरु येथील सीआयसीइएफ संस्थेने मान्यता दिलेली आहे. या बंदरांमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील हर्णे, राजापूर तालुक्यातील साखरीनाटे, रायगड जिल्ह्यातील जीवना, भरडखोल बंदरांचा समावेश आहे, तर पालघरमधील सातपाटी बंदराची मंजुरी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या मासेमारी बंदरांचा विकास केल्यानंतर मत्स्य उत्पादनात वाढ होईल, असा अंदाज वर्तविला जात आहे. यातून मच्छीमारांचा वेळ, श्रम आणि पैसाही वाचणार आहे. यापूर्वी रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांना मासळी उतरवण्यासाठी मुंबईतील बंदरांमध्ये जावे लागत असे. करंजा येथे मासेमारी बंदर विकसीत झाल्याने मुंबईतील बंदरांवरील रहदारी काही प्रमाणात कमी झाली आहे. मंजुरी देण्यात आलेल्या अन्य बंदरांमुळे कोकणातील मच्छीमारांना त्यांच्या भागातच मासळी उतरविणे शक्य होणार आहे.

श्रीवर्धनचे मच्छीमार साईनाथ नाखवा यांच्या म्हणण्यानुसार, श्रीवर्धन परिसरातील मच्छीमारांना मासळी उतरवण्यासाठी खूपच अडचणींचा सामना करावा लागतो. भरतीचा अंदाज घेऊनच बंदरात यावे लागते, अन्यथा होड्या व्यवस्थित बंदरात लावता येत नाहीत. त्यानंतर मासळी साठवण्याची सुविधा नसल्याने लिलावात जादा दरासाठी आग्रह करता येत नाही. मासे खराब होतील या भीतीने मिळेल त्या दरात विकावी लागते. या परिसरात चांगले बंदर असावे, ही मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे.

मत्स्यबंदराच्या विकासासाठी अंदाजित रक्कम (कोटीत)

बंदराचे नाव व ठिकाण	अंदाजित रक्कम	सुधारित रक्कम
हर्णे, ता. दापोली, जि. रत्नागिरी	१५५.४६	२२१.३१
साखरीनाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी	१०७.५२	१४६.९०
जीवना, ता. श्रीवर्धन, जि. रायगड	९७.३७	१८५.४८
भरडखोल, ता. श्रीवर्धन, जि. रायगड	९४.४३	११९.६४
सातपाटी, ता. पालघर	२४३.१३	३४४.९२
एकूण	६ ९७.९१	१०१८.२५

सात लाखांचा मुद्देमाल जप्त

विद्युत रोहित्रातील तांबे चोरणारा गजाआड

◆ कर्जत (प्रतिनिधी) :

ऑगस्ट महिन्यापासून कर्जत, नेरळ, खोपोली परिसरात अचानक विद्युत रोहित्रांमधील तांब्याच्या कॉइल चोरण्याचा घटनांत वाढ झाली होती. या प्रकरणात चोरट्यांना जेरबंद करण्यात नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांच्यासह पोलीस पथकाला यश आले असून ७ लाखांचा मुद्देमाल देखील जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नेरळ, कर्जत, खोपोली पोलीस ठाणे हद्दीत ऑगस्ट २०२३ पासून विद्युत रोहित्रा मधील तांब्याच्या कोइल चोरीचे सत्र सुरु झाले होते. कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मालकीची तसचे खाजगी मालकी असलेले विद्युत रोहित्र कोणत्या तरी हत्याराने खोलुन त्यामधील ऑइलचे नुकसान करत त्यातील तांब्याची कोइल चोरून नेत होते. याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे ३ कर्जत पोलीस ठाणे येथे ४ तर खोपोली पोलीस ठाणे येथे एक गुन्हा दाखल आहेत. त्यामुळे या चोरट्यांचा नेरळ पोलिसांनी बंदोबस्त करण्याचा निश्चय करत तपासाला सुरुवात केली.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागिय पोलीस अधिकारी कर्जत विजय लगारे, उपविभागिय पोलीस अधिकारी खालापुर विक्रम कदम यांनी आदेशीत केल्याप्रमाणे नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी नेरळ पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसह तपास पथक तयार केले. या पथकात पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, लिंगप्पा सरगर, नितीन मंडलीक, सहा. फौजदार श्रीरंग किसवे, पोलीस हवालदार नवनाथ म्हात्रे, पोलीस शिपाई निलेश कुमरे, विनोद वांगणेकर यांनी या चोरट्यांना पकडण्यासाठी चंग बांधला.

याप्रकरणी आवेश आस्लम खान, वय-२० रा. जिते सिमा लॉन्स हॉटेल जवळ मुळ रा. पिंपरा पोस्ट, मोहनकोला, ता. सोहरातगढ, जिल्हा-सिद्धार्थनगर, राज्य-उत्तरप्रदेश यांस चौकशी कामी पोलीस ठाणे येथे आणण्यात आले.

ग्रामदैवतेच्या गाभाऱ्यात बाराही महिने घाण पाणी

◆ कर्जत (वार्ताहर) :

कर्जतचे जागृत ग्रामदैवत श्री धापाया महाराज मंदिरातील गाभारा बाराही महिने घाण पाण्याने भरलेला असतो. यापूर्वी असे कधीही होत नसे, फक्त पावसाळ्यामध्ये गाभाऱ्यात थोडेसे पाणी जमा होत असे. पावसाळा संपल्यावर महिन्याभरातच पाणी ओसरत असे. मात्र मंदिराच्या शेजारून सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्याचे बांधकाम केले, त्या वेळपासून आता बाराही महिने गाभाऱ्यातील पाणी कमी होत नाही. हे वास्तव सांगायला आजही कर्जत गावांतील वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिक साक्षीदार आहेत. यावर उपाय करावा. यासाठी ग्रामस्थांनी नगर परिषद प्रशासनास निवेदन दिले आहे.

सामाजिक कार्यकर्ते विजय हरिश्चंद्रे, भाई आणेकर, माजी नगरसेवक मुकेश पाटील, महेंद्र चंदन, मनोज वरसोलिकर, मोहन भोईर यांनी मुख्याधिकारी वैभव गारवे यांची भेट घेवून निवेदन दिले. सदर निवेदनात कर्जतचे जागृत ग्रामदैवत श्री धापाया महाराज मंदिरातील गाभारा बाराही महिने पाण्याने भरलेला असतो.

यापूर्वी असे कधीही होत नसे, फक्त पावसाळ्यामध्ये गाभाऱ्यात थोडेसे पाणी जमा होत असे. पावसाळा संपल्यावर महिन्याभरातच पाणी ओसरत असे, असे का होते यावर निरीक्षण केल्यावर असे लक्षात येते की, नगर परिषदेने काही वर्षांपूर्वी कर्जत शहरांतील मुख्य गटारातील बांधकाम केले ते नियोजन पूर्वक न केल्यामुळे बाजूच्या मुख्य गटारातील पाण्याला पुढे जाण्यास, जो उतार द्यावयास पाहिजे होता, तो न दिल्यामुळे पाणी साचून तुंबून रहाते. त्यामुळे गटारातील घाण पाणी झिरपून बाजूलाच असणाऱ्या मंदिरातील गाभाऱ्यात जमा होते व दुर्गंधी येते.

कर्जतच्या शॉर्टफिल्म 'वळण'ने रचला इतिहास

कर्जत (वार्ताहर) : कर्जत शहरातील दहिवली भागात राहणारे दिग्दर्शक, लेखक, अभिनेते प्रदीप गोगटे यांनी 'वळण' ही शॉर्टफिल्म तयार केली. या शॉर्टफिल्ममध्ये लहान कलाकार आहेत. ही शॉर्टफिल्म इतकी गाजली की तिला तब्बल शंभर पुरस्कार मिळाले आहेत. हा कर्जतसाठी इतिहास रचला आहे.

शहरातील सिमेंट काँक्रीटच्या जंगलात राहणाऱ्या लहान मुलांना गावाकडील राहणीमान, संस्कृती याचे साध्या आणि सोप्या पद्धतीने सुंदर दर्शन घडवणारी कलाकृती म्हणजे शॉर्टफिल्म 'वळण'. अतिशय परिश्रम घेऊन या शॉर्टफिल्मची निर्मिती करण्यात आली आहे आणि हे सर्व श्रेय बालकलाकार, इतर कलाकार आणि एडीटर, सिनेमॅटोग्राफर आणि संपूर्ण प्रोडक्शन टीमचे आहे.

या लघुपटाच्या माध्यमातून कर्जत शहरासह गावातील मुला-मुलींना ही संधी देता आली. या लघुपटात ऋत्वी ओसवाल, आर्वी ओसवाल, राज साळवी, स्पंदन पडते, साईराज खंडागळे, राजवी डोंबे आणि स्फुर्ती पडते या बालकलाकारांच्या सह पूजा बंदरकर, विशाल रोकडे, आरती मॅडम, दिगंबर म्हसकर, शर्वरी जाधव आणि हेमंत वाघुले यांच्या भूमिका आहेत.

या लघुपटाचे एडिटिंग प्रथमेश जाधव यांनी अतिशय छान पद्धतीने केले आहे. तसेच सिनेमॅटोग्राफर म्हणून हृषिकेश दांडेकर यांनी सुंदर चित्रिकरण केलेले आहे. कथा, पटकथा आणि दिग्दर्शन प्रदिप गोगटे यांचे आहे. या लघुपटाचे शूटिंग कर्जत आणि नेवाळी, आवळस येथे झाले.

माथेरानमध्ये जागतिक दिव्यांग दिन साजरा!

◆ माथेरान (वार्ताहर) :

जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून माथेरानमधील दिव्यांग बांधवांचा माथेरान मानव कल्याण दिव्यांग सामाजिक संस्थेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव, मुंबईतील दानशूर व्यक्तिमत्त्व असलेले अमूदोन तमीळ, माजी उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, क्षत्रिय मराठा समाज महिला अध्यक्षा प्रतिभा घावरे, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, दिनेश सुतार आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

येथील शास्त्री हॉलच्या प्रांगणात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हाधिकारी यांनी दि. ३ ते १० डिसेंबरपर्यंत जागतिक दिव्यांग दिन साजरा करावा अशा सूचना दिलेल्या असताना देखील नगर परिषदेच्या अधिकारी वर्गाने या कार्यक्रमाकडे दुर्लक्ष केल्याने दिव्यांग बांधवांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जवळपास चोवीस दिव्यांगांना शासकीय मानधन मिळवून देण्यासाठी अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांनी प्रयत्न केले आहेत. अनेकांची कागदपत्रे अपूर्ण असल्याने त्यांना मानधन प्राप्त होऊ शकले नाही त्यासाठी या दिव्यांग लोकांच्या घरातील मंडळींनी पाठपुरावा करून कागदपत्रे जमा केल्यास त्यांनाही सर्व सुविधा सवलती प्राप्त होऊ शकतात. मानव कल्याण दिव्यांग सामाजिक संस्था लवकरच नोंदणीकृत करण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याचे चंद्रकांत जाधव यांनी सांगितले, तर नेहमीच या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवून घरातील बहुतेक दिव्यांग मंडळींची कागदपत्रे वेळेवर उपलब्ध करून देणाऱ्या शीतल कदम यांची या संस्थेच्या सचिव पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. उपस्थित दिव्यांग बांधवांना आणखीन काय काय बाबींची पूर्तता करता येईल यासाठी मुंबईचे दानशूर अमूदोन तमिळ यांनी उपस्थित दिव्यांग बांधवांशी चर्चा करून लवकरच आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात येईल, असे सांगितले. यावेळी आकाश चौधरी, प्रतिभा घावरे, प्रकाश सुतार, दिनेश सुतार यांनी आपले अनमोल विचार यानिमित्ताने व्यक्त केले.

'आविष्कार २०२३' पारितोषिक वितरण

नांदगाव-मुरुड : फोटो सर्कल सोसायटीतर्फे २४व्या एफसीएस ग्रँड राष्ट्रीय आणि महाराष्ट्र राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा आणि प्रदर्शन 'आविष्कार-२०२३' चे पारितोषिक वितरण व प्रदर्शनाचे उद्घाटन ठाणे महानगरपालिका महापौर नरेश म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी शिरीष कराळे ज्येष्ठ छायाचित्रकार, ॲड.माधवी संजय नाईक फोटो सर्कल सोसायटीच्या विधी सल्लागार आणि संचालक-विमानतळ प्राधिकरण, भारत सरकार, फोटो सर्कल सोसायटीचे अध्यक्ष हृदयनाथ कोळी ,ज्येष्ठ प्रवीण देशपांडे उपस्थित होते.

'आविष्कार -२०२३' च्या फोटोस्पर्धेत ऐतिहासिक गडकिल्ले या विषयात सुधीर नाझरे याना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक १० हजार रोख मानचिन्ह व सौरभ नाझरे याला वेडिंग विख्यात प्रथम पारितोषिक १० हजार रोख मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

वेणगाव येथे हरितगृहात ऑर्किडची यशस्वी लागवड

◆ कर्जत (वार्ताहर) :

कर्जत तालुक्यात कृषी विभागाकडून मोठ्या प्रमाणात शासकीय योजना लाभार्थी यांच्यापर्यंत पोहोचवून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. यानुसार कर्जत वेणगाव येथे कृषी विभागाच्या मदतीने हरितगृहात ऑर्किड फुलांची यशस्वी लागवड करण्यात आली आहे, तर गौरकामथ येथे डाळ मिलसह पोहामिल उभारणी केली जात आहे. या सर्व कामांची पाहणी जिल्हा कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी करत कर्जत तालुका कृषी विभागाचे कौतुक देखील केले.

कर्जत तालुक्यात निसर्गाने वैविध्याची उधळण केली आहे. येथे असलेल्या हरित पट्ट्यामुळे येथील पर्यावरण पूरक वातावरण अबाधित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून वेगवगेळे यशस्वी प्रयोग कर्जतमध्ये शक्य झाल्याचे आजवरचे चित्र आहे.

अशात मुलुंड येथील निरुपमा मोहन या महिलेने कृषिशास्त्रात रस दाखवत यात काहीतरी करण्याचे स्वप्न पहिले त्यानुसार त्यांनी कर्जत वेणगाव येथे जागा घेऊन त्यात ऑर्किड फुलांची लागवड करण्याचा निर्धार केला. त्यासाठी आर्थिक पाठबळ गरजेचे होते. त्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील जमापुंजीचा वापर करत कृषी विभागाच्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत मदतीसाठी कृषी विभागाकडे अर्ज देखील केला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन कृषी विभागाने

जिल्ह्यात कृषी अधिकाऱ्यांकडून पाहणी

योजनेअंतर्गत त्यांना साडेआठ लाख रुपयांचे अनुदान दिले, तर निरुपमा मोहन यांनी येथे हरितगृह उभारत त्यात १८ हजार ऑर्किड रोपांची लागवड केली. यासाठी त्यांना जवळपास २३ लाख रुपये इतका खर्च आला असून यानुसार फुलांचे उत्पन्न आल्यावर त्यातून नफा हा साधारण ८० लाख रुपयांपासून ते १ कोटी रुपयांपर्यंत आहे. त्यामुळे या यशस्वी लागवडीची पाहणी कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांनी केली आहे.

याप्रसंगी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी उज्ज्वला बाणखेले, कृषी उपसंचालक सतिश बोऱ्हाडे, उपविभागीय कृषि अधिकारी नितीन फुलसुंदर, तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी कर्जत दिनेश कोळी, बँक ऑफ इंडिया गौरकामत व्यवस्थापक स्नेहल हांडकर उपस्थित होते.

पर्णसंभारावर विणलेली कोळ्यांची घरं दवबिंदूत चमकतात; पर्यावरणप्रेमींसाठी एक पर्वणी

धागा... धागा... विणणाऱ्या कोळ्यांचे जाळीदार विश्व

गौसखान पठाण

सुधागड-पाली : सध्या जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रकारच्या कोळ्यांच्या प्रजाती व त्यांची आकर्षक जाळी दृष्टीक्षेपात येत आहेत. विशेष बाब म्हणजे निसर्ग व कीटक अभ्यासक व प्रेमींना यांचे निरीक्षण व अभ्यास करणे सोपे जात आहे. या कोळ्यांची आकर्षक तसेच आकाराने मोठी जाळी व हे रुबाबदार रंगीत कोळी येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष वेधतात.

हे कोळी रस्त्याच्या कडेला झाडे व झुडुपात पाहिल्यावर सर्वसामान्यांसाठी कुतूहलाचा विषय ठरतांना दिसत आहेत. अलिबाग येथील निसर्ग व वन्यप्राणी अभ्यासक प्रवीण कवळे यांनी सांगितले की, एरवी जंगलात आढळणारे हे को ळी हिवाळ्यामध्ये भक्ष्य कीटक मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने झाडां-झुडुपांमध्ये जाळी करून राहताना दिसत आहेत. हिवाळा सुरू झाल्याने पांढऱ्या शुभ्र जाळ्यांवर पडलेले दव मोत्याप्रमाणे भासते.

कोळ्यांचे विविध प्रकार असून, वर्गवारी त्यांच्या जाळे विणण्याच्या पद्धतीवरून केली जाते. Giant Wood Spider ही कोळ्यांची जात सर्वसामान्य आहे. वातावरणातील बदलांचा त्यांच्यावर फारसा परिणाम होताना दिसत नाही. फक्त जंगले वाचली पाहिजेत. यामध्ये मादी मोठी असते आणि नर एकदम छोटा असतो. मीटिंग (संभोग) झाल्यावर ती नराला खाऊन टाकते. यांचे जाळे खूप मोठे असते, तर Funnel Web spiden हा कोळी नरसाळ्या सारखे आकर्षक जाळे विणतो आणि त्यामध्ये भक्ष्य पकडतो. कोळी हा संधिपाद संघातील ॲरॅक्निडा वर्गाच्या ॲरेनीइडा या गणात समाविष्ट असलेला आणि रेशीमसारखा धागा तयार करणारा एक अष्टपाद प्राणी आहे. जगात कोळ्यांच्या सुमारे ६० हजार ज्ञात जाती आहेत. प्रामुख्याने हे भूचर असले तरी त्यांच्या काही जाती सागरकिनारी पाण्यालगत आणि यूरोपिअन पाणकोळी ही जात गोड्या पाण्यातही आढळते. प्रामुख्याने कीटक भक्ष्य मिळू शकतात, अशा सर्व ठिकाणी कोळी आढळतात. वनात, शेतीच्या क्षेत्रात, घरात, वाळवंटात, दलदलीच्या प्रदेशात, उंच पर्वतावर, खोल खाणींमध्ये आणि अंधाऱ्या गुफांमध्येही कोळी आढळतात. कोळी अन्नाशिवाय पुष्कळ दिवस जगू शकतात. त्यांना आपल्या शरीरात पुष्कळ अन्न साठवून ठेवता येते. काही कोळी टाचणीच्या डोक्याइतके लहान असतात, तर दक्षिण अमेरिकेतील टॅरांटुला जातीचे काही कोळी पाय पसरले असता २५ सेंमी. इतके मोठे असतात. कोळी बहुधा करड्या, तपकिरी अगर काळ्या रंगाचे असतात, पण काही कोळी फुलपाखरांप्रमाणे आकर्षक रंगांचे सुद्धा असतात. बहुतेकांचे शरीर केसाळ असते. हे केस आखूड आणि अतिशय संवेदी असतात.

...असे पकडतो भक्ष्य

कोळी बरेच दिवस अन्न-पाण्याव्यतिरिक्त राहू शकतात. अन्न पचवण्याची त्यांची वेगळी पद्धत आहे, ज्यात कोळी आपले पाचक रस आपल्या भक्ष्यात सोडतात आणि मग विघटित झालेले द्रव रूपातील अन्न शोषून घेतात.

> या कोळ्यांना सध्या त्यांचे खाद्य कीटक व पतंग मोठ्या प्रमाणात भेटत आहे. हे कोळी वर्षभर भारतात सर्वत्र आढळतात. निसर्गतःच संरक्षित असल्याने त्यांना संरक्षणाची आवश्यकता नाही.
>
> - **शंतनू कुवेसकर,** वन्यजीव अभ्यासक, रायगड

> सध्या हे कोळी सर्वत्र दिसत आहेत. शेतामध्ये देखील यांचे वास्तव्य आहे. पर्यावरण संतुलनासाठी इतर प्राण्यांप्रमाणे कोळ्यांचे देखील योगदान महत्त्वपूर्ण आहे.
>
> - **शंतनू लिमये,** प्राणीपक्षी रक्षक, पाली,

'नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याशिवाय देशाला पर्याय नाही'

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

◆ श्रीवर्धन (वार्ताहर) :

श्रीवर्धन येथील जलशुद्धीकरण सोहळ्याच्या लोकार्पणप्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, पाच पैकी चार राज्याचे कल लक्षात घेता देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याशिवाय पर्याय नाही. राज्यामध्ये शिंदे, फडणवीस आणि आम्ही योग्य रितीने सरकार चालवीत असून केंद्र सरकारच्या सहकार्याने महाराष्ट्राची विकासाकडे घोडदौड अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू आहे. ज्या प्रकल्पांचे भूमिपूजन माझ्या हस्ते झाले त्याच प्रकल्पांचे उद्घाटनही माझ्या हस्ते होत असल्याचा सुवर्णयोग पाहवयास मिळत आहे.

खा. सुनील तटकरे, महिला, बालकल्याण मंत्री आदिती तटकरे आ. अनिकेत तटकरे यांना श्रीवर्धन मतदारसंघाचाच नव्हे तर संपूर्ण रायगड व कोकणाच्या विकासाचा ध्यास असून सातत्याने ते विकासाच्याच मागे असतात, असे सांगितले.

वेचक

गातेस येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्याची सहकारी बँक संचालकांनी घेतली भेट

वाडा (वार्ताहर) : वाडा तालुक्यातील गातेस येथील शेतकरी श्याम पाटील यांच्या खळ्यातील भाताच्या भाऱ्याच्या तीन उडव्यांपैकी दोन उडव्यांना शुक्रवारी (दि. १ डिसेंबर) रात्री आग लागून सुमारे आठशे भारे जळून खाक झाले. यात श्याम पाटील यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सदर नुकसानीची पाहणी करण्यासाठी रविवार, दि. ३ डिसेंबर रोजी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व माजी उपाध्यक्ष तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सहकार सेलचे सरचिटणीस नीलेश भोईर यांनी गातेस येथे पाटील यांच्या घरी भेट घेऊन घटनास्थळाची पाहाणी केली.

यावेळी त्यांच्यासोबत गातेस ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रशांत गोतारणे, गातेस सेवा सहकार संस्थेचे उपाध्यक्ष रोहिदास पष्टे, पंचकमिटी सदस्य परशुराम गोतारणे, रघुनाथ गोतारणे, दामोदर पाटील आणि जिल्हा बँकेचे वाडा व शिरीषपाडा बँक अधिकारी आणि सह. संस्थेचे सचिव उपस्थित होते.

यावेळी नीलेश भोईर यांनी बँकेच्या माध्यमातून तसेच विमा कंपनीच्या माध्यमातून नुकसानग्रस्त शेतकऱ्यास जास्तीत-जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रस्ताव तयार करून तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना बँक अधिकाऱ्यांना दिल्या व पाटील यांचे सांत्वन केले. यावेळी श्याम पाटील यांनी भेटीबाबत व मदतीस धावून आल्यामुळे समाधान व्यक्त केले.

चिंचणीत ८६ लाख १३ हजाराचे अमली पदार्थ जप्त

डहाणू (प्रतिनिधी) : डहाणू तालुक्यातील चिंचणी येथील कैलास तामोरे (वय ३६) हा आरोपी १ डिसेंबर २०२३ रोजी मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खराडतारा ब्रिजच्या खाली असलेल्या रस्त्यावर चरस या अमली पदार्थांची विक्री करीत असताना गस्तीवर असणाऱ्या गुन्हे शाखा कक्ष - ३ च्या पोलिसांनी त्याच्या कब्जात असलेल्या प्रत्येकी १.१ किलोग्रॅम वजनाच्या ११ लाख रुपये किमतीच्या चरससह त्याला ताब्यात घेतले. आरोपी तामोरे याने पोलिसांना दिलेल्या माहितीप्रमाणे, या गैरकृत्यात गुंतलेले त्याचे साथीदार, संकेत तामोरे (वय ३२), नीकेश दवणे (वय ३७, दोघेही रा. चिंचणी) यांना ताब्यात घेऊन चिंचणी येथील त्यांच्या घराची झडती घेतली असता ७.६५० किलोग्रॅम वजनाचा चरस या अमली पदार्थाचा साठा हस्तगत करण्यात आला. या गैरकृत्यात गुंतलेल्या तीनही आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून एकूण ८.७५० किलोग्रॅम वजनाचा ८६ लाख १३ हजार ३५० रुपये किमतीचा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. हा अमली पदार्थ कोठून आणण्यात आला याचा अधिक तपास विरार गुन्हे शाखा कक्ष - ३ यांच्यामार्फत करण्यात येत आहे. या गुन्ह्याबाबत मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, अटक आरोपींना ७ डिसेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. सदर कारवाई पो. आयुक्त गुन्हे अविनाश अंबुरे, पोलीस उपायुक्त गुन्हे मदन बल्लाळ यांच्या देखरेखी खाली गुन्हे शाखा कक्ष -३ ने उत्कृष्टपणे पार पाडली.

तीन आरोपींना सुनावली न्यायालयीन कोठडी

गावदेवीची साथ झाल्यानंतरच नागली मळणीला सुरुवात...

खळ्यावरील हट-हटचे आवाज अजूनही बंदच...!

◆ मोखाडा (वार्ताहर) :

वर्षातील आठ महिने उन्हाचे चटके आणि पावसाळ्यातील विजेचा कडकडाटासह मुसळधार पावसाचे पाणी सारत ढोर मेहनत करून काळ्याभोर मातीत पिकविलेली भात, नागलीची पिके कापणी झाल्यानंतर खळ्यावर मळणीसाठी आणून ठेवली आहेत; परंतु जोपर्यंत गावातील गावदेवाची साथची पूजा होऊन नवस दिला जात नाही, तोपर्यंत तरी भाताची व नागलीची मळणी ग्रामीण भागात केली जात नाही. त्यामुळे अजून तरी खळ्यावर मळणीच्या वेळी बैलांना दोरीच्या सहाय्याने मेढीला बांधून गोल गोल फिरवित 'हट-हट' असा दिला जाणारा आवाज ऐकायला मिळत नाही.

देशातील शेतकऱ्यांनी शेतातील पिकाचा पोत सुधारण्यासाठी जरी आधुनिकतेची कास धरली असली, तरी सुद्धा पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आजही पिढीजात परंपरेचे जतन आदिवासी बांधवांकडून रितीरिवाज पाळून केले जात आहे. जव्हार, मोखाडा तालुक्यांच्या ग्रामीण भागातील जवळपास ९९ टक्के आदिवासी जनता शेती व शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करून चार पैसे भविष्यातील अडीअडचणींसाठी राखून ठेवतात. त्यामुळे पावसाळ्यात खचिंक शेती करून उत्पन्न घेण्यापेक्षा परंपरागत शेतीकडे आजही ग्रामीण भागातील शेतकरी झुकलेला आहे.

साथीच्या दिवशी गावाच्या हद्दीत असलेल्या सर्व खळ्यावरून नागली पिकांची दोन-तीन कणसे गोळा करून ती रात्रभर गावदेवीजवळ ठेवली जातात व गावदेवी तसेच गावाच्या वेशीवर असलेल्या इतर देवांची रात्रभर गाणी सांगत डाक वाजवून जागरण केले जाते आणि सकाळी गावदेवीला नवस देऊन साथचा उगणवारा करून बळी दिलेल्या कोंबड्या, बकराचा नवस प्रसादाच्या रूपाने सगळ्या गावात वाटला जातो आणि दुसऱ्या दिवसापासून खळ्यावरील नागली पिकांची मळणीला सुरुवात करून धान्य घरी आणले जाते. गावदेवीची साथ ही गावोगावी होत असल्याने प्रत्येक घरातील आबालवृद्ध या गावकीच्या कामात एकत्र येऊन आपल्या गावाची एकी दाखवतात व गावदेवीचे परंपरेने जागरण करून पिकाची मळणी आटोपती घेतात.

जागरण कार्यक्रमानंतर गावपाड्यांत मळणी

● सध्या शेतातील पिकांच्या कापणीचा हंगाम संपला असून कापणी केलेली भात, नागलीची पिक शेतकऱ्यांने खळ्यावर आणून रचून ठेवली आहेत; परंतु पिकाची मळणी करायला सुरुवात केलेली नाही. जोपर्यंत गावातील गावदेवीच्या साथचा (जागरण) कार्यक्रम केला जात नाही, तोपर्यंत गाव-पाड्यांतील जनता आपल्या पिकांची मळणी करीत नाहीत. चालू वर्षी आलेल्या नव्या नागली पिकाचा मान पहिले गावदेवीला दिला जातो.

● गावदेवीच्या साथचा पहिला मान हा जव्हार तालुक्यातील कोरतड येथील कोरतोबा देवाला असून, या ठिकाणचा पहिले साथचा कार्यक्रम झाल्यानंतर जव्हार व मोखाडा तालुक्यांतील आदिवासी बांधव आपआपल्या गावपाड्यांत गावदेवीची साथ भरवून गावदेवीचा जागर करतात आणि त्यानंतरच नागली पिकांची मळणी करतात.

● देशातील राजकारणाचे गावपाड्यांतही शिरकाव असल्याने प्रत्येक गावागावांत गट तट झालेले आहेत, त्यामुळे एखाद दुसरा गाव सोडला, तर आजही ग्रामीण भागातील नागरिक या पिढीजात परंपरेचे जतन करताना दिसतात.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची ३८वी

किशोर, किशोरी राज्य अजिंक्यपद, निवड चाचणी

◆ पालघर (वार्ताहर) :

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने ३८वी किशोर व किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन के. डी. हायस्कूल, चिंचणी, पालघर येथे संपन्न झाले. किशोर गटात धाराशिवने ठाण्यावर, तर किशोरी गटात सोलापूरने चुरशीच्या सामन्यात धाराशिववर २ गुणांनी मात करीत ३८व्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे विजेतपद पटकाविले.

किशोरांमध्ये धाराशिवचे हे सलग चौथे अजिंक्यपद आहे, तर एकूण पाचवे अजिंक्यपद आहे. किशोरींमध्ये सोलापूरचे हे एकूण दुसरे अजिंक्यपद आहे. यावेळी उस्मानाबादच्या हारद्या वसावेला राणाप्रताप, तर सोलापूरच्या मैथिली पवारला हिरकणी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हारदया व मैथिली हे या स्पर्धेतील अष्टपैलू खेळाडू ठरले. सलग दुसऱ्या वर्षी हारदया वासावेला राणाप्रताप पुरस्कार मिळाला आहे.

पालघर येथे रविवारी (दि. ३ डिसेंबर) सकाळच्या सत्रात अंतिम सामने खेळविण्यात आले. किशोर गटातील अंतिम सामन्यात धाराशिवने ठाण्याचा ९-८ (मध्यंतर ८-४) असा सहा मिनिटे राखून एक गुणाने दणदणीत पराभव करीत सलग चौथे अजिंक्यपद मिळविले. मध्यंतराला धाराशिवने चार गुणांची घेतलेल्या आघाडीमुळे त्यांचा विजयाचा मार्ग सुकर झाला. दुसऱ्या आक्रमणात ठाण्याला चार गडी बाद करता आले, त्यामुळे हा सामना धाराशिवने सहज जिंकला. विजयी धाराशिवर्फे हारद्या वसावे (१.४०, २.३० मि. संरक्षण व ३ गुण), भिमसेन वसावे (१.५०, १.१० मि. संरक्षण व ३ गुण), विरसिंग पाडवी (१.३०, १.३० मि. संरक्षण) यांनी चौफेर खेळ करीत मोठा विजय मिळवून दिला. तर पराभूत ठाण्याच्या ओंकार सावंत (२.२० मि. संरक्षण व १ गुण), विनायक भांगे (३ गुण) यांनी चांगला खेळ केला.

किशोरी गटाचा अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. सोलापूर संघाने २ गुणांनी धाराशिवला पराभूत केले. शेवटपर्यंत थरारक ठरलेल्या या सामन्यात सोलापूरच्या स्नेहा लामकाणे (३, २.४० मि. संरक्षण व २ गुण), अनुष्का पवार (१.३० मि. संरक्षण व ४ गुण), कल्याणी लामखणे (१.१०, १ मि. संरक्षण व २ गुण), समृद्धी सुरवसे (२.३० मि. संरक्षण व ३ गुण) यांनी विजयात महत्त्वाची कामगिरी बजावली.

वैयक्तिक पारितोषिके

उत्कृष्ट संरक्षक : ओंकार सावंत (ठाणे), स्नेहा लामखणे (सोलापूर)
उत्कृष्ट आक्रमक : भीमसेन वसावे (धाराशिव), अनुष्का पवार (सोलापूर)

सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू

राणाप्रताप पुरस्कार : हारद्या वासावे (धाराशिव)
हिरकणी पुरस्कार : मैथिली पवार (धाराशिव)

किशोर गट : धाराशीव (विजयी), ठाणे (उपविजयी), पुणे (तृतीय), सातारा (चतुर्थ).
किशोरी गट : सोलापूर (विजयी), धाराशिव (उपविजयी), सांगली (तृतीय), पुणे (चतुर्थ).

गणेशपुरी येथे जागतिक एड्स दिन साजरा

◆ वाडा (वार्ताहर) :

गणेशपुरी येथील प्रसाद चिकित्सा धर्मादाय संस्थेच्या वतीने शुक्रवारी (दि. १ डिसेंबर) जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला.

जगभरात एड्स या आजाराविषयी लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी १ डिसेंबर हा दिवस 'जागतिक एड्स दिन' म्हणून साजरा केला जातो. प्रसाद चिकित्सा संस्थेच्या रुग्णालयात रुग्णांना एड्स या आजाराविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच यानिमित्ताने एड्स या आजारावर जनजागृती करणारे पोस्टर तयार करण्याची स्पर्धा शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विजेत्या स्पर्धकांना संस्थेच्या वतीने पारितोषिक वितरण करण्यात आले.

वसई - विरार मनपाच्या अतिरिक्त आयुक्तांना पितृशोक

विरार (वार्ताहर) : वसई - विरार मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडेंचे पिताश्री वसंत बगाडे (७४) यांचे वृद्धापकाळाने पुणे येथे त्यांच्या राहत्या घरी नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व मुले असा परिवार आहे. त्यांच्यावर पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांना वसई - विरारमधील नागरिकांनी श्रद्धांजली वाहिली.

जिल्ह्यातील ७ हजार अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे आजपासून काम बंद आंदोलन

◆ पालघर (प्रतिनिधी) :

वर्षानुवर्षे अंगणवाडी सेविका तुटपुंज्या मानधनावर आपले कर्तव्य बजावत आहेत. त्यांच्या मानधनात वाढ व्हावी, त्यांना ग्रॅज्युएटी मिळावी, पेन्शन योजना लागू करावी या व इतर अनेक मागण्यांसाठी पालघर जिल्ह्यातील ७ हजार अंगणवाडी सेविका व मदतनीस या ४ डिसेंबरपासून महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने राज्यव्यापी संपामध्ये सहभागी होणार आहेत.

अंगणवाडी कर्मचारी १९७५ पासून एबाविसे योजनेमध्ये पूर्णवेळ लहान बालक, किशोरवयीन मुली, गरोदर माता व स्तनदा मातांची काळजी घेऊन पुढची पिढी घडविण्याचे कर्तव्य बजावित आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दिवसभर काम करूनही अनेक व्यवसायाच्या किमान वेतनापेक्षाही अत्यंत तुटंपुजे मानधन मिळत आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये शासनाने जी मानधन वाढ केली होती, ती अत्यंत कमी होती. सध्याच्या महागाईमध्ये अत्यंत तुटपुंज्या मानधनात काम करणाऱ्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना आपला चरितार्थ चालविणे मुश्किल होत आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचा विचार करून अंगणवाडी सेविकांना दरमहा २६००० रु. व अंगणवाडी मदतनीसांना २२००० रु. मिळणे आवश्यक आहे. १ डिसेंबर २०२३ पासून अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधनवाढ देण्यात यावी.

> राज्यातील दोन लाख अंगणवाडी सेविका व मदतनीस १३ हजार मिनी अंगणवाडी सेविका त्यांच्या अनेक मागण्या सरकारकडे प्रलंबित आहेत. या मागण्या सरकारने मान्य कराव्यात याकरिता ४ डिसेंबरपासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे.
>
> - **राजेश सिंग** (संघटक चिटणीस, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ)

अंगणवाडी सेविकांना पाच वर्षे व दहा वर्षे सेवा संपल्यानंतर अनुक्रमे ३१ रू. व ६३ रू. वाढ देण्यात येत होती. २०१७ पासून ही वाढ बंद झाली आहे. ही रक्कम पूर्वलक्षीप्रभावाने देण्यात यावी. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दरवर्षी ३० दिवसांची आजारपणाची भरपगारी रजा देण्यात यावी. १० वर्षे सेवा, ५५ वर्षाची वयोमर्यादा व एस.एस.सी. पास असलेल्या अंगणवाडी सेविकांना मुख्यसेविकेच्या पदाकरिता पात्रता ठरविण्यात आली होती; परंतु २०२२ साली महिला व बालविकास विभागाने नवीन अधिसुचनेनुसार ४५ वय व पदवीधर नियम तयार केल्यामुळे वर्षानुवर्षे सेविकेमधून मुख्यसेविकेच्या पदासाठी पात्र असलेल्या अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका पदाकरिता अपात्र ठरणार आहे, म्हणून २ जानेवारी २००२ च्या शासन निर्णयानुसार सेविकेमधून मुख्यसेविकाची भरती करण्यात यावी व २०२२ सालाची अधिसूचना रद्द करण्यात यावी.

अंगणवाडी महिला कर्मचारी मदतनीस व मिनी सेविकेंना सेविकेच्या पदावर थेट नियुक्ती मिळण्यासाठी १३ ऑगस्ट २०१४ रोजीचा शासकीय आदेशात दहावी पासची अट होती. २ फेब्रुवारी २०२३च्या शासकीय आदेशात सेविकेचा पदावर थेट नियुक्ती मिळू शकणार नाही, याचा विचार करून मदतनीस, मिनी सेविकांना सेविका पदावर थेट नियुक्ती मिळेल यासाठी मदतनीस, मिनी सेविकांना पूर्वीचा दहावी पासचीच अट ठेवावी, अशी मदतनीसांची मागणी आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना २०१४ च्या शासन निर्णयानुसार, एकरकमी सेवानिवृत्ती लाभ देण्याचे निर्णय आहे. बहुसंख्य अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अजूनही सेवानिवृत्तीचे लाभ मिळालेले नाही. तो लाभ १० टक्के व्याजासह देण्यात यावा, अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन राज्यभर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

संविधानाला हात लावला, तर मी गप्प बसणार नाही : रामदास आठवले

◆ पालघर (प्रतिनिधी) :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान बदलणे एवढे सोपे काम नाही, मी मंत्रिमंडळात आहे. डॉ. बाबासाहेबांच्या संविधानाचे रक्षण करण्यासाठी मी तिथे आहे. संविधानाला कोणी हात लावला, तर मी गप्प बसणार नाही, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पालघर तालुक्यातील विराथन बुद्रुक येथे केले.

विकसित भारत संकल्प यात्रा अंतर्गत विराथन बुद्रुक येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी एक पालघर तालुक्यातील सफाळे येथील विराथन खुर्द येथे आदिवासी अभियान दिवसानिमित्ताने विकसित भारत संकल्प यात्रा मोहिमेअंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. यामध्ये विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून आयुष्यमान भारत प्रधानमंत्री, गरीब कल्याण अन्न योजना, राष्ट्रीय ग्रामीण प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, किसान सन्मान क्रेडिट कार्ड योजना, पोषक अभियान, हर घर जलजीवन मिशन, जनधन योजनाच्या माध्यमातून व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. आदिवासी बांधव शासकीय योजनेचा लाभांपासून वंचित आहेत अशा आदिवासी बांधवांना विविध शासकीय योजनांचा लाभ देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधन्याचा मुख्य उद्देश आहे.

व पंचायत समिती पालघर यांच्यामार्फत व्यंधत्व निवारण अभियानासाठी रामदास आठवले आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार राजेंद्र गावित मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन झाले, हे शिबीर १९ डिसेंबर २०२३ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

२०२४ मध्ये तुम्ही आमच्यासोबत आहात, जनता ज्याच्या पाठिशी असते सत्ता त्याच्या गाठिशी असते. नरेंद्र मोदी कोणाच्या विरोधात नाहीत. सर्व जाती धर्मांना ते समान मानतात, असेही आठवले यावेळी म्हणाले. डॉ. बाबासाहेबांचे संविधान बदलणे एवढे सोपे काम नाही. सध्या प्रचार करण्यात येतो संविधान बदलण्यात येणार आहे, हे सरकार संविधानाप्रमाणे चालत नाही, काम करीत नाही. अशा पद्धतीचे खोटे आरोप करून लोकांमध्ये गैरसमज निर्माण करण्याचे काम केले जात आहे. डॉ. बाबासाहेबांच्या संविधानाचे रक्षण करण्यासाठीच मी मंत्रिमंडळात आहे, संविधानाला कोणी हात लावला, तर मी गप्प बसणार नाही, असेही आठवले यावेळी म्हणाले.

मराठा समाजातील गरिबांना आरक्षण मिळाले पाहिजे, मराठा समाजाला आरक्षण म्हणजे सर्व मराठ्यांना आरक्षण असे नाही, म्हणून जरांगे-पाटील आणि मराठा समाजाची जी मागणी आहे त्याला आमचा पूर्ण पाठिंबा आहे; परंतु ओबीसी समाजावर अन्याय होऊ नये. त्यामुळे मराठा समाजासाठी वेगळी कॅटेगिरी करावी, त्यांना स्वतंत्रपणे आरक्षण द्यावे. तामिळनाडू व बिहार राज्यांप्रमाणे महाराष्ट्र सरकारने विचार करायला हवा आणि मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे व ओबीसी समाजावर अन्याय होता कामा नये, ही आमची भूमिका आहे. सरकार आरक्षण देईल आणि आपल्याला जे आरक्षण मिळेल ते टिकणारे आरक्षण असले पाहिजे, असेही आठवले यावेळी म्हणाले.

शवपेटीअभावी तीन दिवस शव चक्क लाकडाच्या पेटीत

◆ पालघर (प्रतिनिधी) :

मनोर ग्रामीण रुग्णालयाच्या शवविच्छेदन गृहामध्ये बेवारस मृतदेह ठेवण्यासाठी शवपेटी उपलब्ध न झाल्यामुळे मृतदेह तीन दिवस चक्क लाकडाच्या पेटीत ठेवण्यात आला होता. मरणानंतरही श्वासयातना भोगायला लागल्याचा धक्कादायक प्रकार मनोर ग्रामीण रुग्णालयातून समोर आला आहे.

मनोर नांदगाव येथे एक बंद पडलेल्या हॉटेलच्या बाहेर एका फकिराचे शव मृतअवस्थेत सापडले होते, त्याचे शवविच्छेदन झाल्यावर ते शव ठेवण्यासाठी कुठे जागा उपलब्ध नसल्यामुळे मनोर पोलिसांनी हे शव तिथे ठेवण्यासाठी रुग्णालयाला सांगितले होते. मात्र रुग्णालय व्यवस्थापनाकडे शेवपेटी नसल्यामुळे रुग्णवाहिका चालक अकील सय्यद यांनी त्यांच्याकडे असलेल्या लाकडी शवपेटी आणून त्यामध्ये हे शव २०, २१, २२ नोव्हेंबरपर्यंत ठेवण्यात आले. मृत्यूनंतरही व्यक्तीस यातना भोगाव्या लागत असतील, तर आरोग्य खाते नेमके करते काय?, असाही प्रश्न या निमित्ताने नागरिकांकडून विचारला जात आहे.

हे रुग्णालय मुंबई-अहमदाबाद हायवेपासून २ किमी अंतरावर आहे. या महामार्गावर अपघाताच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असतात.

गं. द. आंबेकर चषक कबड्डी स्पर्धा ९ डिसेंबरपासून

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

येत्या ९ डिसेंबरपासून गं. द. आबेकर भव्य कबड्डी स्पर्धेला आरंभ होत आहे. ना. म. जोशी मार्ग, डिलाईल रोडला कबड्डीची पंढरी समजली जाते. पुरुष 'अ' गटाच्या स्पर्धा श्रमिक जिमखाना, ना. म. जोशी मार्ग येथे सालाबादप्रमाणे संध्या ७ वा. सुरू होऊन कबड्डीची पंढरी फुलून येणार आहे.

अध्यक्ष सचिनभाऊ अहिर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार असून, सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांच्या उपस्थितीत पार पडणाऱ्या या उद्घाटन सोहळ्याला वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद चंदनशिवे, शालिनी सहकारी बँकचे चेअरमन ॲड. अप्पासाहेब देसाई, महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाचे उपाध्यक्ष राजन लाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यापूर्वी ७ डिसेंबर रोजी सका. १०वा. 'आंबेकर प्रतिष्ठान कॉलेज' विद्यार्थ्यांच्या क्रिकेट स्पर्धा नरे पार्क येथे पार पडतील.

रविवार दि. १० डिसेंबर रोजी सकाळी ९ नंतर दिवसभर स्थानिक शुटिंग बॉल स्पर्धा या पराग हायस्कूल-भांडूप(पश्चिम) येथे पार पडतील. स्पर्धेचे उद्घाटन शूटिंग बॉल असोसिएशचे अध्यक्ष माजी आमदार श्याम सावंत यांच्या हस्ते होईल. असोचे सेक्रेटरी दीपक सावंत, माजी आ. सुभाष बने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील, अशोक चव्हाण सामन्याचे संयोजन करतील, तर त्याच दिवशी संध्या. ६ वा. स्थानिक महिला-पुरुष 'अ' गटाच्या स्पर्धा, श्रमिक जिमखाना येथे पार पडतील. उद्घाटक माजी महापौर महादेव देवळे असून, श्री संकल्प प्रतिष्ठानच्या संचालिका संगीता अहिर, कबड्डी पटू माया आखरे मेहेरे (अर्जुन पुरस्कार विजेती) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दि. ११ डिसेंबर रोजी सकाळी १० वा. मजदूर मंझील, मामा फाळके सभागृह व रेस्टॉरंट हॉलमध्ये बुद्धिबळ व कॅरम स्पर्धा पार पडतील. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार ८४ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने मंगळवार, १२ डिसेंबर रोजी श्रमिक जिमखाना येथे संध्या. ६वा. कबड्डी 'अ' गट, स्थानिक पुरुष-महिला 'अ' गटाचे अंतिम सामने पार पडतील. विजेत्यांना अंतिम विजयी चषकाबरोबरच 'शरद पवार चषक' देऊन क्रीडाप्रेमींकडून पवार यांचे अभिष्टचिंतन करण्यात येईल. अध्यक्ष आमदार अहिर, सरचिटणीस मोहिते यांच्या हस्ते बक्षीस वितरण पार पडेल. याप्रसंगी अनिल तिवारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

संविधान प्रचार व प्रसार मंच, राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे औद्योगिक प्रशिक्षण संस्था जव्हार येथे

संविधान गुणगौरव परीक्षा - २०२३ उत्साहात संपन्न

◆ जव्हार (वार्ताहर) :

औद्योगिक प्रशिक्षण संस्था जव्हार येथे दि. २ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे औद्योगिक प्रशिक्षण संस्था जव्हार व संविधान प्रचार व प्रसार मंच जव्हार यांच्या संयुक्त विद्यमाने रक्षित सामाजिक संस्था अंतर्गत स्थापित संविधान गुणगौरव समिती यांच्यामार्फत घेण्यात येणारी संविधान गुणगौरव परीक्षा - २०२३ उत्साहात संपन्न झाली.

रक्षित सामाजिक संस्था अंतर्गत समिती

सदर कार्यक्रमावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामूहिक संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून तहसीलदार जव्हार लता धोत्रे यांच्या हस्ते प्रश्नपत्रिकांचे पाकिट उघडण्यात आले व परीक्षार्थींना वाटप करण्यात आले. सदर यावेळी केंद्रात ३८ मुली व ४२ मुले असे एकूण ८० जणांनी परीक्षा दिली. कार्यक्रम अधिकारी दिनेशकुमार पडवळ यांनी प्रास्ताविक केले, यात हे वर्ष संविधान दिनाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. आज संविधान साक्षर होणे किती गरजेचे आहे हे सांगून जर प्रश्न पडले तर उत्तरासाठी संविधानाचे वाचन होईल व संविधानाचा प्रचार-प्रसार होईल हे थोडक्यात स्पष्ट करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात या उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सुनील वाघ व प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश जोशी, मनोज कामडी पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

हा कार्यक्रम प्राचार्य शाम अंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच दिनेशकुमार पडवळ तालुका समन्वयक, महम्मद तोयब सत्तार मेमन यांनी केंद्र प्रमुख म्हणून काम पाहिले व शिक्षक राजेश हरळ, शशिराज बाविस्कर, राकेश कोळंबकर, प्रवीण मढवी, रूपाली ताटे, स्वप्नाली महाले यांचे पर्यवेक्षक म्हणून सहकार्य लाभले.

प्रहार संपादकीय

www.prahaar.in
epaper.prahaar.in
@PrahaarNewsLive

भाजपा बल्ले बल्ले...

मोदींचा करिष्मा, शहांची रणनिती

मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि तेलंगणा या राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकांचे रविवारी निकाल जाहीर झाले आणि मतदारांनी आपला विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर, अमित शहांच्या संघटन कौशल्यावर आणि भारतीय जनता पक्षावर असल्याचा कौल दिल्याचे स्पष्ट झाले. या तीनही राज्यांत भाजपाने अभूतपूर्व यश मिळवले. मध्य प्रदेशची सत्ता भाजपाने कायम राखली व तेथे काँग्रेसला अक्षरशः धूळ चारली. राजस्थानात आणि छत्तीसगडमध्ये भाजपाने काँग्रेसकडून सत्ता खेचून घेतली आणि तेलंगणात भाजपाच्या आमदारांची संख्या व पक्षाला झालेले मतदान यात लक्षणीय वाढ झाली. विधानसभा निवडणुकीत राजस्थान व छत्तीसगड या राज्यांत काँग्रेसला तेथील जनतेने काँग्रेसला साफ नाकारले. एवढेच नव्हे, तर भाजपाच्या पारड्यात भरभरून मतदान केले. निकालानंतर मोदी-मोदी असा जल्लोष या तीनही राज्यांत सर्वत्र झाला. निकालानंतर या तीनही राज्यांत पुन्हा एकदा दिवाळी साजरी झाली. 'आपला नेता नरेंद्र मोदी, आपला पक्ष भारतीय जनता पक्ष' हीच भावना सर्वसामान्य जनतेच्या हृदयात आहे, हे त्यांच्या आनंदावरून दिसत होते.

चार-पाच महिन्यांवर लोकसभा निवडणुका होणे अपेक्षित आहेत. या चार राज्यांत झालेली निवडणूक म्हणजे २०२४ची सेमीफायनल आहे, असे विश्लेषकांनी वर्णन केले होते. म्हणूनच मतदारांनी दिलेला कौल बघता २०२४मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीनंतर केंद्रात पुन्हा भाजपाचे सरकार येईल व पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी हॅटट्रिक करतील, हाच संदेश या निकालाने दिला आहे. 'मोदी हैं तो मुमकीन है' यावर भारतीय जनतेचा विश्वास आहे. मोदींच्या नेतृत्वाला देशपातळीवर कोणत्याही पक्षात पर्याय नाही. मोदींना तुल्यबळ असा नेता कोणत्याही पक्षात नाही. मोदीजी जे अहोरात्र देशासाठी प्रामाणीकपणे काम करीत आहेत, त्याला तोड नाही. गेल्या १० वर्षांत सर्व क्षेत्रांत भारताने विलक्षण प्रगती केली, जागतिक पातळीवर भारताने उंची गाठली. मोदींकडे सारे जग 'विश्वनेता' म्हणून बघू लागले. तसेच भारतीय नागरिकांना जगात सन्मान मिळू लागला. सर्वसामान्य माणसाचे जीवनमान मोदींच्या कामांमुळेच उंचावले. त्यांनी केलेले काम व त्यांनी केलेली सेवा यावर जनतेचा मोठा विश्वास आहे. मोदी, शहा व भाजपाच्या विरोधात कोणीही कितीही आदळआपट केली तरी या देशातील जनता मोदींबरोबर आहे आणि कमळालाच मतदान करते, हे गेल्या १० वर्षांत वेळोवेळी झालेल्या निवडणूक निकालांतून दिसून आले आहे.

राज्यस्थानमध्ये अशोक गेहलोत सरकारमधील अनेक मंत्री पराभूत झाले, छत्तीसगडमध्ये भूपेश बघेल सरकारमधील अनेक मंत्री हारले. विशेष म्हणजे भाजपाने या निवडणुकीत कोणत्याच राज्यात मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर केला नव्हता. तरीही भाजपाची जोरदार फलंदाजी निवडणुकीत बघायला मिळाली. दुसरीकडे काँग्रेसने तेच तेच चेहरे पुढे ठेवले. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेचा उदो उदो खूप झाला, पण त्याचा निवडणुकीत पक्षाला काही उपयोग झाला नाही. उत्तर भारतात आता हिंदी भाषिक राज्यांत काँग्रेस कुठे आहे, हे आता शोधावे लागेल. मध्य प्रदेशमधील १५ महिने वगळता २० वर्षे भाजपाची सत्ता आहे. शिवराज सिंह चौहान हे चारवेळा मुख्यमंत्री झाले. त्यांनी जनहिताची केलेली कामे व राबविलेल्या योजना यांचा लाभ घराघरांत पोहोचला आहे. 'लाडली बेहेन' या योजनेने महिला वर्गात भाजपाविषयी कमालीचा विश्वास वाढला. ज्योतिरादित्य शिंदे हे काँग्रेसमधून भाजपात गेल्यानंतर काँग्रेसचे जे मोठे नुकसान झाले ते आजतागायत भरून निघालेले नाही. राज्यात भाजपाची शक्ती वाढली आहे. शिवराज सिंह चौहान यांच्या सरकारविरोधात नकारात्मक लाट आहे, असा समज काँग्रेसने करून घेतला होता. २०१८ला भाजपापेक्षा आपल्याला काही जागा जास्त मिळाल्या म्हणजे २०२३ला आपण मोठे यश प्राप्त करणार, असे काँग्रेसने गृहीत धरले होते. काँग्रेसच्या मोठ्या नेत्यांनी मध्य प्रदेशात पक्षाला दीडशे जागा मिळतील, असे भाकीत व्यक्त केले होते. स्वतः राहुल गांधीही अशाच स्वप्नरंजनात होते. प्रत्यक्षात भाजपाला दीडशेपेक्षा जास्त जागा मिळाल्या व काँग्रेसचे स्वप्न भंग पावले.

राजस्थान व छत्तीसगड तर आपलेच आहेत, असे काँग्रेसचे नेते छातीठोकपणे सांगत होते. अशोक गेहलोत व भूपेश बघेल यांनी अलौकीक कामगिरी केली आहे, असे गृहीत धरून ते बोलत होते. वास्तवात चित्र काय आहे, याचा काँग्रेस हायकमांडने कधी शोध घेतला नाही. राजस्थानात घरगुती गॅस सिलिंडर स्वस्त देऊ, महिलांना बस प्रवास मोफत देऊ, अशी आश्वासने देऊनही महिला मतदारांनी काँग्रेसला मते दिली नाहीत. छत्तीसगडमध्ये काँग्रेस आपल्याच मस्तीत होती. सर्व एक्झिट पोल हे छत्तीसगडमध्ये काँग्रेसचीच पुन्हा सत्ता येणार, असे सांगत होते. मग काँग्रेसवर फासे कसे उलटले? मतमोजणी सुरू झाल्यावर तासभर काँग्रेस आघाडीवर होती, मग एकदम भाजपाची संख्या वाढू लागली. भाजपाने काँग्रेसला कधी ओलंडाले व मागे टाकले हे पक्षाच्या नेत्यांनाही कळले नसावे. राजस्थान व छत्तीसगड या दोन्ही राज्यांत काँग्रेसच येणार असे गृहित धरून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणलेले फटाके व मिठाई वाया गेली. भाजपाशी आणि अमित शहा यांच्या संघटन कौशल्याशी लढा देणे सोपे नाही, हे काँग्रेसच्या अजून लक्षात आलेले नाही.

तेलंगणामध्ये सत्ताबदल झाला, तो एकमेव काँग्रेसला दिलासा मिळाला. गेली दहा वर्षे केसीआर यांच्या नेतृत्वाखाली बीआरएसचे सरकार होते. पण मतदारांनी केसीआर यांना हटवून काँग्रेसला कौल दिला. राजस्थान व छत्तीसगड ही दोन राज्ये गमवावी लागल्याने तेलंगणाचा विजय काँग्रेसला साजरा करता आला नाही. पाच वर्षांपूर्वी तेलंगणात भाजपाचा केवळ एक आमदार होता. आता दोन आकड्यांकडे भाजपाने वाटचाल केली आहे व पक्षाला मिळालेल्या मतांची टक्केवारीही १३ टक्क्यांपर्यंत वाढली, हे फार मोठे यश म्हणावे लागेल.

सिंधुदुर्गात होणाऱ्या नौदल दिनाचे महत्त्व

गेल्या पाच महिन्यांपूर्वी घोषित केल्यानुसार मराठा आरमाराचे प्रमुख केंद्र म्हणून मान्यता असणाऱ्या ऐतिहासिक व अभेद्य सिंधुदुर्गावर सोमवारी यंदाचा नौदल दिन भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे. या सोहळ्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उपस्थित राहणार आहेत. एतद्देशीय तत्कालीन राजांमध्ये सर्वांत अगोदर आरमाराचे महत्त्व ओळखून छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतीय नौदलाचा पाया घातला. आता आपल्याला चीनच्या जगातील सर्वात बलाढ्य नौदलाशी स्पर्धा करायची आहे. सिंधुदुर्गात होणाऱ्या या नौदल दिनाचे महत्त्व त्यामुळे आगळेवेगळे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आरमार व सागरी सुरक्षेला प्राधान्य दिले होते. व्यापारी, चाचे आणि ब्रिटिशांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सागरी गडांची गरज असल्याचे शिवरायांनी जाणले आणि त्यातूनच अभेद्य असा सिंधुदुर्ग बांधला. नौदल दिनानिमित्त हिंदुस्थानी नौदलाच्या सामथ्यांचे शक्तिप्रदर्शन सिंधुदुर्गाच्या समुद्रात होणार आहे. पाकिस्तानविरुद्ध १९७१मध्ये झालेल्या युद्धादरम्यान भारतीय नौदलाने पाकिस्तानच्या कराची बंदरावर जोरदार हल्ला करून पाकिस्तानला गुडघे टेकायला भाग पाडले होते. त्यानिमित्त दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदलातर्फे विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतावर त्यावेळी आक्रमण करायला निघालेल्या अमेरिका आणि ब्रिटनच्या आरमाराला परत जावे लागले होते. त्याचे कारण रशियन पाणबुड्या भारताच्या मदतीला आल्या होत्या. आता भारत, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया अशा देशांना भारताच्या नोदलाच्या संयुक्त मोहिमा चालू असतात, तरीही जगातील सर्वांत शक्तीशाली नौदल चीनचे आहे. आपण विशाखापट्टणम तसेच अंदमान-निकोबारवर नौदलाची अत्याधुनिक केंद्र स्थापन केली आहेत; परंतु चीन ग्वादर, हंबनटोटा तसेच म्यानमार आणि मालदीवमधील बंदरांवरून भारताच्या सागरी हालचालीवर पाळत ठेवतो आहे. अशा परिस्थितीत आपले नौदल अधिक सामर्थ्यशाली असायला हवे. सरकार त्यादृष्टीने प्रयत्न करतेच आहे.

शिवाजी महाराजांनी ज्या पद्धतीने ब्रिटिश, पोर्तुगीज आणि डच आरमारांना शह दिला, त्या पद्धतीने आपल्यालाही आता व्यूहरचना करावी लागेल. सिंधुदुर्गातील नौदल दिनानिमित्ताने ७० लढाऊ जहाजे सहभागी होणार आहेत. यंदाच्या नौसेना दिनानिमित्त भारतीय नौसेनेच्या सामर्थ्याचे मोठे शक्तिप्रदर्शन सिंधुदुर्गच्या समुद्रात होणार आहे. जगात चौथ्या क्रमांकाची बलाढ्य नौसेना म्हणून भारतीय नौसेनेला जगात ओळखले जाते. १९७१ च्या भारत-पाक युद्धादरम्यान भारतीय नौसेनेने पाकिस्तानच्या कराची बंदरावर जो वज्राघात केला होता, त्यामुळे पाकिस्तानला सपशेल शरणागती पत्करावी लागली होती. या वज्राघाताने भारतीय नौसेनेची खरी ताकद साऱ्या जगाला कळून चुकली आणि त्यामुळेच दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौसेना विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. शिवाजी महाराजांना 'भारतीय आरमाराचे जनक' असे म्हटले जाते. समुद्रावर ज्याचे वर्चस्व त्याचे जगावर वर्चस्व, हे सूत्र शिवरायांनी सर्वप्रथम ओळखले होते. ब्रिटिश व्यापाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सागरी किल्ल्यांची गरज असल्याचे शिवरायांनी जाणले आणि अनेक जलदुर्गांची निर्मिती केली. त्यामध्ये सिंधुदुर्ग या किल्ल्याचा सर्वात वरचा क्रमांक लागतो.

डोंगरी किल्ल्यांच्या बरोबरीने अरबी समुद्रावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जलदुर्गांचे महत्त्व आहे, हे सर्वप्रथम शिवाजी महाराजांनी ओळखले. त्यानंतर त्यांनी सागरी किल्ल्यांची निर्मिती सुरू केली. स्वराज्यातील एक महत्त्वाचा सागरी किल्ला असलेला सिंधुदुर्ग हा त्यापैकीच एक. या किल्ल्याच्या निर्मितीसाठी शिवरायांनी मालवणजवळील कुरटे नावाचे काळाकभिन्न खडक असलेले बेट निवडले. २५ नोव्हेंबर १६६४ रोजी शिवरायांनी सिंधुदुर्ग किल्ल्याची पायाभरणी केली. शिवरायांच्या हस्ते ही पायाभरणी करण्यात आली. या किल्ल्याच्या पायाभरणीसाठी ५०० खंडी शिशाचा वापर करण्यात आल्याचे सांगितले जाते. पोर्तुगीज, इंग्रज व सिद्दी या आक्रमकांपासून वाचवायचे असेल तर स्वतःचे आरमार हवे, हे शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्यावेळीच ओळखले होते. तथापि, भारतातील पौर्वात्य राज्यकर्त्यांची नौकानयनाची परंपरा जास्त करून शांततापूर्ण, व्यापारी स्वरूपाची होती. शिवाय इंग्रज, डच, पोर्तुगीज किंवा सिद्दी यांच्याकडून आरमार उभे करण्याची महत्त्वाची विद्या शिवाजी महाराजांना मिळणे अशक्य होते. ज्याच्याजवळ आरमार, त्याचा समुद्र! आरमाराची आवश्यकता सांगताना शिवाजी महाराजांनी हे आग्रहपूर्वक सांगितले. निजामशाही, कोकण ताब्यात आल्यावर लवकरच शिवाजी महाराजांनी कल्याण, भिवंडी व पेण येथे युद्धनौका बांधण्याचे काम हाती घेतले. ते कळल्यावर पोर्तुगिजांचे सल्लागार मंडळ म्हणते, "शिवाजी बलाढ्य असल्याने, तसेच कल्याण भिवंडीचा व त्या परिसरातील सर्व कोकणचा मालक असल्याने ते आमचे बरेच नुकसान करू शकतात. त्याच्याशी मैत्री टिकवणे आवश्यक आहे." या पत्रावरून शिवाजी महाराजांचा परकियांवर किती वचक होता, हे लक्षात येते. शिवाजी महाराजांना सागरी सामर्थ्याचे महत्त्व ठाऊक होते, म्हणूनच त्यांनी आरमार निर्माण केले; पण जमिनीवरील शत्रूंना तोंड देत राज्यविस्तार करण्यासाठी वाढत्या संख्येने भूसेना, विशेषतः घोडदळ बाळगणे आवश्यक होते, ते करून शिवाय सिद्दीच्या आरमाराचा कायमचा नाश करू शकेल, एवढे प्रबळ आरमार लगेच निर्माण करण्याएवढे आर्थिक सामर्थ्य त्यांच्याकडे नव्हते. मग सुरतेची लूट व आदिलशाही मुलखात लूट करून शिवाजी महाराजांनी आरमार उभे करण्यासाठी आर्थिक बळ उभे केले. जहाजबांधणी, जहाजांसाठी सुरक्षित बंदरे, जहाज-दुरुस्तीची तरतूद व या जहाजांसाठी लागणारे शिक्षित आरमारी सैनिक तयार करणे, ही सर्व कामे त्यांनी चालूच ठेवली. इंग्रजांनी २६ नोव्हेंबर १६६४ रोजी पाठवलेल्या

पत्रात कंपनीला कळवले, की शिवाजी विजयी व अनिर्बंध असून त्यांचे सामर्थ्य रोज वाढत आहे. सभोवतीच्या राजांना त्याची मोठी दहशत वाटते. त्यांनी आता ८० जहाजे सुसज्ज करून भटकळकडे पाठवली आहेत. यावरून लक्षात येते, की शिवाजी महाराजांच्या वाढत्या आरमारी बळाचा इंग्रजांनी चांगलाच धसका घेतला होता.

एप्रिल-मे १६७५ मध्ये शिवाजी महाराजांनी फोंडा किल्ला जिंकल्यामुळे त्यांच्या ताब्यातील किनारपट्टीत वाढ झाली. मग आदिलशाहीला पश्चिमेकडे किनारपट्टीच उरली नाही. म्हणजे आदिलशहाचा मुलुख, तर गेलाच आणि शिवाय अरबी समुद्रातून होणारा व्यापार शिवाजी महाराजांच्या हाती आला. ही गोष्ट महाराजांच्या वाढत्या नाविक सामर्थ्याला पोषक ठरली. जेतापूरहून मुंबईस पाठवलेल्या इंग्रजांच्या एका पत्रात असा उल्लेख आहे, की शिवाजीकरिता युद्धनौका बांधण्याचे काम चालू असल्याने त्यांचे नोकर सापडतील ते सुतार, लाकूडकापे व लोहार यांना त्याच कामात जुंपत आहेत व त्यामुळे आपल्या कामासाठी कामगार मिळणे आणि त्याहीपेक्षा ते टिकवून ठेवणे कठीण होऊन बसले आहे. शिवाजी महाराजांच्या आरमार बांधणीच्या तयारीवर कंपनी सरकारचे बारीक लक्ष होते. शिवाजी महाराजांनी शून्यातून आपले आरमार निर्माण केले. पोर्तुगीजांचा व सिद्दीचा विरोध असताना हे काम करायचे होते. हा सर्व उद्योग मोगलांना व आदिलशाहीला तोंड देत असताना, जमिनीवरील युद्धाच्या सर्व गरजा भागवून करायचा होता. असे असूनही या सर्व अडचणींमधून मार्ग काढून शिवाजी महाराजांनी आपले आरमार निर्माण केले. एवढेच नव्हे, तर बसरूरच्या स्वारीत त्यांनी स्वतः त्या आरमाराचे नेतृत्व केले! समुद्राचा अजिबात अनुभव नसलेल्या मराठी माणसांनी इंग्रजांसारख्या कुशल दर्यावर्दी लोकांच्या विरोधाला न जुमानता खांदेरीच्या किल्ल्याचे काम तडीस नेले. सोळाव्या शतकात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात घुसू पाहणाऱ्या सर्व युरोपियनांवर मात केली, तरीही पुढील शंभर वर्षे मराठा राज्याच्या वाढीमुळे पश्चिम किनाऱ्यावर ब्रिटिशांना फारशी प्रगती करता आली नाही. याचे कारण होते शिवाजी महाराजांनी उभारलेले आरमार!

भारताच्या इतिहासात यापूर्वी कोणत्याही एतद्देशीय सत्तेने इंग्रजांशी नाविक युद्ध केले नव्हते आणि त्यानंतरही मराठ्यांखेरीज या देशातील इतर कोणत्याही सत्तेने ते केले नाही. त्यात सिंधुदुर्ग किल्ल्याचे महत्त्व आणखी वेगळेच आहे. एकाच वेळी तीन शत्रूंवर लक्ष ठेवून त्यांच्यांशी लढण्यासाठी हा किल्ला बांधला. त्यावर एक कोटी होन खर्ची पडले. या किल्ल्याच्या उभारणीसाठी ३ वर्षांचा कालावधी लागला. ऐतिहासिक सौंदर्य लाभलेला किल्ला अशी ओळख असलेला सिंधुदुर्ग जवळपास साडेतीनशे वर्षे समुद्राच्या लाटा झेलत उभा आहे. या किल्ल्याचे क्षेत्र सुमारे ४८ एकर आहे आणि त्यांचा तट दोन मैल इतका आहे. या तटाची उंची ३० फूट तर रूंदी १२ फूट आहे. या किल्ल्याच्या तटास ठिकठिकाणी भक्कम असे २२ बुरुज आहेत. सिंधुदुर्ग या किल्ल्यावर शिवरायांच्या उजव्या हाताचे व डाव्या पायाचे ठसे उमटलेले आहेत. या किल्ल्यामध्ये शिवाजी महाराजांचे शंकराच्या रूपातील एक मंदिर आहे.

नौदल दिनासाठी नौदलाच्या पश्चिम कमांडच्या युद्धनौकांचा ताफा मालवणकडे रवाना झाला आहे. नौदल दिनाच्या कार्यक्रमात प्रामुख्याने आयएनएस कोलकाता, आयएनएस तलवार, आयएनएस ब्रह्मपुत्र क्लासच्या जवळपास आठ मोठ्या युद्ध नौका, तर १० ते १२ छोट्या युद्ध नौका तारकर्लीच्या समुद्रात दाखल होणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे 'आयएनएस विक्रमादित्य' ही विमानवाहू युद्धनौकासुद्धा या ताफ्यात सहभागी होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. तारकर्ली समुद्रात नौदलाच्या संचलनात ४ विनाशिका, ४ फ्री-गेट्स, ६ कॉर्वेट्स व क्षेपणास्त्रवाहू नौका, ८ जलद हल्ल्याच्या युद्धनौका सहभागी होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर ध्रुव हे ॲडव्हान्स लाइट हेलिकॉप्टर, चेतक, सी किंग हे हेलिकॉप्टर आणि तेजस, डॉर्निअर, मिग २९ के आदी एअरक्राफ्ट आपल्या कसरती दाखविणार आहेत. नौदलाचे मरिन कमांडो पॅराशूटमधून खाली उतरत समुद्रात विविध कसरती करताना पाहावयास मिळणार आहेत. युद्धनौकांवरून होणारे हल्ले, शत्रूच्या हल्ल्याचा सामना करणे, समुद्री चाच्यांवर कमांडो हल्ला करणे, समुद्री बचाव, हेलिकॉप्टर कसरती अशी विविध प्रात्यक्षिके ४ डिसेंबरला सायंकाळी तारकर्ली समुद्रात पाहावयास मिळणार आहेत. त्या आधी या कार्यक्रमाची रंगीत तालीम सुरू आहे.

बहुतांश युद्धनौका मुंबईतील तळावरून जातील, तर काही युद्धनौका कारवार येथील विमानवाहू युद्धनौकेच्या ताफ्यातील असतील. अतिमहनीय व्यक्तींसाठी उभारल्या जाणाऱ्या शामियान्याच्या सुरक्षिततेसाठी समुद्रात सुमारे १३० मीटर लांबीचा जिओ ट्यूबचा बंधारा बांधण्याचे काम चालू आहे. यामध्ये १० मीटर लांबीच्या १३ जिओ ट्यूब वापरण्यात आल्या आहेत. या जिओ ट्यूबच्या बंधाऱ्यामुळे समुद्राच्या लाटांपासून मुख्य शामियान्याचे संरक्षण होणार आहे. असे असले, तरी विमानवाहू युद्धनौकांची तसंच पाणबुड्या व अन्य साधनसामुग्रीची कमतरता आहे. ती भरून काढावी लागेल.

महाराष्ट्राची औद्योगिक वाटचाल; गरज सुधारणांची

मुंबई डॉट कॉम

अल्पेश म्हात्रे

देशातील उद्योगसंपन्न, अर्थसंपन्न, प्रगत राज्य अशी महाराष्ट्राची ओळख आहे. आपली मुंबई देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. मुंबईची एकूण जडणघडण, भौगोलिक स्थान, योग्य मनुष्यबळ अशा अनेक सकारात्मक गोष्टींमुळे भारतीय आणि परदेशी उद्योगांची पहिली पंसती ही मुंबईला, पर्यायाने महाराष्ट्राला असते. अनेक मोठमोठ्या कंपन्यांची मुख्यालये मुंबईत आहेत. केंद्र सरकारच्या तिजोरीत जमा होणाऱ्या प्रत्यक्ष करापैकी ३७% (@ ५.२५ लाख कोटी रुपये) वाटा हा फक्त मुंबईचा आहे. गेल्या काही वर्षांत मुंबईबरोबरच पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर या भागांची औद्योगिक प्रगती वेगाने झाली आहे. विशेषतः पुणे विभागात अनेक कारखाने सुरु झाले आहेत आणि सॉफ्टवेअर कंपनी आल्या आहेत. आज देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा सर्वात जास्त, म्हणजे १४.५% इतका आहे.

अनेक वर्षे औद्योगिक क्षेत्रातील आपले प्रभुत्व महाराष्ट्राने टिकवून धरले आहे. परदेशी गुंतवणुकींमध्ये महाराष्ट्र राज्य अनेक वर्षे अग्रेसर राहिले आहे. पण आपण गेल्या दोन दशकाचा जेव्हा विचार करतो, तेव्हा देशातील इतर राज्य आता आर्थिक प्रगतीसाठी जोमाने काम करू लागली आहेत, हे लक्षात येते. २००१-२०२० या दोन दशकांमध्ये विविध राज्यांच्या आर्थिक वाटचालीचा आढावा घेतला, तर काही बाबी ठळकपणे दिसतात. या दोन दशकांत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ११.२ पटीने वाढली. त्याच काळात आंध्र प्रदेश (तेलंगणासमवेत), गुजरात, तामिळनाडू या राज्यांच्या अर्थव्यवस्था १४.२ पटीने मोठ्या झाल्या, तर कर्नाटकने १६ पटीने वाढ केली. या राज्यांची आर्थिक प्रगती ही तेथील उद्योगस्नेही वातावरणाचे फलित आहे आणि त्यामुळे परदेशी कंपन्यांना गुंतवणुकीसाठी नवे पर्याय निर्माण झाल्याचे दिसते. याबाबतीत महाराष्ट्राला आता या राज्यांबरोबर स्पर्धा करावी लागते आहे. या दोन दशकांत अनेक सॉफ्टवेअर कंपन्या कर्नाटक (बंगळूरू) आणि आंध्र प्रदेश-तेलंगणा (हैदराबाद) या दिशेने गेल्या; तर उत्पादन क्षेत्रात गुजरातने, विशेषतः ॲटोमोबाइल क्षेत्रात तामिळनाडूने मोठी मजल मारली आहे. उत्तर प्रदेशसारखे मोठे राज्य गेल्या ४-५ वर्षांत औद्योगिक प्रगतीसाठी विशेष प्रयत्न करीत आहे.

२०१९-२०२२ या ठाकरे सरकारच्या कार्यकाळात परदेशी गुंतवणुकींचा ओघ इतर राज्यांकडे वळलेला दिसला. वेदांत-फॉक्सकॉन, एअरबससारखे काही महत्त्वाचे प्रकल्प महाराष्ट्र सरकारकडून योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने ते इतर राज्यांत गेले. पूर्वी बड्या कंपन्यांचे कारखाने इतर राज्यांत गेले तरी त्यांचे मुख्यालय मुंबईत नक्की असायचे. पण टेस्लासारख्या मोठ्या कंपनीने आपले मुख्यालय बंगळूरुमध्ये उभारण्याचा निर्णय घेतला. असे मोठे प्रकल्प महाराष्ट्रात आले नाही, याबद्दल जनता नाराज झाली. पण तत्कालीन

सत्ताधारी मात्र आत्मचिंतन न करता पंतप्रधान मोदींवर दोष ढकलण्यात मशगूल होते.

केंद्र सरकारने त्याकाळात 'पीएम मित्र पार्क' ही योजना आणली होती. ज्यानुसार राज्य सरकारने १००० एकर किंवा अधिक जागा या योजनेसाठी द्यावी आणि तेथे कापसावर प्रक्रिया करून धागा, कपडा आणि तयार कपडे यासाठी उद्योग, पुढे त्याची निर्यात असे एक मोठे टेक्स्टाईल पार्क उभारले जाण्यास केंद्र सरकार मदत करणार होते. त्यासाठी राज्य सरकारने अर्ज करायचा होता. पण ठाकरे सरकार ढीम्म बसून राहिले. शेवटी तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी या विषयावर राज्य सरकारला धारेवर धरल्यावर अगदी शेवटच्या दिवशी हा अर्ज केला गेला. पुढे या पत्राचा पाठपुरावा करण्यात ठाकरे सरकारला स्वारस्य नव्हते, ते काम देवेंद्रजींनी केले. आज अमरावती येथे उभा होणारा प्रकल्प हे निव्वळ देवेंद्र फडणवीस यांचे यश आहे. आपण औद्योगिक धोरणांचा विचारच केलेला नाही, याबद्दल तुम्ही सुभाष देसाईंशी बोला, ते हेच उद्योग करतात", असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे एका मुलाखतीत म्हणाले. तर एका उद्योगासंबंधीत कार्यक्रमात आपल्याला बजेट वगैरे कळत नाही, असे ते केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांना म्हणाले. राज्याचे नेतृत्व करणारे महत्त्वाच्या विषयासंबंधी अशी धक्कादायक विधाने करत असताना त्यांवर तीव्र प्रतिक्रिया यायला हवी होती. पण त्यांची मुलाखत घेणाऱ्यांना आणि इतर माध्यमांना त्यांचे कौतुक वाटले. अर्थात त्याची बातमी झाली नाही.

गेल्या वर्षी जूनमध्ये सत्तांतर झाले आणि राज्याच्या अर्थखात्याची धुरा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आली. मधल्या काळात राज्यातील अनेक प्रकल्प जे बंद पडले होते किंवा थंडावले होते, त्यांनी पुन्हा गती घेतली. एक अभ्यासू नेता आणि कुशल प्रशासक अशी ख्याती असणाऱ्या देवेंद्रजींची उद्योग, अर्थ या विषयांवर चांगलीच पकड आहे. १६ सप्टेंबर २०२२ रोजी लघू उद्योग भारतीच्या अधिवेशनात उद्योजकांसमोर बोलताना आपण पुन्हा एकदा महाराष्ट्र परदेशी गुंतवणुकीच्या बाबतीत अग्रेसर होईल, असा निर्धार देवेंद्रजींनी व्यक्त केला होता. त्यांनी आपला शब्द खरा केला. २०२२-२३ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात १४.८ अब्ज डॉलर्स (१.२० लाख कोटी रुपये) इतकी परदेशी गुंतवणूक येऊन महाराष्ट्र पुन्हा एकदा पहिल्या क्रमांकावर आला. या काळात भारतात आलेल्या एकूण परदेशी गुंतवणुकींपैकी २९% इतके हे प्रमाण होते. योग्य राजकीय नेतृत्व असले की राज्याच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळते, हे स्पष्ट आहे.

महाराष्ट्रातून गेल्या ३ दशकांमध्ये रसायन, वस्त्रोद्योग, हिरे व्यवसाय, फाऊंड्री उद्योग यासारखे अनेक उद्योग इतर राज्यांत गेले. ते का गेले, याबद्दल जनता अनभिज्ञ आहे. कारण हे उद्योग राज्याबाहेर जाण्याची योग्य कारणमिमांसा आजवर झालेली नाही. राजकीय पक्षांचे परस्परांवर दोषारोप या पलीकडे ही चर्चा गेलेली नाही.

गेल्या काही दशकांत राज्यातील नोकरशाही किती असंवेदनशील झाली आहे, जेथे अधिकाऱ्यांकडून छोट्या उद्योगांना नाडले गेले आहे. सामान्य माणूस मोठ्या उमेदीने उद्योग चालू करण्याचे स्वप्न पाहतो. पण उद्योग सुरू होण्याआधीच चमत्कारिक प्रसंगाना त्याला सामोरे जावे लागते. त्याचा उत्साह संपतो. उद्योग चालू होऊन रोजगार निर्मिती होण्याची प्रक्रिया अशी थांबवली जाते.

राज्यांत उद्योगासाठी जागा मिळणे दुरापास्त झाले आहे. कारखान्यासाठी वीज जोडणी, विविध परवाने मिळविताना होणारी ससेहोलपट, कुशल कामगारांचा अभाव अशा अनंत अडचणींवर मात करत उद्योग चालू केला जातो. अनेकदा व्यवसाय चालवताना काही अवांच्छित समाजघटकांचा त्रास सहन करावा लागतो. माथाडी कायद्याचा प्रचंड गैरवापर करून राज्यातील उद्योग जगतातून खंडणी वसुलीचे काम सर्रास चालू आहे. तुमचे प्रकरण तुम्ही मिटवा, असा सल्ला पोलिसांकडून अशा वेळी दिला जातो. तथाकथित माथाडी कामगारांचे ह लोण राज्यभर पसरले आहे. कोठेही बांधकाम होत असेल, कार्यालय उभारले जात असेल किंवा कार्यालयाचे नूतनीकरण होत असेल, तेथे हे गुंड पोहोचतात आणि कोट्यवधी रुपये खंडणी वसूल करतात.

प्रशासनातील असंवेदनशील घटक आणि समाजातील अवांच्छित घटक यांच्यामुळे राज्यातील उद्योगांना कोणत्या दिव्यातून जावे लागते, हे सांगणारी असंख्य उदाहरणे देता येतील. उद्योगांना पोषक वातावरण नसेल, तर राज्यात नवे उद्योग का येतील? येथील चालू असलेले उद्योग राज्याबाहेर जाण्यास ही परिस्थिती कारणीभूत ठरते. सामान्य जनतेसमोर हे वास्तव कधी येत नाही. राज्यातील विचारवंत, अर्थतज्ज्ञ, समालोचक कोणीच या विषयावर चर्चा करत नाहीत. एखादी बातमी कुठेतरी येते आणि विसरली जाते. राज्यातील नोकरशाहीचे उद्योगक्षेत्राबद्दलचे असंवेदनशील धोरण (hard handiness) खेदजनक आहे. गेली ३५-४० वर्षे ही घसरण चालू आहे. या काळात राज्यात अनेक पक्षीय आघाड्यांची सरकारे आली. सत्ता टिकवण्याची कसरत करताना शासन राबविण्याकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होत गेले. यामुळे राजकीय नेतृत्वाची प्रशासनावरील पकड ढिली होत गेली, असे म्हणतां येईल. पूर्वी महाराष्ट्रात अनेक प्रभावी नेते सत्तास्थानी होते. त्यांची प्रशासनावर पकड होती. त्यामुळे राज्य गतिमान राहिले. आताही देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे असे कर्तृत्वान नेते सत्तेत, तर पृथ्वीराज चव्हाणांसारखे चांगल्या प्रतिमेचे नेते विरोधी पक्षात आहेत. गेल्या ३-४ दशकांतील राज्यातील राजकीय गोंधळाचा परिणाम प्रशासनावर झाला आहे. अधिकारी वर्गास आपल्या अस्तित्वाच्या कारणाचे विस्मरण झाल्यागत आहे. उद्योगांची प्रगती झाली, तर रोजगार निर्मिती होत राहील, राज्याचा आर्थिक विकास होईल. त्यासाठी उद्योगाला सकारात्मक सहकार्य करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, याची जाणीव त्यांना राहिलेली दिसत नाही.

देश मोठ्या वेगाने आर्थिक प्रगती करतो आहे. आज आपली अर्थव्यवस्था ५व्या क्रमांकावर पोहोचली ती पुढच्या १० वर्षांत तिसऱ्या क्रमांकाची होईल. यांत महाराष्ट्राचा वाटा सर्वात जास्त असू शकतो. पण त्यासाठी वर चर्चा केलेल्या घटकांमध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक असेल. काही कार्यकर्ते निवडणुकीत, पक्षकार्यास उपयोगी पडतात म्हणून त्यांना सांभाळून घेणे राजकीय पक्षांनी थांबवले पाहिजे. खरे तर त्यांना कोणत्याही पक्षाबद्दल काही देणे-घेणे नसते. सत्ताधाऱ्यांशी जवळीक साधून आपला कार्यभाग साधणे हेच ते करत राहतात. यातून राज्यातील औद्योगिक शांतता बिघडत राहते. अशाने भ्रष्ट अधिकाऱ



स्वत:च्या जाळ्यात अडकलाय 'ड्रॅगन'

आपणच फेकलेल्या जाळ्यात चीन अडकत चालला आहे. ड्रॅगनने फेकलेल्या जाळ्यात तो स्वतःच अडकला आहे आणि त्यातून बाहेर येण्याचा त्याला मार्ग आता सापडत नाही. जगभरातील गरीब देशांना कर्ज देणे आणि त्यांना जाळ्यात अडकवणे ही चीनची पुरानी खेळी आहे. कित्येक वर्षापासून तो ही खेळी करत आला आहे. अनेक देश चीनच्या जाळ्यातून बाहेर पडताना कोळ्याच्या जाळ्यातून बाहेर पडण्यासाठी कीटक जसे धडपडतात, तसे धडपडताना दिसतात. त्यानंतर त्यांच्या बहुमूल्य अशा एखाद्या बंदराचा ताबा घेणे आणि आपला साम्राज्य विस्तार करणे ही चीनची आवडती खेळी आहे. पण ही खेळी त्याच्या अंगावर उलटू पहात आहे. चीनचे हे कर्जाचे राजकारण नेहमीच वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. प्रथम गरीब देशांना हेरून त्यांना पायाभूत सुविधा देण्यासाठी कर्ज द्यायचे आणि त्यासाठी व्याजही भरमसाठ लावायचे आणि नंतर त्यांच्याकडून बंदर किंवा रस्ते किंवा व्यापाराचे हक्क हडपायचे, ही चीनची नेहमीची चाल.पण आता चीन या जाळ्यात स्वतः अडकला आहे. चीनची अर्थव्यवस्था धापा टाकत आहे. तिला हे कर्जवसुली करणे हे शक्य नाही. त्यात चीनची वाट लागली आहे.

पाकिस्तान, श्रीलंका आणि नेपाळसारखे देश चीनच्या या जाळ्यात सापडले आहेत. श्रीलंका तर उद्ध्वस्त झाला आहे. चीनची कर्जफेड करू शकत नसल्याने लंकेने आपले हंबनटोटा हे बंदर चीनच्या हवाली केले. आता चीनने तेथे नाविक तळ उभारण्यास सुरुवात केली आहे. चीनने लहान आणि गरीब देशांना कर्ज वाटले. पण आता किमान वीस देश असे आहेत की जे कर्ज फेड करू शकत नाहीत. त्यामुळे चीनची अगोदरच नाजुक असलेली अर्थव्यवस्था अडचणीत सापडली आहे. चीनचे हे अडकलेले कर्ज चीनसाठी अत्यंत मोठे संकट म्हणून समोर आले आहे. चीनच्या बँका इतर देशांना जितके कर्ज वाटतात, त्यापेक्षा कमी कर्ज ते स्वतःच्या देशवासियांना वाटतात. याच प्रकारे चीनने हंबनटोटा हे बंदर हडपले आहे. चीन आता या कर्जाची वसुली कशी करणार, हा वादाचा मुद्दा आहे. चीन हा जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. स्वस्त मजुरी आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर तो जगाचा कारखाना रचून बसला आहे. त्याचा विस्तारवाद, तर जगभर बदनाम आहे. चीनकडून घेतलेले कर्ज वेळेवर परत करू शकला नाही, तर तो देश आपले काही अधिकार चीनच्या ताब्यात देईल, अशी अट असते. यातूनच हंबनटोटासारखे उत्कृष्ट बंदर चीनच्या ताब्यात आले. पाकिस्तानही चीनच्या याच जाळ्यात सापडला आहे. पाकिस्तानबद्दल फार सहानुभूती दाखवायला नको. पण चीनने पाकिस्तानलाही सोडलेले नाही. पाकिस्तानच्या सीमेवरील ग्वादर बंदराबाबत चीनने हीच खेळी रचली आहे. पाकिस्तान चीनचे कर्ज फेडू शकला नाही म्हणून ग्वादर बंदर चीनच्या ताब्यात लीजवर देण्यात आले आहे, या करारापासून फक्त चीनला लाभ होत आहे.

अमेरिकेच्या एका संशोधन संस्थेच्या अहवालानुसार चीनने ज्या देशांना कर्ज दिले आहे, त्यापैकी ८० टक्के देश हे आर्थिक संकटातून जात आहेत. आर्थिक अडचणींनी ते त्रस्त आहेत. पण त्यांच्याकडून वसुली कशी करायची, या संकटात आता चीनच सापडला आहे. किती देशानी चीनचे कर्ज बुडवले आहे, याचा खुलासा अद्याप झालेला नाही. स्थानिक सरकारांचे कर्ज आणि चीनची अर्थव्यवस्था अवघड टप्प्यातून जात आहे. चीनचा निर्यात दर घटत आहे आणि घटत्या निर्यातीने चीनची मुश्कीली आणखी वाढवली आहे. रिअल इस्टेट मार्केट आज डबघाईला आले आहे आणि यामुळेही चीनची परेशानी वाढली आहे. बेरोजगारीचा दर आता परमोच्च बिंदूवर पोहोचला आहे. चीनच्या स्थानिक सरकारांनी भले मोठे कर्ज घेतले आहे आणि ते आता चीनच्या गळ्यातील हाडूक बनले आहे. त्याच्या अर्थव्यवस्थेला या दोन बाबी आता पोखरून काढत आहेत. कोविड काळात सर्वांनाच पिडले आहे. त्यात चीनच्या अर्थव्यवस्थेवर जोरदार प्रहार केला आहे. आता त्यात या संकटाची भर पडली आहे. चीनने दिलेल्या सीपीईसी कर्जाने पाकिस्तानला बरबाद केले आहे.

व्याज फेडण्यासाठी पाकिस्तानकडे पैसा नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी किंवा जागतिक बँक याही पाकिस्तानला कर्ज देण्यासाठी आता उत्सुक नाहीत. कर्ज दिल्यानंतर त्यातून बाहेर पडणे आता या देशांना अशक्य वाटत आहे. चीनच्या विस्तारवादी धोरणाचे हे अपयश आहे. अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्या धोरणाला ही कटु फळे आली आहेत. चीन काही लोकशाही देश नसल्याने तेथे क्षी यांच्या फसलेल्या धोरणावर टीका करून संसद डोक्यावर घेणारे विरोधक तेथे नाहीत. त्यामुळे क्षी जिन पिंग करतील तीच पूर्व दिशा, असे इतके दिवस चालले होते. पण आता त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला अपयश येताना पाहून क्षी अस्वस्थ झाले आहेत. पाकिस्तानकडे इतके कर्ज आहे की त्यातून बाहेर कसे पडावे, हेच आता त्या देशाला समजत नाहीसे झाले आहे. हीच अवस्था श्रीलंकेची आहे. तसेच नेपाळबाबत म्हणता येईल. नेपाळही चीनच्या या जाळ्यात तो स्वतःच अडकला आहे. नेपाळने चीनच्या दबावावरूनच मध्यंतरी भारतविरोधी भूमिका घेतली होती. पण आता त्याला शहाणपणा सुचला आणि तो देश चीनच्या बहकाव्यातून बाहेर आला आहे.

अर्थभूमी

उमेश कुलकर्णी

पाकिस्तान सातत्याने खराब स्थितीतून जात असताना चीनच्या कर्जाचा पहाड त्यांच्यावर आहे. पाकची खराब क्रेडिट रेटिंग, उच्च कर्जाची जोखीम आणि कमजोर आर्थिक स्थिती यामुळे पाकिस्तान अत्यंत अवघड स्थितीतून जात आहे. पाकिस्तानच्या खराब अवस्थेच्या मागे त्याने घेतलेले भरमसाट कर्ज आणि फेडण्याची नसलेली क्षमता आहे. पाकिस्तानवर असलेल्या कर्जाची टक्केवारी आता प्रचंड म्हणजे १२५ अब्ज अमेरिकन डॉलर इतकी झाली आहे. यातील एक तृतीयांश कर्ज हे चीनचे आहे. चीनने आपले गुंतवणूकधोरण ठरवले आहे आणि त्यात पूर्ण आशिया आणि आफ्रिका येथील गरीब देशांना कर्ज देऊन त्यांना कायमचे अंकित करण्याचा भाग आहे. पण आता चीनलाच हे कर्ज वसूल कसे करायचे, याचा प्रश्न पडला आहे. त्यामुळे अगोरच आर्थिक संकटात असलेली अर्थव्यवस्था पूर्ण ढेपाळली आहे.

पाकिस्तानचा चीनबरोबर चालेला सीपीईसी प्रकल्पही यातून सुटू शकलेला नाही. चीन कशा प्रकारे कर्जाच्या जाळ्यात अडकलेल्या संपत्तीचा वापर करतो, याचे उत्तम उदाहरण सीपीईसी प्रकल्प आहे. पाकिस्तान, श्रीलंका आणि नेपाळमधील बुनियादी संपत्तीवर चीनचा प्रभाव जाणवतो. पाकिस्तानने पाकिस्तान आर्थिक मार्गिका म्हणजे पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरसाठी घेतलेले कर्ज त्या देशासाठी परेशानी वाढवणारे आहे. सीपीईसी प्रकल्पाचा खर्च २५ अब्ज अमेरिकन डॉलर इतका असून पाकिस्तानच्या एकूण कर्जाच्या वाट्यात त्याचा मोठा वाटा आहे. हे व्यापारी दर असून त्यामुळे पाकिस्तानची डोकेदुखी वाढवली आहे. व्याजाचे दर सर्वसाधारण सात टकक्यांपेक्षा जास्त आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी साधारण दोन टक्के व्याजाने कर्ज देत असते.

चीनच्या या कर्जाच्या सापळ्यात अडकणाऱ्या धोरणातून अद्याप एकही देश बाहेर आलेला नाही. प्रत्येकाने काही ना काही त्याग केला आहे. त्यातून चीनचे विस्तारवादी बळ वाढत आहे. पण आता चीनवर इतकी कर्जवसुलीचे संकट असले तरीही चीन आपल्या धोरणातून बाहेर पडायला तयार नाही. चीनवरील संकट त्यातून अधिक गहिरे होत जाणार आहे. आशियाई देशांसाठी ती एक मोठी धोक्याची घंटा ठरणार आहे.

umesh.wodehouse@gmail.com

भारताच्या बँकिंग व्यवस्थेत कर्जाची महत्त्वपूर्ण भूमिका

भारताच्या बँकिंग व्यवस्थेमध्ये प्राधान्य क्षेत्रातील कर्ज ही महत्त्वाची भूमिका बजावत असतात. जुलै २७, २०२३ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने प्राधान्य क्षेत्रातील कर्ज देणे, त्याचे लक्ष्य आणि वर्गीकरण यावर प्रमुख निर्देशांमध्ये बदल करून नव्याने निर्देश जारी केले आहेत. त्याची थोडक्यात माहिती आजच्या लेखात देणार आहे.

बँकिंग रेग्युलेशन कायदा, १९४९ च्या कलम ५६ सह वाचलेल्या कलम २१ आणि ३५ए द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, भारतीय रिझर्व्ह बँकेने, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने निर्देश जारी केले असून त्यानुसार प्राधान्य क्षेत्रांतर्गत श्रेणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे. शेती, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग, निर्यात क्रेडिट, शिक्षण, गृहनिर्माण, सामाजिक पायाभूत सुविधा, अक्षय ऊर्जा आणि इतर.

आरबीआयच्या निर्देशाप्रमाणे प्राधान्य क्षेत्रासाठी लक्ष्य/उप-लक्ष्ये पुढीलप्रमाणे :

मागील वर्षाच्या संबंधित तारखेला लागू असलेल्या समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिटच्या आधारे मोजले जाणारे प्राधान्य क्षेत्र कर्ज अंतर्गत निर्धारित लक्ष्ये आणि उप-लक्ष्ये खालीलप्रमाणे आहेत.

श्रेण्या :

देशांतर्गत व्यावसायिक बँका (RRBs आणि SFBs सोडून) आणि २० आणि त्याहून अधिक शाखा असलेल्या विदेशी बँका २० पेक्षा कमी शाखा असलेल्या विदेशी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, लघु वित्त बँका.

एकूण प्राधान्य क्षेत्र :

समायोजित नेट बँक क्रेडिटच्या ४० टक्के किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट यापैकी जे जास्त असेल. समायोजित नेट बँक क्रेडिटच्या ४० टक्के किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट यापैकी जे जास्त असेल; ज्यापैकी ३२% पर्यंत निर्यातीला कर्ज देण्याच्या स्वरूपात असू शकते आणि ८% पेक्षा कमी नाही इतर कोणत्याही प्राधान्य क्षेत्रासाठी असू शकते.

समायोजित नेट बँक क्रेडिटच्या ७५ टक्के किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट यापैकी जे जास्त असेल; तथापि, मध्यम उद्योग, सामाजिक पायाभूत सुविधा आणि नवीकरणीय ऊर्जा यांना दिलेले कर्ज हे समायोजित नेट बँक क्रेडिटच्या केवळ १५ टक्क्यांपर्यंत प्राधान्य क्षेत्रातील उपलब्धी म्हणून गणले जाईल. समायोजित नेट बँक क्रेडिटच्या ७५ टक्के किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट यापैकी जे जास्त असेल.

शेती : समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल त्याच्या १८ टक्के, त्यांपैकी १० टक्के उद्दिष्ट लघु आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी विहित केलेले आहे.

लागू नाही : समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल त्याच्या १८ टक्के, त्यांपैकी १० टक्के उद्दिष्ट लघु आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी विहित केलेले आहे. समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल त्याच्या १८ टक्के, त्यांपैकी १० टक्के उद्दिष्ट लघु आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी विहित केलेले आहे.

बॅलन्स शीट

अर्थसल्ला

महेश मलुष्टे

चार्टर्ड अकाऊंटंट

सूक्ष्म उपक्रम :

समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल, त्याच्या ७.५ टक्के.

लागू नाही : समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल त्याच्या ७.५ टक्के. समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल त्याच्या ७.५ टक्के.

कमकुवत विभागांना प्रगती :

समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल त्याच्या १२ टक्के.

लागू नाही : समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल त्याच्या १५ टक्के. समायोजित नेट बँक क्रेडिटच्या किंवा बॅलन्स शीट एक्सपोजरच्या समतुल्य क्रेडिट जे जास्त असेल त्याच्या १२ टक्के.

प्राधान्य क्षेत्रांतर्गत पात्र श्रेणींचे वर्णन

शेती-कृषी क्षेत्राला देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये फार्म क्रेडिट (शेती आणि संबंधित उपक्रम), कृषी पायाभूत सुविधांसाठी कर्ज आणि अनुषंगिक उपक्रमांचा समावेश असेल. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग (MSME)- सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाची व्याख्या भारत सरकारनुसार मानली जाते व यात फॅक्टरिंज व्यवहार, खादी आणि ग्रामोद्योग क्षेत्रातील युनिट्सना दिलेले कर्ज, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, सरकारच्या व्याख्येनुसार, स्टार्ट-अप्सना रुपये ५० कोटींपर्यंत कर्ज इत्यादीचा समावेश यात आहे.

शिक्षण- व्यावसायिक अभ्यासक्रमांसह शैक्षणिक हेतूंसाठी व्यक्तींना रुपये २० लाखांपेक्षा जास्त नसलेले कर्ज प्राधान्य क्षेत्र वर्गीकरणासाठी पात्र मानले जाईल. सध्या प्राधान्य क्षेत्र म्हणून वर्गीकृत केलेली कर्जे मुदतपूर्तीपर्यंत सुरू राहतील. गृहनिर्माण- महानगर केंद्रांमध्ये (दहा लाख आणि त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या) प्रति व्यक्ती रुपये ३५ लाख कर्ज आणि इतर केंद्रांमध्ये प्रति कुटुंब निवासस्थान खरेदी/बांधणीसाठी रुपये २५ लाखांपर्यंतचे कर्ज ही प्राधान्य क्षेत्र कर्ज म्हणून गणली जातील. सामाजिक पायाभूत सुविधा-शाळा, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि घरगुती शौचालयांचे बांधकाम/नूतनीकरण आणि घरगुती स्तरावर पाणी सुधारणा इत्यादींसह स्वच्छता सुविधा उभारण्यासाठी प्रति कर्जदार रुपये ५ कोटींपर्यंत बँक कर्ज आणि प्रति रुपये १० कोटी मर्यादेपर्यंत कर्ज टियर II ते टियर VI केंद्रांमध्ये 'आयुष्मान भारत' अंतर्गत आरोग्य सेवा सुविधा निर्माण करण्यासाठी कर्जदार, अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांच्या बाबतीत, वरील मर्यादा फक्त एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या केंद्रांवर लागू आहे.

अक्षय ऊर्जा- सौर आधारित ऊर्जा जनरेटर, बायोमास-आधारित ऊर्जा जनरेटर, पवनचक्क्या, सूक्ष्म-हायडल प्लांट आणि अपारंपरिक ऊर्जा आधारित सार्वजनिक सुविधांसाठी, उदा., स्ट्रीट लाइटिंग सिस्टम आणि दूरस्थ ग्राम विद्युतीकरण इ, प्राधान्य क्षेत्र वर्गीकरणासाठी पात्र असेल. वैयक्तिक कुटुंबांसाठी, कर्जाची मर्यादा प्रति कर्जदार रुपये १० लाख असेल.

पथ्यावर पडणाऱ्या अर्थवार्ता

सीएनजी, पीएनजीमध्ये बायोगॅस मिसळून परकीय चलन वाचवण्याची सरकारची योजना पुढे आली आहे. दरम्यान, सिमेंट, पोलादाच्या किमती घसरल्याने घरबांधणी स्वस्त होण्याची शक्यता असणे हे असेच एक दिलासादायक वृत्त. याखेरिज डिजिटल परिवर्तनात भारत जगात अग्रेसर ठरणे हा एक नवा मानबिंदू म्हणायला हवा. याखेरिज अभियंत्यांना मिळू घातलेल्या रोजगाराच्या मोठ्या संधी हीसुद्धा एक विशेष वार्ता म्हणता येईल.

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये काही सकारात्मक बातम्या पाहायला मिळाल्या. या दखलपात्र बातम्या सामान्यांच्या दैनंदिन आयुष्यात बदल घडवणाऱ्या ठरू शकतात. पहिली लक्षवेधी बातमी म्हणजे सीएनजी, पीएनजीमध्ये बायोगॅस मिसळून परकीय चलन वाचवण्याची सरकारची योजना आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. सिमेंट, पोलादाच्या किंमती घसरल्याने घरबांधणी स्वस्त होण्याची शक्यता निर्माण होणे हे असेच एक दिलासादायक वृत्त. याखेरिज डिजिटल परिवर्तनात भारत जगात अग्रेसर ठरणे हा एक नवा मानबिंदू म्हणायला हवा. याखेरिज अभियंत्यांना मिळू घातलेल्या रोजगाराच्या मोठ्या संधी ही आणखी एक विशेष वार्ता म्हणता येईल.

देशात जैव इंधनाला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आता सरकारने सीएनजी आणि पीएनजीमध्ये बायोगॅस मिसळण्याचा निर्णय घेतला आहे. कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (सीएनजी) आणि पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) मध्ये बायोगॅस मिसळणे बंधनकारक असेल, असे केंद्र सरकारने म्हटले आहे. केंद्र सरकारच्या या पावलामुळे अर्थव्यवस्थेला फायदा होणार आहे. कॉम्प्रेस्ड बायो गॅसचे उत्पादन आणि वापरही वाढेल. या निर्णयाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केली जाणार आहे. राष्ट्रीय जैवइंधन समन्वय समिती (एनबीसीसी)च्या बैठकीत, केंद्रीय भांडार संस्था (सीआरबी) बायो गॅस मिश्रणाच्या प्रणालीवर लक्ष ठेवेल, असा निर्णय घेण्यात आला. तसेच हा नियम सर्वत्र पाळला जाईल याची काळजी घेतली जाईल. ही नवी प्रणाली २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून सुरू होईल. सध्या वाहने आणि घरांमध्ये त्याचा वापर एक टक्का मिश्रणाने सुरू केला जाईल. त्यानंतर २०२८ पर्यंत हे प्रमाण पाच टक्के करण्यात येईल.

बायोगॅसचा वापर वाढवण्यासाठी हा आहे. मक्यापासून इथेनॉलचे उत्पादन वाढवण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. कृषी विभाग आणि अन्न व सार्वजनिक वितरण विभागानेही याला सहमती दर्शवली आहे. सरकारने २०२७ पर्यंत देशांतर्गत उड्डाणांसाठी 'एटीएफ'मध्ये एक टक्के इथेनॉल आणि २०२८ पर्यंत आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी दोन टक्के इथेनॉल मिसळण्याचे मान्य केले आहे. सध्या पेट्रोलमध्ये दहा टक्के इथेनॉल मिसळले जात आहे. भविष्यात ते २०३० पर्यंत वीस टक्कयांवर आणण्याची योजना आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारत एक मोठी आर्थिक शक्ती म्हणून उदयाला आला आहे. सध्या जगभरात सुरू असलेल्या डिजिटल परिवर्तनाच्या युगात देश खूप पुढे आहे. डिजिटल परिवर्तनाचा भारताच्या अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होत आहे. लवकरच एकूण जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचे योगदान २० टक्कयांपर्यंत वाढू शकते. भारत ही केवळ जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था नाही तर जगातील सर्वात वेगाने वाढणारी डिजिटल अर्थव्यवस्था आहे. सध्या देशाच्या एकूण सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) डिजिटल अर्थव्यवस्थेचा वाटा ११ टक्के आहे. एकूण जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचे योगदान लवकरच २० टक्क्यांपर्यंत म्हणजेच एक पंचमांश होईल. २०२६ पर्यंत एकूण जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचे योगदान २० टक्कयांपर्यंत पोहोचू शकते. २०१४ मध्ये जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचे योगदान केवळ ४.५ टक्के होते. ते आता सुमारे ११ टक्के झाले आहे. आजकाल डिजिटल अर्थव्यवस्था सामान्य अर्थव्यवस्थेपेक्षा किती तरी पटीने जास्त वेगाने प्रगती करत आहे. व्यापक डिजिटल अर्थव्यवस्थेचा आणि विशेषतः नावीन्यपूर्ण अर्थव्यवस्थेचा विकास दर उत्कृष्ट आहे. त्यांच्या वाढीचा वेग नियमित अर्थव्यवस्थेपेक्षा जवळपास तिप्पट जास्त आहे. भारताला २०२७ पर्यंत पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

अर्थनगरीतून...

महेश देशपांडे

आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

दरम्यान, सिमेंट आणि पोलादाच्या किमती कमी झाल्या आहेत. मागील दोन महिन्यांमध्ये सिमेंटच्या किमतीत वाढ झाली होती. मात्र या महिन्यात सिमेंटची किंमत कमी झाली आहे. पोलादाच्या किमती टनामागे जवळपास एक हजार रुपयांनी कमी झाल्या आहेत. गृहबांधणीमध्ये पोलाद आणि सिमेंट महत्त्वाची भूमिका बजावतात. शिवाय या घटकांसाठी जास्त पैसे मोजावे लागतात. आता त्यांच्या किमती कमी झाल्यामुळे घरबांधणीला पूर्वीपेक्षा कमी खर्च येणार आहे. सिमेंटच्या पन्नास किलोच्या गोणीचा सरासरी दर ३८२ रुपये आहे. सप्टेंबर महिन्याच्या तुलनेत ही किंमत अजूनही पाच टक्क्यांनी जास्त आहे. डिसेंबर महिन्यात त्याची किंमत आणखी वाढू शकते. सणासुदीच्या काळात दिल्ली-एनसीआरमध्ये बांधकामे कमी झाली आहेत. बिहार आणि झारखंडमध्ये घरे बांधण्याचा खर्च वाढला आहे. पश्चिम बंगाल आणि ओडिशामध्ये घरबांधणी उत्पादनांमध्ये घसरण झाली आहे. गेल्या दोन-तीन महिन्यांमध्ये ईशान्येकडील राज्यांमध्ये सिमेंटच्या किमतीत झपाट्याने वाढ झाली होती. दक्षिण भारतात सिमेंटच्या किमती ३९६ रुपये प्रति गोणी या आतापर्यंतच्या उच्चांकावर पोहोचल्या होत्या. निवडणुकांमुळे मध्य प्रदेशसारख्या ठिकाणी बांधकामे कमी झाली असून सिमेंट आणि पोलादाच्या किमती घसरल्या आहेत. नोव्हेंबरमध्ये पोलादाच्या किमती कमी झाल्या आहेत. नोव्हेंबरच्या सुरुवातीपासूनच पोलादाच्या किमतीत घट झाली आहे. सरासरी दोन हजार रुपयांनी किमती कमी झाल्या आहेत.

आणखी एक सकारात्मक बातमी वाढलेल्या रोजगारसंबधींच्या संदर्भातली. जगभरातील आघाडीच्या बहुराष्ट्रीय कंपन्या आता भारतात आपले प्लांट उभारण्याच्या तयारीत आहेत. टेस्लासह अनेक जागतिक कंपन्या या संदर्भात वेळोवेळी आपले इरादे व्यक्त करत असतात. भारताच्या प्रगतीच्या रथामध्ये स्वार होऊन या कंपन्यांना दक्षिण आशियाई बाजारपेठांमध्येही मजबूत पकड निर्माण करायची आहे. आत्तापर्यंत आयटी आणि सेवा क्षेत्राशी संबंधित बहुतेक कंपन्या भारतात येत होत्या. पण आता अनेक कंपन्यांनी त्यांचे संशोधन, डिझाईन आणि अभियांत्रिकी संबंधित काम भारतात पाठवायला सुरुवात केली आहे. त्यामुळे देशात तीन लाखांहून अधिक रोजगार निर्माण होतील. एका अंदाजानुसार, या बदलांमुळे येत्या तीन ते चार वर्षांमध्ये देशात तीन लाखांहून अधिक अभियांत्रिकी नोकऱ्या निर्माण होतील. या नोकऱ्या विमान वाहतूक, ऑटोमोबाइल, टायर, पार्ट मेकिंग आणि इलेक्ट्रिकल क्षेत्रात येतील. अभियंत्यांच्या मागणीत सुमारे ४० टक्के वाढ होणार आहे. टियर-२ आणि ३ शहरातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील फ्रेशर्सना रोजगार मिळतील. ग्रीन ट्रान्सपोर्ट पर्यायांच्या मागणीचा फायदा होईल. देशात हरित वाहतुकीचे पर्याय वाढवण्यासाठी सरकारकडून अनेक प्रयत्न केले जात आहेत. यामध्ये डिझेल वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणे, सौरऊर्जेला चालना देणे, इंधनात इथेनॉल आणि बायोगॅस मिसळणे इत्यादींचा समावेश आहे. त्यामुळे पाच वर्षांमध्ये हरित ऊर्जाक्षेत्राशी संबंधित नोकऱ्या सहज उपलब्ध होतील. बहुतांश नोकऱ्या आयटी क्षेत्राऐवजी मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअर्ससाठी असतील.

उत्पादन क्षेत्रच या नवीन नोकऱ्या निर्माण करेल. तज्ज्ञांच्या मते मर्सिडीज-बेंझ, बॉश, मिशेलिन, एबीबी, बोईंग, एअरबस, रेनॉल्ट, फोक्सवॅगन ग्रुप, श्नाइडर इलेक्ट्रिक, जॉन डीरे, कॅटरपिलर, कॉंटिनेंटल आणि कॉलिन्स एरोस्पेस या कंपन्या भारतात जोरात काम करतील. नवीन तंत्रज्ञान आणि ऑटोमेशन युवकांच्या नोकऱ्यांच्या मार्गात अडथळे ठरत आहेत. पण उत्पादन क्षेत्राचे हे बदलते चित्र खूपच उत्साहवर्धक आहे. बॅटरी व्यवस्थापन आणि हार्डवेअर क्षेत्रातही अनेक नोकऱ्या निर्माण होतील.

गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमतर्फे

दुबईत दोनदिवसीय बिझनेस समीट 'महाबिझ २०२४' चे आयोजन

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

दुबईमध्ये २४ आणि २५ फेब्रुवारीला दोन दिवसीय समिट 'महाबिझ २०२४' चे आयोजन करण्यात आले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून त्यास उपस्थित राहणार आहेत. नेटवर्क तयार करणे, ज्ञानाची देवाणघेवाण, व्यवसायाच्या संधींचा शोध घेणे त्याचबरोबर अर्थपूर्ण भागीदारीच्या संधींचा लाभ घेण्यासाठी हे समिट होणार आहे.

प्रतिष्ठित 'द अटलांटिस द पाम' येथे हे समिट होणार आहे. गेल्या दोन दशकांपासून सक्रिय असलेल्या 'गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम' (जीएमबीएफ) ने आयोजित केलेल्या वार्षिक सातव्या समिटमध्ये जगभरातून ८०० हून अधिक उद्योजकांचा सहभाग अपेक्षित आहे. लोकप्रिय व्यवसाय संमेलनात ७५० कोटी रुपयांच्या व्यवसायाची नोंद होण्याची अपेक्षा आहे. महाबिझ २०२४ साठी विविध क्षेत्रातील भागधारकांशी संवाद साधण्यासाठी आणि त्यांना आमंत्रित करण्यासाठी जीएमबीएफने देशातील विविध आघाडीच्या शहरांमध्ये

'रोड शो' आयोजित केला आहे. जीएमबीएफचे अध्यक्ष डॉ. सुनील मांजरेकर म्हणाले, "आगामी जीएमबीएफ ग्लोबल कॅम्पेन ड्राइव्हसाठी जीएमबीएफच्या पूर्वीच्या समितीचे पदाधिकारी महाबिझ २०२४च्या प्रचारासाठी उपस्थित राहणार आहेत. नेटवर्किंग आणि ज्ञानाचे आदानप्रदान करण्यासाठी तसेच आणि व्यावसायिक संबंध दृढ करण्यासाठी आम्ही तुमचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत." हे अधिवेशन दर दोन वर्षांनी आयोजित केले जाते. "नेटवर्कच्या संधी, ज्ञानाची देवाणघेवाण, व्यवसायाचे मार्ग शोधण्यासाठी आणि अर्थपूर्ण भागीदारी तयार करण्यासाठी एकत्र येणार आहेत. उद्योजकांना त्यांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी या समीटमुळे असंख्य संधी निर्माण होणार आहेत," असेही डॉ. सुनील मांजरेकर यांनी स्पष्ट केले.

कागद उद्योगातील बड्या नावांसह पेपरेक्स यजमानपद भूषवण्यास सज्ज

मुंबई (प्रतिनिधी) : पेपरेक्सची १६वी आवृत्ती, जगातील सर्वात मोठा कागद कार्यक्रम, वैश्विक पेपर उद्योगातील सर्वात मोठे ब्रँड आणि कंपन्यांच्या उपस्थितीचे वचन देते. दिनांक ६ ते ९ डिसेंबर, २०२३ दरम्यान इंडिया एक्स्पो सेंटर, दिल्ली एनसीआर येथे आयोजित शोमध्ये काही अत्यंत नाविन्यपूर्ण आणि पर्यावरणपूरक उत्पादनांसह कागद उत्पादनातील नवीनतम तंत्रज्ञान देखील प्रदर्शित करण्यात येईल.

पेपरेक्स २०२३ ला उद्योगांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला असून २० देशांतील ७००हून अधिक प्रमुख प्रदर्शक आणि जगाच्या कानाकोपऱ्यातील ३० हजारांपेक्षा व्यापार अभ्यागतांसह २०२२ पासूनची यशोगाथा अधिक चांगल्या प्रकारे मांडण्यासाठी सज्ज आहे. हा एक्स्पो एकगठ्ठा सौदे, संयुक्त उपक्रम, वितरण भागीदारी, ज्ञानाचे आदान-प्रदान, सामान्य नेटवर्किंग आणि बरेच काही सुलभ करते. मुख्यत्वे शिक्षण आणि साक्षरतेवर भर तसेच संघटित किरकोळ विक्रीतील वाढ यामुळे भारतातील कागदाचा वापर वर्षाला ६ ते ७ टक्के वाढण्याची तसेच आर्थिक वर्ष २०२६-२७ पर्यंत ३० दशलक्ष टनांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. सध्या, भारतात ८६१ पेपर मिल आहेत, त्यापैकी ५२६ कार्यरत आहेत.

बँक ऑफ बडोदाचे 'बीओबी परिवार अकाऊंट'

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

बँक ऑफ बडोदा ही भारतातील आघाडीच्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपैकी एकमेव असून बँकेद्वारे बचत व चालू खातेधारकांसाठी, बीओबी परिवार अकाऊंट सुरू केले आहे. बँकेच्या 'बीओबी के साथ त्यौहार की उमंग' या

सोमवार, ४ डिसेंबर २०२३
www.prahaar.in
epaper.prahaar.in

प्रहार
गजाली

देशातील पहिल्या महिला गुप्तहेर म्हणून रजनी पंडित यांना ओळखले जाते. खासगी गुप्तहेर म्हणून काम करताना त्यांनी हजारो प्रकरणे मार्गी लावली आहेत. त्यांच्या कामगिरीबाबत त्यांनी दैनिक प्रहारच्या 'गजाली' कार्यक्रमात प्रहारच्या टीमसोबत मनमोकळ्या गप्पा केल्या. यावेळी दैनिक प्रहारचे महाव्यवस्थापक मनीष राणे, संपादक डॉ.सुकृत खांडेकर, प्रशासन लेखा विभागाचे प्रमुख ज्ञानेश सावंत यांनी त्यांचे स्वागत केले. गुप्तहेर म्हणजे खूपचं वेगळं व्यक्तिमत्त्व, आव्हानांचे डोंगर बुद्धिचातुर्याच्या जोरावर पेलून सत्याचं मूळ शोधणं म्हणजे हेरगिरी करणे, असे हेरगिरीचे अनेक किस्से रजनी पंडित यांनी आपल्या ओघावत्या व करारी शैलीतून कथन केले आणि गप्पांचा फड रंगत गेला.

लेडी जेम्स बॉण्ड :रजनी पंडित

तेजस वाघमारे

गुप्तहेर व्हावे, असे ठरवले नव्हते. पण लहानपणापासून माझा स्वभाव सत्याचा शोध घेण्याचा आहे. महाविद्यालयीन शिक्षणासाठी मला माटुंगा येथील रूपारेल महाविद्यालयात प्रवेश मिळाला. सकाळचे कॉलेज असल्याने काही ठिकाणी मी पार्टटाइम जॉब करत होते. जॉबच्या ठिकाणी एका महिलेचा प्रॉब्लेम झाल्याने ती रडायला लागली. मी काय झाले? अशी विचारणा केली असता, महिलेने झाला प्रकार सांगण्यास सुरुवात केली. ती महिला म्हणाली, आताच लग्न करून माझी सून आलीय. आमच्या घरात चोऱ्या व्हायला लागल्या आहेत. मी म्हणाले, बघुयात का कोण करतेय हे. त्यानंतर त्या महिलेने मला तिच्या मुलांचे फोटो दिले. आम्ही त्या मुलांवर पाळत ठेवली. त्यावेळी तिच्या एक मुलगा दुपारी घरी येऊन काहीतरी वस्तू घेऊन जात असल्याचे आम्हाला समजले. तो वस्तू विकायचा नाही. मित्राकडे वस्तू ठेवायचा. त्या मुलाचे फोटो घेऊन त्याच्या आईला मी माहिती दिली, तर आई म्हणाली माझा मुलगा असे करेल असे वाटत नाही. मी त्या महिलेला सर्व माहिती दिली. त्यानुसार ती महिला म्हणाली, मी घरी मीटिंग करते आणि वेळ पडली तर तू ये, असे सांगितले. तिने घरी विषय काढला, तर धाकटा मुलगा म्हणाला की, आपल्या घरी वहिनी चोरी करत असेल. आईला राग आला. तिने त्याच्या कानाखाली वाजवत तू हे उद्योग करतोस आणि तिचे नाव का घेतो, असे विचारताच त्याने कबुली दिली. त्यावेळी सुनेने सासूला बाजूला घेऊन दिराची खासगी माहिती माझ्या कानी आली होती. ती कोणाला देऊ नको असे तो म्हणाला होता. पण भीतीपोटी त्याने हे केले असेल, त्यामुळे त्याला माफ करा असे सुनेने सासूला सांगितले.

अशा गोष्टींमुळे सर्वजण मला गुप्तहेर आहेस, तर हा बिझनेस का सुरू करत नाहीस असे बोलू लागले. कसा बिझनेस करतात, काय करतात माहीत नव्हते आणि डिटेक्टिव्हची पुस्तकेही मी वाचली नव्हती. पिक्चर पाहिले नव्हते. त्यानंतर मी पेपरमध्ये जाहिरात करण्याचे ठरवले. पण कोणी जाहिरात घेत नव्हते. या क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी असून आर्मी, पोलीस डिपार्टमेंटमधील लोक यामध्ये असल्याचे लोकांनी सांगितले. या क्षेत्राला लायसन्स नसल्याने मंत्रालयात होम डिपार्टमेंटला गेले. तिथे कोणी ताकास तूर लागू देईना. शेवटी मी एका पत्रकाराचे काम केले. त्याच्या बहिणीचे लग्न झाले होते. लग्नानंतर तिच्या घरी एक पत्र आले होते, तुम्ही ज्याच्याशी लग्न केलेय, त्याचे लग्न झाले आहे. त्या मुलाने त्याला आई-वडील तसेच कोणीच नसल्याचे सांगितले होते. तो डोंबिवलीला शिक्षक म्हणून काम करत होता. मी गुप्तहेरचे काम करते, असे कोणी सांगितल्याने ते माझ्याकडे काम घेऊन आले होते. त्या शिक्षकाशी बोलता बोलता त्याच्या गावची माहिती मी मिळवली, त्याच्या गावी मी आणि माझा भाऊ गेलो. तिथे त्याची माहिती काढली असता, लग्न होऊन त्याला दोन मुले असल्याचे समजले. बायकोशी पटत नसल्याने तो पळून मुंबईला आला होता. हे काम मी करून दिले.

मग त्या पत्रकाराने माझी पहिली मुलाखत श्री मॅक्झीनमध्ये प्रसिद्ध केली. या मुलाखतीनंतर इंग्रजीत ही मुलाखत परस्पर कोणी तरी प्रसिद्ध केली. हे पाहून दिल्ली दूरदर्शनमधून लोक मुलाखतीसाठी घरी आले. मी आईसोबत घरी होते. त्यावेळी केवळ दोनच चॅनल होते. मी अनोळखी माणसांना मुलाखत देणार नसल्याचे सांगितले. ओळखीनंतर 'हम भी किसीसे कमी नही'. या कार्यक्रमासाठी माझी मुलाखत घेतली. ही मुलाखत पाहून लोकांनी आम्हाला रजनी पंडित यांचा पत्ता हवा असल्याची पत्रे त्यांना पाठवली. यामुळे त्यांचे दोन रूम पत्राने भरले. यानंतर त्यांनी माझा पत्ता आणि फोन नंबर जाहीर केला. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत मला फोन येत होते.

लोकसत्ताचे माधव गडकरी यांच्या एका मित्राचे काम केले. त्यानंतर लोकसत्ताने मुलाखत प्रसिद्ध केली. त्यावेळीही लोकांनी त्यांच्याकडे माझा पत्ता विचारला. त्यांनी १५ दिवसांनी माझा पत्ता जाहीर केला. माझ्याकडे फोन नसल्याने शेजारच्या घरी फोन येत होते. त्यामुळे मी आमदार सुधीर जोशी यांना मला फोनची गरज असल्याचे सांगितले. त्यांनी तत्काळ मला फोन कनेक्शन दिले. इतक्या वर्षांनंतरही तो नंबर आजही सुरू आहे. त्यामुळे मला कुठे जाहिरात करण्यासाठी जावे लागले नाही. सर्व भाषांमध्ये मुलाखती येत गेल्या.

कामे येऊ लागल्याने माझा अनुभव वाढत गेला. अनुभव हाच माणसाचा गुरू असतो. कुठेही गेले तरी तुम्हाला अनुभव काय? हे विचारले जाते. त्याशिवाय तुम्हाला कोणी नोकरी देत नाही. पण अनुभवातून माणूस शिकत जातो, तशी मी शिकले. माझ्याकडे एक मर्डर केस आली. ज्यामध्ये बाईने नवरा आणि मुलाचा खून केला होता. तिथे मला नोकर म्हणून राहायचे होते. मी तिला मला नोकरीची गरज असल्याचे सांगितले. तिथे नोकरी मिळाली. त्या बाईचे बोलणे मी टेप रेकॉर्ड करत होते. एकदा त्या बाईला माझा संशय आल्याने तिने माझ्या मागावर माणसे ठेवली. त्यामुळे मी घरी येऊ शकत नव्हते. एकदा मी तिला चकवा देत आईकडे येऊन गेले. आईला मी रिक्षा, टॅक्सी बदलत बदलत आल्याचे सांगितले. जोवर काम होणार नाही, तोवर मी घरी येणार नसल्याचेही मी सांगितले. जो खुनी पोलिसांना मिळत नव्हता, तो तिच्याबरोबर होता. तो तिला खबरी देत होता. तो एकदा तिच्या घरी आला, पोलीस मागावर असल्याने तू इथे येऊ नको यावरून त्यांच्यात भांडण झाले. यावेळी मी पायावर सुरी पडून घेतली. रक्त येऊ लागल्याने तिने मला डॉक्टरकडे जाण्यास सांगितले. मी खाली जाऊन पोलिसांना फोन केला. त्याला अटक झाली.

यानंतर मी मागे वळून पाहिले नाही. लग्नासाठी कोण कसे आहे हे माहिती नसते. कोणाला व्यसने आहेत का? दिलेली माहिती खरी आहे का? यासाठी कामे येऊ लागली. भीती हा शब्द हा माझ्या शब्दकोषात नाही, त्यामुळे मी कुठेही बिनधास्त प्रवेश करते.

माझे पहिले पुस्तक 'चेहऱ्याआडचे चेहरे' हे प्रकाशित झाले. मी प्रकाशकाला एक हजार प्रतींची परवानगी दिली होती. पण त्यांनी माझी परवानगी न घेता अधिक प्रती छापल्या. पुस्तकावर सही घेण्यासाठी एकजण माझ्याकडे आले होते, यावेळी मला पुस्तकामध्ये बराच फरक दिसून आला होता. यामुळे मला संशय आला. बाळासाहेब ठाकरे मला मुलीसारखे मानायचे. त्यांना ते पुस्तक दाखवले. त्यांनी मला माहिती घेण्यास सांगितले.

यावर मी प्रकाशिकाला फोन करून अधिक प्रति छापल्या आहेत का? विचारले. पण तिथून काही माहिती मिळाली नाही. एका कार्यक्रमासाठी पुस्तकाची मागणी आली असता मी एका बुक डेपोकडून पुस्तके मागवली. त्यांनीही मला ३०० पुस्तके दिली. या पुस्तकावर पुण्याचा पत्ता होता. यामध्ये अनेक मोठमोठ्या लोकांनी हे प्रकरण मिटविण्यासाठी मध्यस्थी केली.

मी पुण्यात गेले. पण तिथे मला मारण्यासाठी बरेच लोक जमले होते. मी मुंबईला न येता पुण्यातच मला लोक मारण्यासाठी आल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर मी कोर्टात केस केली. तिथेही मला लोक मारण्यासाठी आले, मला हे समजल्याने मी माझी गाडी तिथेच ठेवून दुसऱ्या गेटने घर गाठले. या केसमध्ये विजय झाला. आतापर्यंत मला ७९ पुरस्कार मिळाले आहेत.

आजवरच्या प्रवासात नामांकित लोकांची भेट झाली आहे. मध्यमवर्गीय लोक आता गुप्तहेरांची मदत मोठ्या प्रमाणात घेत आहेत. घराघरांत अडचणी आहेत. कौटुंबिक केसेस अधिक असून व्हाइट कॉलर गुन्हेगारी अधिक आहे. डिटेक्टिव्ह ही आज समाजाची गरज आहे. पोलीस किंवा सरकारकडून त्याची दखल घेतली जात नाही. मला एका पोलीस आयुक्तांनी तुमची आम्हाला गरज असल्याने तुम्ही डायरेक्ट भरती होण्याची ऑफर दिली होती. मला कोणाच्या अंडर काम करायचे नाही सांगून मी ऑफर धुडकावून लावली. मी स्वतंत्र असल्याने वरून कोणी फोन करून हे काम बंद करा असे सांगू शकत नाही आणि मला पाहिजे त्या विचाराने मी पुढे जाऊ शकते. मी अनेक राजकीय लोकांच्याही केसेस केल्या आहेत. मी गुप्तहेर बनण्यासाठी ट्रेनिंग देत असून आतापर्यंत ५० मुलांना प्रशिक्षित केले आहे. यासाठी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याकडे ट्रेनिंग स्कूलसाठी जागा मागितली होती. पण त्यानंतर त्यांचे पद गेल्याने मी पुन्हा पाठपुरावा केला नाही.

ऑस्ट्रेलियामध्ये माझा कार्यक्रम होता, तर त्या दिवशी लोकांना कार्यक्रमाला उपस्थित राहता यावे, यासाठी सर्व कार्यालयांना सुट्टी देण्यात आली होती. फॉरेनच्या केसेस माझ्याकडे येऊ लागल्या आहेत. या व्यवसायाला परवाना देण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला पाहिजे.

आधुनिक काळातील बहिर्जी

ज्ञानेश सावंत

'बहुरूपी' हा शब्द आपण अनेक वेळा ऐकला असेल, 'बहुरूपी' म्हणजे 'वेश' बदलणारा. इतिहासात अनेक बहुरूप्यांच्या गोष्टी वाचायला मिळतात. इतिहास हा माझा आवडता विषय. त्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गोष्टी वाचणे म्हणजे सोन्याहून पिवळे. लहानपणीच शिवाजी महाराजांच्या गोष्टींतून बहिर्जी नाईक यांची ओळख झाली. बहिर्जी नाईक हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुप्तचर विभागाचे प्रमुख होते. त्यांच्या रहस्यमय कथा वाचायला मला खूप आवडतात. नंतर मी शिवाजी सावंतांची कादंबरी वाचली. त्यात त्यांच्या हेरगिरीचा प्रवास उलगडत गेला. तो मनाला इतका भावला की, त्यांना जवळून पाहावेसे वाटायचे; परंतु ते कधीच शक्य नाही. हे माहीत असूनही मनात एक हुरहुर होती; परंतु ती माझी इच्छा आपल्या दैनिक प्रहारने पूर्ण केली, ती रजनी पंडित यांच्या रूपाने. अनेकजण रजनी पंडित यांना ओळखतात, पण आम्हाला त्यांना प्रत्यक्ष पाहता आले. त्यांच्या प्रवासातील अनुभव त्यांच्या तोंडून ऐकता आले, हे भाग्यच म्हणावे लागेल. त्यांचा हा प्रवास ऐकताना मला सतत बहिर्जी नाईक यांची आठवण येत होती.

रजनी पंडित एक सामान्य व्यक्तिमत्त्व पण असामान्य कतृत्व. हेरगिरीचा त्यांचा प्रवास स्वतःच्या घरातूनच सुरू झाला. एका नातेवाइकाच्या लग्नात दिलेल्या साड्यांचा घोळ त्यांनी शोधून काढला. त्यानंतर त्यांना नातेवाइकांचा रोषदेखील ओढवून घ्यावा लागला होता. घरातून सुरू झालेला हा प्रवास आता सातासमुद्रापार पोहोचला आहे. त्यांची देहयष्टी सामान्य; परंतु स्वभाव अत्यंत कडक शिस्तीचा, त्यांच्या साधेपणात एक प्रकारचा करारी बाणा दडलेला. तो जो कोणी अनुभवेल, त्यालाच समजू शकतो. त्यांना कमी गुण मिळाल्यामुळे रूपारेल कॉलेजच्या प्राचार्यांनी प्रवेश नाकारला होता. तिथेही त्यांनी हेरगिरी करून स्वतःच्या कमी गुण मिळालेल्या नातेवाइकाला प्रवेश देणाऱ्या प्राचार्यांना जाब विचारला आणि स्वतःसह मैत्रिणींना प्रवेश देण्यास भाग पाडले होते. त्यांचा सत्याचा शोध घेण्याचा स्वभाव त्यांना शांत बसू देईना. सत्य शोधण्यासाठी त्यांनी बुद्धिकौशल्य पणाला लावले. कोणतेही प्रशिक्षण न घेता त्या हेरगिरी अनुभवातून शिकत गेल्या.

आग्रा येथून पळताना जसा बहिर्जींच्या जीवाला धोका होता, तसे अनेक प्रसंग रजनी पंडित यांनी काम करताना अनुभले. प्रत्यक्षात आपल्याला मारण्यासाठी मारेकरी शोध घेत आहेत, हे माहीत असताना देखील त्या गुप्तपणे आणि सहीसलामत आईला भेटण्यासाठी घरी पोहोचत. त्यांनी हेरगिरीला व्यवसायाचे स्वरूप दिले. हा व्यवसाय मुंबईतून सुरू झाला. आता त्याची देश आणि विदेशांत व्याप्ती वाढवली. दुबई, कॅनडा, कोरिया, ऑस्ट्रेलिया, अमेरिकन देशांत त्यांचा नावलौकीक वाढला आहे. परदेशातील लोक त्यांच्याकडून ही विद्या शिकून घेत आहेत. अनेक देशांत त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. या प्रवासात त्यांची अनेक मोठ-मोठ्या लोकांशी, नेत्यांशी ओळख झाली; परंतु त्या ओळखीचा त्यांनी कधी स्वतःसाठी उपयोग करून घेतला नाही. बहिर्जी नाईक यांच्याप्रमाणेच रजनीताईंनी अनेकदा वेशांतर करून सत्याचा उलगडा केला. बहिर्जी नाईक कधी फकीर, वासुदेव, कोळी, भिकारी, संत, कुठलाही वेशांतर करण्यात पटाईत होते. ते विजापूरचा आदिलशहा आणि दिल्लीच्या बादशहाला भारी पडले. हेर असल्याचा संशय जरी आला तरी कत्तल करणारे हे दोन्ही बादशहा बहिर्जींना एकदादेखील पकडू शकले नाहीत, तसेच यश रजनीताईंना मिळत गेले. एकदा तर त्या वेशांतर करून सहा महिने मोलकरणीच्या रूपात वावरत होत्या, त्यांनी अशी शेकडो रूपे बदलली. मात्र त्या वेषांतराची त्यांनी कुठेही वाच्यता देखील केली नाही. कारण हा प्रवासच रहस्यमय असून, कोणाचीही गुपिते त्या सार्वजनिक करू इच्छीत नाहीत. कोणास ठाऊक त्यांच्या मनाच्या तिजोरीत किती रहस्यकथा दडल्या आहेत! त्यांच्या या प्रवासात त्या आजही प्रचंड उत्साही आणि आनंदी आहेत. मात्र त्यांच्या हेरगिरीच्या व्यवसायाला सरकारी परवाना मिळला नाही. तो मिळवण्यासाठी त्या प्रयत्न करीत आहेत. तो त्यांना मिळावा, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

मै तहकिकात करूंगी

विनिशा धामणकर

विश्वास. बदलत्या जगात वेगाने बदलत जाणारी ही भावना काही वेळा नातेसंबंधांना चिरडून माणसाच्या मन, मेंदूतून निघून जाते. पण वेळीच काही गोष्टींचा सोक्षमोक्ष लावला, तर योग्य निर्णय घेता येतो. उदाहरणार्थ, मुलामुलींचं लग्न ठरलं आणि त्यातील मुलगा मुलीला किंवा मुलगी मुलाला भेटायला तयारच होत नसेल, बोलणी करायला टाळाटाळ करत असेल, तर समजावं 'दाल में कुछ काला हैं...' अशा वेळी नातेवाईक, मध्यस्थ फार काही करू शकत नाही, कारण त्यांनासुद्धा ती मुलं, मुली चांगली गुंडाळू शकतात. रजनी पंडित यांची मात्र यात फार मदत होऊ शकते. हेरगिरीच्या प्रांतात उगीच नाही त्यांचे नाव अधिकारवाणीने घेतले जात. लग्नात रस न घेणाऱ्या मुला-मुलींचा सातबारा रजनी तुमच्यापुढे मांडू शकतात. मग आपल्या मुलीची किंवा मुलाची ही लग्नगाठ बांधायची की नाही हे तुम्ही ठरवू शकता.

तुमच्या हसत्या खेळत्या घरात अचानक बेबनावाचं वादळ आलं आणि ते शमता शमत नसेल तर...? बरोबर... 'दाल पुरी काली हैं' असं समजावं. नवऱ्याची किंवा बायकोची काहीतरी भानगड सुरू असेल आणि त्यामुळे निष्ठावंत जोडीदाराला मनस्ताप होत असेल, तर त्याचं/तिचं नेमकं काय चाललं आहे हे रजनी तुम्हाला सांगू शकतात.

लग्नबंधनाव्यतिरिक्त नोकरी लावताना उमेदवाराची शहानिशा करणे, हरवलेल्या व्यक्तीला शोधणे, एखाद्यावर नजर ठेवणे, आपल्या ओळखीचा, पार्श्वभूमीचा कोणी गैरफायदा घेत असेल, तर त्याच्याविषयी माहिती काढणे अशी कामेही करतात. रजनी लोकांना त्यांच्या आयुष्याला कठीण वळणावर आणून ठेवलेल्या मनस्तापातून सोडवण्यासाठी हा धोका पत्करतात. ३० वर्षांच्या या गुप्तहेरीच्या काळात रजनी यांनी ८० हजार अशी प्रकरणं उघडकीस आणली आहेत. यामुळे किती लोकांची आयुष्ये उद्ध्वस्त होण्यापासून वाचली, याचा आपण अंदाज करू शकतो.

रजनीच्या गरुडनजरेतून खरा-खोटा माणूस सुटत नाही. म्हणूनच 'दिल की बात बता देता हैं, असली नक़ली चेहरा' हे जणू त्यांच्या कामाचं घोषवाक्यच झालं आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कामाची नोंद घेतली गेल्यानेच त्या दूरदर्शनच्या 'हिरकणी' पुरस्कारासह ५७ पुरस्कारांच्या मानकरी ठरल्या आहेत. कसलंही प्रशिक्षण नसताना हे कसं काय साध्य केलं? असा प्रश्न त्यांना प्रहार गजालीच्या कार्यक्रमात विचारला, तेव्हा 'गुप्तहेर जन्मावा लागतो' असं मार्मिक उत्तर त्यांनी दिलं. आताच्या तांत्रिकदृष्ट्या प्रबळ समाजात त्यांच्या कामाचे आव्हान वाढले आहे. यावर त्यांचं उत्तर नक्कीच असेल, 'मै तहकिकात करूंगी.'

भारतातील पहिल्या खासगी महिला गुप्तहेर

वैष्णवी भोगले

अनेक टीव्ही मालिका, चित्रपट, पुस्तकांमधून पाहिलेल्या, वाचलेल्या गुप्तहेरांविषयी अनेकांच्या मनात कुतूहल असते. कारण गुप्तहेर आपल्या बुद्धिमतेच्या बळावर घटनेचा मागोवा घेऊन रहस्ये उलगडतात. या क्षेत्रात जितकी आव्हाने आहेत तितकेच ते धोकेही आहेत. कधी, कसे जीवावर बेतेल सांगता येत नाही. या क्षेत्रात घटनेचा पाठपुरावा करताना चौफेर नजर ठेवून युक्तीने शोधकार्य करावे लागते. प्रहार गजालीच्या सतराव्या सत्रात लेडी जेम्स बॉण्ड अर्थात भारतातील पहिली खासगी गुप्तहेर महिला रजनी पंडित यांच्याशी गप्पा रंगल्या, तेव्हा या क्षेत्रातील रहस्येही उलगडू लागली.

रजनी पंडित यांचे शालेय शिक्षण त्यांच्या जन्मगावी म्हणजे पालघर जिल्ह्यातच पूर्ण झाले. लहानपणीच त्यांना आपल्यातील क्षमतेची जाणीव झाली. पुढे मराठी साहित्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी मुंबईच्या रूपारेल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पण त्यांनी कोणतेही हेरगिरिचे प्रशिक्षण घेतले नाही. वडील सीआयडीमध्ये होते. या क्षेत्राविषयी घरच्यांना चांगलीच कल्पना असल्याने घरच्यांचा स्पष्ट नकार होता. मात्र आईने रजनीला सहकार्य केले. त्यांची एक मैत्रीण व्यसनांच्या आहारी गेली होती. त्यांनी या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन पालकांच्या मदतीने व्यसनांमधून तिला बाहेर काढले. त्यावेळी मैत्रिणीचे वडील पाठीवर कौतुकाची थाप देत म्हणाले, "अरे व्वा! तू तर स्पाय आहेस." त्यानंतर 'स्पाय' हा शब्द त्यांच्या मनावर कायमचा कोरला गेला आणि हेच आपले जीवनध्येय हे त्यांनी निश्चित केले.

हेरगिरी करण्यासाठी त्यांना अनेकदा जीव धोक्यात घालावा लागला. कधी मोलकरीण, तर कधी मनोरुग्ण बनून त्यांना घटनेच्या ठिकाणी प्रवेश करावा लागला. गुप्तहेर हा एक चांगला अभिनेता कसा असतो, याचं उत्तम उदाहरण म्हणजे रजनी पंडित. त्यांनी अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्यापासून वाचवली. रजनी यांचे कार्य इतके प्रभावी होते की, पोलीसदेखील त्यांची मदत घेऊ लागले. त्यांनी आजवर ८० हजारांच्या वर प्रकरणे हाताळली आहेत. 'फेसेस बिहाइंड फेसेस' आणि 'मायाजाल' या पुस्तकांमधून त्यांनी आपल्या या क्षेत्राचा लेखाजोखा मांडला आहे. भारतात ३० वर्षांपूर्वी हेरगिरीच्या क्षेत्रात महिला नव्हत्या. १९९८ मध्ये त्यांनी सुरू केलेल्या स्वतःच्या गुप्तहेर एजन्सीत आज अनेक मुलं-मुली काम करत आहेत. रजनी यांनी खरं तर या क्षेत्राचे दरवाजे महिलांसाठी उघडले. स्त्रिया फक्त घर, संसारच सांभाळू शकत नाहीत, तर करिअरच्या वेगळ्या वाटाही निवडून त्यात यशस्वी होऊ शकतात, हेच रजनी पंडित यांच्या कारकिर्दीकडे पाहिल्यावर वाटतं. त्यांच्या या हेरगिरीने आजच्या मुलींच्या करिअरमध्येही सकारात्मक शिरकाव केला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

क्रीडा

अखेरच्या सामन्यातही ऑस्ट्रेलियाचा पराभव

भारताने मालिका ४-१ फरकाने जिंकली | श्रेयस अय्यरचे अर्धशतक; मुकेश कुमारने घेतल्या ३ विकेट | ट्रॅव्हिस हेडने पहिल्याच षटकात मारले ३ चौकार

◆ बेंगळूरु (वृत्तसंस्था) :

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील टी-२० मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना बेंगळूरु येथे खेळवण्यात आला. एम चिन्नास्वामी स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने १८ षटकांत ५ गडी गमावून १३४ धावा केल्या. भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही, तरीही भारताने हा सामना ६ धावांनी जिंकला.

टीम इंडियाच्या अर्शदीप सिंगने बेंगळूरुमध्ये शेवटच्या ६ चेंडूत १० धावा केल्या. पहिल्या ३ चेंडूंवर त्याने एकही धाव दिली नाही आणि कर्णधार मॅथ्यू वेडची विकेटही घेतली. अखेरच्या षटकात संघाला केवळ ३ धावा करता आल्या. भारताकडून मुकेश कुमारने ३ बळी घेतले. तर अर्शदीप सिंग आणि रवी बिश्नोईने २-२ विकेट घेतल्या.

श्रेयस अय्यरचे ३६ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. त्याने ५३ धावांची खेळी केली. आपल्या टी-२० कारकिर्दीतील ८वे अर्धशतक झळकावले. अय्यरशिवाय जितेश शर्माने २४ आणि अक्षर पटेलने ३१ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून बेन ड्वार्शस आणि जेसन बेहरेनडॉर्फने २-२ विकेट घेतल्या.

श्रेयस अय्यरने ५३ धावा केल्या. ५व्या टी-२० मधील विजयासह टीम इंडियाने ४-१ च्या फरकाने मालिका जिंकली. जितेश शर्मा २४ धावा करून बाद झाला. मॅथ्यू शॉर्टच्या हातून त्याला ॲरॉन हार्डीने झेलबाद केले. रिंकू सिंग (६ धावा) तनवीर संघाचा बळी ठरला. कर्णधार सूर्यकुमार यादव (५ धावा) आणि ऋतुराज गायकवाड (१० धावा) यांचे बळी घेतले. डाव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाच्या चेंडूवर गायकवाड दुसऱ्यांदा बाद झाला आहे. तत्पूर्वी, जेसन बेहरेनडॉर्फने यशस्वी जैस्वालला (२१धावा) बाद केले.

सलामीवीर बाद झाल्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर खेळायला आलेल्या श्रेयस अय्यरने टिकाऊ खेळी खेळली, पण दुसऱ्या बाजूने विकेट पडत राहिल्या. ५५ धावांवर ४ विकेट्स गमावल्यानंतर अय्यर आणि जितेश शर्मा या जोडीने भारतीय डाव स्थिर करण्याचा प्रयत्न केला. या दोघांनी ५व्या विकेटसाठी ४२ धावांची भागीदारी केली.

कबड्डीत परभणी, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूरचा विजय

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

परभणी, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर आदी संघांनी साखळी लढतीत सोपे विजय मिळवत प्रशांत जाधवर फाऊंडेशन आणि विठ्ठल क्रीडा मंडळ आयोजित कुमारांच्या सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद आणि निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या मुलांच्या गटात बाद फेरीत खेळण्याची आशा कायम राखली आहे.

धर्मवीर आनंद दिघे क्रीडांगणात सुरू असलेल्या स्पर्धेच्या सामन्यात परभणी संघाने ठाणे ग्रामीण संघाचा ४१-२९ असा पराभव केला. सामन्याच्या पूर्वार्धात परभणी संघाने २०-१६ अशी आघाडी घेत सामन्यावर पकड मिळवली होती. साखळी लढतीतील पहिल्या सामन्यात ठाणे ग्रामीण संघाने पिछाडीवरून बाजी पालटवली होती. तशाच खेळाची त्यांच्याकडून अपेक्षा असतांना या सामन्यात मात्र त्यांनी निराशा केली. बाबुराव जाधव आणि विजय तरेने परभणी संघाला १२ गुणांनी विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अन्य लढतीत पिंपरी चिंचवड संघाने सातारा संघावर ५३-३७ अशी सरशी मिळवली. पिंपरी चिंचवड संघाच्या विजयात आर्यन राठोड आणि कृष्णा चव्हाण चमकले. पराभूत संघाकडून चैतन्य पाटील आणि अथर्व सावंत चमकले. पहिल्या डावात चांगला खेळ करणाऱ्या बीड संघाला कोल्हापूर संघाकडून ३९-२१ असा १८ गुणांनी पराभव पत्करावा लागला. मध्यंतरापर्यंतच्या खेळात बीड संघाकडून झालेल्या प्रतिकारामुळे कोल्हापूर संघाला १३-१२ अशी नाममात्र आघाडी मिळाली होती. दुसऱ्या डावात कोल्हापूरच्या खेळाडूंनी आपला खेळ उंचावत संघाला मोठ्या फरकाने विजय मिळवून दिला.

मुलींच्या लढतीत पिछाडी भरून काढत ठाणे ग्रामीण संघाने पुणे शहर संघाला चकवले. पहिल्या डावात १२-१६ असे चार गुणांनी मागे पडलेल्या ठाणे संघाने सामन्याच्या शेवटी २९-२५ अशी बाजी पालटवली. निधी रांजोळे, यतिक्षा बावाडे, सानिया गायकवाड, वेदिका ठाकरे यांनी ठाणे संघाला यश मिळवून दिले. पुणे शहर संघाकडून प्रज्ञा कासार, अंकिता पिसाळ आणि तनिष्का शिंदेने चांगला खेळ केला. या गटातील अन्य लढतीत सोलापूर संघाने बीड संघाचा ६८-२६ असा धुव्वा उडवला.